सहकार भारतीचे
मुखपत्र

बिना संस्कार नहीं सहकार, बिना सहकार नहीं उद्धार

# सहकार सुगंध

ISBN
978-81-940842-0-4

PRGI NO. MAHMUL/2005/16099

• पुणे • वर्ष : २२ • अंक ०६ • सप्टेंबर २०२६ • पृष्ठे ४० • किंमत : रु. ३०/- • संपादक : भालचंद्र कुलकर्णी




## व्यवसाय वृद्धिसाठी सहकारी बँकांनी प्रयत्न करण्याची गरज




## पतसंस्थांच्या ठेव संरक्षणासाठी शासनाने भरीव योगदान द्यावे



आदर्श नागरी पतसंस्थेची वार्षिक सभा संपन्न




वर्धा जिल्हा सहकार भारती बैठक

सहकार भारती - महाराष्ट्र प्रदेश

## नारीशक्ती सहकारिता संमेलन

सहकार चळवळीतील सर्व महिलांनी

**मोठ्या संख्येने सहभागी व्हा!**

३ व ४
ऑक्टोबर २०२६
शिर्डी

विशेष
लेख



दि धरमपेठ महिला
मल्टी स्टेट को-ऑप. सोसायटी लि., नागपूर. (महाराष्ट्र, छत्तीसगढ व मध्यप्रदेश)
आपला परिवार, आपली संस्था!
32
अवघी सृष्टी करतेय नमन होतयं माझ्या बाप्पाचे आगमन
।।गणपती बाप्पा मोरया।।
गणेश चतुर्थीच्या हार्दिक शुभेच्छा!
गणपती बाप्पा मोरया
5000/- कोटींच्या व्यवसायाकडे यशस्वी वाटचाल...
गोल्ड लोन
• सुलभ प्रक्रिया
• जलद कर्ज वाटप
• किमान दस्तऐवज
व्याजदर 0.90% प्रति माह
• योजना सर्व शाखेत उपलब्ध 9822272947
सर्व आर्थिक समाधानांसाठी एकच संस्था
तुमच्या सेवेत सदैव तत्पर
LOCKERS सुविधा
SMS अर्लट
DEPOSIT सुविधा
NEFT, RTGS सुविधा उपलब्ध
MOBILE बँकिंग
₹ 2335 कोटींच्या वर व्यवसाय
GOLD LOAN उपलब्ध
CORE बँकिंग
LIC पॉलिसी काढण्याची व प्रीमियम भरण्याची सुविधा
MSEDCL विज बिल भरणा केंद्र
LOAN सेवा सुविधा
GIC पॉलिसी काढण्याची व नुतनीकरणाची सुविधा
BANKING P.O
180 DAYS TRAINING
BANKING POINT PROGRAMME P.O.
A Bridge of Banking Career
Launch Your Banking Career For FREE!
8055026129
Join the Dharampeth Mahila Society
Probationary Officer Programme (P.O)
Enroll Now & Grab The Opportunity
मुख्य कार्यालय : प्लॉट नं 42-अ सीताराम भवन, रामनगर चौक, शिवाजीनगर, नागपूर-440010.
फोन : 0712-2524337, 2520303 | ई-मेल : info@dpmahila.com


राजर्षी शाहू
र. नं. 819
राजर्षी शाहू
मल्टीस्टेट को.ऑप. क्रेडीट सोसायटी लि. बुलडाणा
• ISO 9001:2015 मान्यता प्राप्त संस्था
• बँको पुरस्कार प्राप्त संस्था
• FCBA पुरस्कार प्राप्त संस्था
• मल्टीस्टेट फेडरेशनचा सहकार गौरव पुरस्कार प्राप्त संस्था
आधारवड
रा. ल. उपाख्य भाऊसाहेब शेळके
संस्थापक अध्यक्ष, राजर्षी शाहू परिवार
आराधना गणरायाची...
मनोकामना मांगल्याची!
गणेशोत्सव निमित्त सर्वांना मंगलमय शुभेच्छा!
बैल पोळा सणाच्या हार्दिक शुभेच्छा!
शुभेच्छुक: संदीप शेळके
संस्थापक अध्यक्ष - राजर्षी शाहू मल्टीस्टेट को. ऑप क्रेडीट सोसायटी बुलढाणा
राजर्षी शाहू
मल्टीस्टेट को.ऑप. क्रेडीट सोसायटी लि. बुलडाणा
तुमच्या सेवेत सदैव तत्पर..!
LOAN सेवा सुविधा
GOLD LOAN उपलब्ध
LOCKERS सुविधा
NEFT, RTGS सुविधा उपलब्ध
DEPOSIT सुविधा
MSEDCL वीज बिल भरणा केंद्र
शाहू-पे
SHAHU PAY
CORE बँकिंग
NET बँकिंग
MOBILE बँकिंग
SMS अलर्ट
DOORSTEP बँकिंग
अनेक प्रकारच्या पॉलिसी काढण्याची व प्रीमियम भरण्याची सुविधा
राजर्षी शाहू संस्थेची वैशिष्ट्ये -
• एकूण 69 शाखेचा विस्तार
• 1200 कोटींचा व्यवसाय
• 2,00,000 सभासद संख्या
• 'शाहू पे' हे पेमेंट ॲप विकसित करणारी भारतातील पहिली पतसंस्था.
• महिला बचत गटाच्या माध्यमातून 75 हजार महिलांना 250 कोटी रुपयांचे कर्ज वाटप.
• 105 कोटी रु. सोने तारण कर्ज वाटप.
+91-93599 41853
rajarshishahumultistate.com
सौ. मालती संदीप शेळके
अध्यक्षा, राजर्षी शाहू मल्टीस्टेट को. ऑप क्रेडीट सोसा. बुलडाणा


टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड.
मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक
Bharose ka Bank Bhavishya ka Bank
स्वप्नातील कार ते
कारच्या चावीपर्यंतचा प्रवास
आता निर्धास्त
टीजेएसबी
ऑटो फायनान्स
कर्जाच्या मदतीने
घरी आणा आपल्या
स्वप्नातील कार
व्याजदर
7.80%*
द.सा. पासून
*अटी व नियम लागू
www.tjsb.bank.in | : 022 - 48897210


netwin
Ideas to Life
30
बँकिंग क्षेत्रातील
वर्षांचा प्रदीर्घ अनुभव
डिजिटल बँकिंगमध्ये
एक पाऊल पुढे netwin सोबत
Netwin का निवडावे ?
ग्राहकांना आधुनिक आणि सोयीस्कर सेवा
डिजिटल व्यवहारात लक्षणीय वाढ
तरुण ग्राहकांना आकर्षित करण्याची संधी
शाखांवरील कामाचा ताण कमी करण्यासाठी
कार्यप्रणालीतील कार्यक्षमता व पारदर्शकता वाढ
संस्थेची विश्वासार्हता वाढविण्यासाठी
आपल्या व्यवसायासाठी स्मार्ट डिजिटल सोल्युशन्सचा अनुभव
ISO
ISO
डिजिटल बँकिंग सुविधा
मोबाईल मनी कलेक्शन
मोबाईल बँकिंग
LOS
व्हाऊचरलेस बँकिंग
NEFT / RTGS & IMPS
UPI - QR कोड
AOS
E-KYC
AI
Agentic AI - नव्या युगातील बँकिंग
स्वयंचलित प्रक्रिया, जलद सेवा आणि कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारे अचूक विश्लेषण
www.netwin.in
sales@netwinindia.in
अधिक माहिती व प्रात्यक्षिकसाठी संपर्क
०२५३ ६६५ १५००

वीजबचत अन् किफायतशीर कर्ज म्हणजे
पर्यावरण अन् बजेटचे दुहेरी संरक्षण !

जनसेवा
सोलर
कर्ज



रुफटॉप सोलर इलेक्ट्रिक, सोलर वॉटर हिटरसाठी
(वैयक्तिक : रु. ५ लाख, व्यावसायिक रु. २५ लाख)

• आकर्षक व्याजदर • तत्पर सेवा • अल्प प्रोसेसिंग फी

संपर्क : 8485871252
www.janasevabankpune.bank.in

जनसेवा सहकारी बँक लि., हडपसर, पुणे.
जनसामान्यांची असामान्य बँक, जनसेवेसाठी वचनबद्ध !
मुख्य कार्यालय :
प्लॉट क्र. १४, हडपसर इंडस्ट्रिअल इस्टेट, हडपसर, पुणे ४११०१३.

|| बिना संस्कार नहीं सहकार ।
बिना सहकार नहीं उद्धार ||

# सहकार सुगंध


ISBN : 978-81-940842-0-4

**सप्टेंबर २०२६ (वर्ष २२, अंक ०६)**



**संपादक :**
भालचंद्र कुलकर्णी (मोबाईल : ९८२२८८२५०९)

**सहसंपादक :**
विनायक कुलकर्णी (मोबाईल : ९४२२३२१६२६)



**सहकार प्रिंटिंग अँड पब्लिकेशन्स प्रा. लि.**
**संचालक मंडळ : (सहकार भारतीचे पद)**
डॉ. उदय जोशी, संचालक (राष्ट्रीय अध्यक्ष)
सीए सतीश मेढी, संचालक (राष्ट्रीय कोषाध्यक्ष)
श्री. विनय खटावकर, संचालक (क्षेत्र संघटन प्रमुख)
श्री. भालचंद्र कुलकर्णी, एमडी (राष्ट्रीय प्रकाशन प्रमुख)

**मार्गदर्शक : सहकार भारती पदाधिकारी**
श्री. दीपक चौरसिया (राष्ट्रीय महामंत्री)
श्री. दीनानाथ ठाकूर (संरक्षक)
श्री. संजयजी पाचपोर (राष्ट्रीय संघटनमंत्री)
श्री. दत्ताराम चाळके (महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष)
श्री. विवेक जुगादे (महाराष्ट्र प्रदेश महामंत्री)
श्री. शरद जाधव (महाराष्ट्र प्रदेश संघटनमंत्री)
डॉ. मुकुंद तापकीर, श्री. सतीशजी मराठे,
श्री. ज्योतिंद्रभाई मेहता, श्री. विष्णूजी बोबडे,
श्री. संजय परमणे

**जाहिरात व वर्गणीदार विभाग समन्वयक :**
सौ. अंजली लागू, श्रीमती पौर्णिमा राईलकर

**मुखपृष्ठ मांडणी, अक्षरजुळणी व डिझाइन :**
सौ. अर्चना गाढवे


**वर्गणीचे दर**

**वार्षिक वर्गणी : रु. ७००/– फक्त**
**त्रैवार्षिक वर्गणी : रु. १८००/– फक्त**
**खालील QR कोड स्कॅन करून ऑनलाइन पेमेंट करावे.**
**Please Visit : www.sahakarsugandha.org**

**QR कोड**

**कृपया QR कोड स्कॅन करून ऑनलाइन पेमेंट करावे. किंवा खालील बँक खात्यात थेट रक्कम जमा करावी.**

**A/c Name**

**A/c Name :**
**Sahakar Printing & Publications Pvt. Ltd.**
**Bank Name : State Bank of India**
(Hingne Khurd, Pune Branch)
**Current a/c No. : 36931889346**
**IFS Code - SBIN0007159**

**सहकार सुगंध कार्यालय**


**ऑफिस नं. १५, विष्णू प्रिया अपार्टमेंट,**
**५ वा मजला, ईशान रेस्टॉरंटच्यावर,**
**गणेशमळा, सिंहगड रोड,**
**पुणे – ४११०३०. मो. : ८८०५९८१६७३**
ईमेल : sahakar.sugandha@gmail.com



**'सहकार सुगंध'** हे मासिक **मालक,** सहकार प्रिंटिंग अँड पब्लिकेशन्स प्रा. लि. यांचेसाठी **प्रकाशक** भालचंद्र वसंत कुलकर्णी यांनी **मुद्रक** विवेक श्रीधर देशपांडे यांच्या श्रीपाद प्रिंटर्स, शॉप नं.२, कोणार्क उद्योग, स.नं. १७७, एरंडवणा, पुणे ४११ ००४ येथे छापून ऑफिस नं. १५, विष्णू प्रिया अपार्टमेंट, गणेशमळा, सिंहगड रोड, पुणे ४११ ०३० येथे प्रसिद्ध केले. **संपादक –** भालचंद्र वसंत कुलकर्णी

**'Sahakar Sugandha'** monthly is owned by Sahakar Printing & Publications Pvt. Ltd., Published by Bhalchandra Vasant Kulkarni at Office No. 15, Vishnu Priya Apartment, Ganeshmala, Sinhagad Road, Pune 411 030 Printed by Vivek Shridhar Deshpande at Shripad Printers, Shop No. 2, Konark Udyog, S.N. 177, Erandwane, Pune 411 004. **Editor :** Bhalchandra Vasant Kulkarni

# सहकार चळवळीला प्रशिक्षण व सकारात्मकतेची गरज

'एकमेकां साहाय्य करू, अवघे धरू सुपंथ' ही भावना म्हणजेच सहकार चळवळीचा आत्मा आहे. परस्परांच्या सहकार्याने, विश्वासाने आणि सामुहिक प्रयत्नांतून आर्थिक व सामाजिक विकास साधण्याचे सामर्थ्य सहकारामध्ये आहे. महाराष्ट्राच्या सामाजिक-आर्थिक विकासात सहकार क्षेत्राने दिलेले योगदान तर विशेष उल्लेखनीय आहे. साखर कारखाने, दूध संघ, पतसंस्था, सहकारी बँका, गृहनिर्माण संस्था, विविध कार्यकारी सेवा संस्था अशा अनेक माध्यमांतून सहकाराने ग्रामीण तसेच शहरी अर्थव्यवस्थेला बळ दिले आहे. मात्र आता काळ बदलत आहे. तंत्रज्ञान झपाट्याने बदलत आहे, ग्राहकांच्या अपेक्षा बदलत आहेत, नियामक व्यवस्था अधिक कडक होत असून आर्थिक व्यवहार अधिक स्पर्धात्मक होत आहेत. अशा परिस्थितीत केवळ पूर्वीच्या अनुभवाच्या जोरावर सहकारी संस्था चालविणे पुरेसे राहिलेले नाही. आज सहकार क्षेत्राला सर्वांत मोठी गरज आहे ती आधुनिक ज्ञानाची, सातत्यपूर्ण प्रशिक्षणाची आणि सकारात्मक दृष्टिकोनाची!

सहकारी संस्थेच्या यशामध्ये सभासद, संचालक मंडळ, अधिकारी आणि कर्मचारी या सर्वांची भूमिका महत्त्वाची असते. परंतु या सर्व घटकांना त्यांच्या जबाबदाऱ्या, अधिकार, कायदेशीर तरतुदी, आर्थिक शिस्त, जोखीम व्यवस्थापन, तंत्रज्ञान आणि ग्राहकसेवा यांचे अद्ययावत ज्ञान आहे का, हा प्रश्न गांभीर्याने विचारण्याची वेळ आली आहे. संचालक होणे ही केवळ निवडणुकीतून मिळालेली बक्षिसी नाही, तर ती विश्वस्तांची जबाबदारीची भूमिका आहे. संस्थेच्या पैशाचा, सभासदांच्या विश्वासाचा आणि संस्थेच्या भवितव्याचा निर्णय संचालक मंडळ घेत असते. त्यामुळे संचालकांना सहकार कायदा, संस्थेचे उपविधी, लेखा व आर्थिक बाबी, कर्जव्यवस्था, ऑडिट, नियामक नियम, डिजिटल बँकिंग, सायबर सुरक्षा आणि सुशासन यांचे संपूर्ण ज्ञान असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे कर्मचारी आणि व्यवस्थापकांसाठीही प्रशिक्षण म्हणजे केवळ एखाद्या कार्यशाळेला उपस्थित राहणे नव्हे तर सतत शिकत राहणे ही आधुनिक सहकाराची अनिवार्यता झाली आहे.

आजचा सभासद पूर्वीसारखा नाही. त्याला तात्काळ सेवा हवी आहे. मोबाइलवर व्यवहार, डिजिटल पेमेंट, ऑनलाईन माहिती, तत्काळ कर्जप्रक्रिया, पारदर्शकता आणि उत्तम ग्राहक सेवा यांची अपेक्षा आहे. खासगी आणि व्यावसायिक संस्थांशी स्पर्धा करताना सहकारी संस्थांनीही अद्ययावत तंत्रज्ञान स्वीकारले पाहिजे. मात्र तंत्रज्ञान स्वीकारणे म्हणजे केवळ संगणक किंवा मोबाईल ॲप उपलब्ध करून देणे नव्हे. त्यासाठी कर्मचाऱ्यांना प्रशिक्षित करणे, सायबर सुरक्षेची जाणीव निर्माण करणे आणि डिजिटल व्यवहारातील जोखीम समजून घेणे तितकेच महत्त्वाचे आहे. आज एखाद्या कर्मचाऱ्याची छोटीशी चूक संस्थेला मोठे आर्थिक नुकसान करून देऊ शकते. त्यामुळे प्रशिक्षण हा खर्च नसून संस्थेच्या सुरक्षित भवितव्यासाठी केलेली गुंतवणूक आहे.

प्रशिक्षणाइतकीच दुसरी महत्त्वाची गरज आहे, ती म्हणजे सकारात्मक दृष्टिकोनाची. सहकार क्षेत्रात अनेकदा हे असेच चालत आले आहे, यात काही बदल होणार नाही, नवीन पद्धतीची गरज नाही, आपल्या संस्थेत हे शक्य नाही अशा नकारात्मक प्रतिक्रिया ऐकायला मिळतात. अशा मानसिकतेमुळे संस्था बदलत्या काळापासून दूर जातात. समस्या प्रत्येक संस्थेत असतात. परंतु प्रश्न समस्या आहेत की नाही हा नसून, त्या समस्यांकडे आपण कोणत्या दृष्टिकोनातून पाहतो, हा आहे. चूक झाली तर दोषारोप करण्याऐवजी त्यातून शिकण्याची वृत्ती हवी. सकारात्मकता म्हणजे समस्यांकडे डोळेझाक करणे नव्हे; तर समस्या मान्य करून त्यावर उपाय शोधण्याची मानसिकता होय. सहकार चळवळीसमोरील आणखी एक आव्हान म्हणजे नव्या पिढीला सहकाराशी जोडणे, हे आहे. सहकारामध्ये महिलांचा सहभाग देखील वाढवला पाहिजे. तरुण पिढी तंत्रज्ञानाशी परिचित आहे, नवीन कल्पना स्वीकारण्यास तयार आहे आणि बदलत्या बाजारपेठेचे आकलन या पिढीला अधिक वेगाने होते. त्यामुळे सहकारी संस्थांनी तरुण सभासद, तरुण संचालक आणि तरुण कर्मचारी ज्यामध्ये महिलांचे प्रमाण अधिक असेल, अशांना प्रशिक्षण देऊन नेतृत्वाच्या संधी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. त्याचबरोबर ज्येष्ठांचा अनुभव आणि तरुणांची ऊर्जा यांचा संगम झाला तर सहकाराला नवी दिशा मिळू शकते.

जय सहकार!



संपादकीय...

# नागरी सहकारी बँकासाठी 'अम्ब्रेला'चे मुख्य कार्यालय आता मुंबईत

**मुंबई –** देशाच्या विविध राज्यात कार्यरत असणाऱ्या सर्व नागरी सहकारी बँकासाठी मध्यवर्ती संस्था म्हणून काम करणाऱ्या राष्ट्रीय नागरी सहकारी वित्त आणि विकास महामंडळाचे मुख्य कार्यालय नवी दिल्ली ऐवजी महाराष्ट्रात स्थापन करण्यात येणार असल्याचे केंद्रीय सहकार आणि गृहमंत्री अमित शहा यांनी जाहीर केले आहे.



केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा

येथे आयोजित सहकार नव-क्रांति कार्यक्रमात ते बोलत होते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय सहकार राज्यमंत्री कृष्णपाल गुर्जर, मुरलीधर मोहोळ, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील आदि उपस्थित होते. ते म्हणाले, देशाचा विचार करता महाराष्ट्रात सध्याच्या स्थितीमध्ये सर्वाधिक म्हणजेच ४४९ नागरी सहकारी बँका कार्यरत आहेत. महाराष्ट्रासह, गुजरात, गोवा आणि कर्नाटक या राज्यामंध्ये मोठ्या संख्येने सहकारी बँका कार्यरत आहेत परिणामी महाराष्ट्रात मुख्य कार्यालय कार्यरत असणे अधिक सोयीचे ठरणार आहे.

बँकिंग क्षेत्रातील वाढत्या स्पर्धेत नागरी सहकारी बँकांना तंत्रज्ञानाची साथ देऊन अधिक सुरक्षित आणि सक्षम करण्यासाठी हे मुख्य कार्यालय काम करणार आहे असे नमूद करून ते म्हणाले, देशातील सुमारे १४०० नागरी सहकारी बँकामध्ये सामान्य नागरिक लहान व्यापारी आणि मध्यमवर्गीय यांचे सुमारे सहा कोटी पेक्षा अधिक पैसे बँकेत जमा आहेत. समाजातील विविध घटकांना कर्ज पुरवठा करण्यासाठी सहकारी बँकाची भूमिका महत्वपूर्ण आहे. सहकारी बँकेतील कर्मचारी यांना आधुनिक तंत्रज्ञानाचे आणि बँकिंगचे शिक्षण देणे, देशातील प्रत्येक तालुक्यातील सहकारी बँकिंगचे जाळे मोठ्या प्रमाणावर विस्तारित करणे, हा उपक्रमाचा मुख्य उद्देश असणार आहे. स्पर्धात्मक बँकिंग क्षेत्रात अन्य बँकांच्या बरोबरीने उभे राहण्यासाठी त्याचप्रमाणे जनता आणि आरबीआयचा विश्वास संपादन करण्यासाठी मुख्य कार्यालय महत्त्वपूर्ण भूमिका करणार आहे, असे त्यांनी सांगितले.

विनातारण कर्जाची मर्यादा अडीच लाख रूपायावरून ५ लाख इतकी करण्यात आली आहे. तसेच सायबर सुरक्षेसाठी सिक्युरिटी ऑपरेशन सेंटरचे उद्घाटन करण्यात आले. सहकार सीबीएस प्रणालीशी जोडण्यात आलेल्या प्रथम सहा शहरी सहकारी बँक प्रतिनिधीचा सत्कार आणि कोर बँकिंग सेवेचा प्रारंभ करण्यात आला. सहकार भारतीचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष ज्योतींद्र मेहता यांनी प्रास्ताविकात कार्यक्रमाच्या आयोजनामागची भूमिका मांडली तर एनयूसीएफडीसी मुख्य कार्यकारी अधिकारी प्रभात चतुर्वेदी यांनी आभार मानले.

देशात डिजिटल व्यवहारामध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे. यामुळे ऑनलाइन बँकिंग प्रणाली सुरक्षित होण्यासाठी न्यायवैद्यक तंत्रज्ञानाची मदत घेणे अनिवार्य आहे. यासाठी आरबीआयने म्युल हंटरसारखे उपक्रम सुरू केले आहेत. राष्ट्रीय न्यायवैद्यक विज्ञान विद्यापीठाबरोबर सांमजस्य करार करण्यात आल्यामुळे सायबर सुरक्षा, डिजिटल फसवणूक प्रतिबंध, डिजिटल फॉरेन्सिक बँकिंग सुरक्षा, कर्मचारी प्रशिक्षण यासाठी आवश्यक सुविधा केंद्रामध्ये उपलब्ध होणार आहे.

## आरबीआयचे आर्थिक धोरण सहकाराच्या बळकटीसाठीच : डॉ. उदय जोशी



**पुणे –** भारतीय रिझर्व्ह बँकेच्या वतीने जाहीर करण्यात आलेले आर्थिक धोरण तसेच सहकार क्षेत्राच्या बळकटीकरणासाठी घोषणेचे सहकार भारतीच्या वतीने स्वागत करण्यात येत आहे, अशी माहिती राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. उदय जोशी यांनी सांगितली.

आरबीआयने नवीन नागरी सहकारी बँकांना परवाने देण्याचा निर्णय घेतला आहे. सन २००३ नंतर प्रथमच हा निर्णय घेण्यात आला असून, तो सहकार क्षेत्रासाठी अत्यंत दिलासादायक आहे. तसेच निमशहरी व ग्रामीण भागातील पतपुरवठ्यातील तूट भरून काढण्यासाठी नवीन नागरी सहकारी बँकांची आवश्यकता सातत्याने अधोरेखित करण्यात येत होती. सहकार भारतीनेही नवीन सहकारी बँका स्थापन करण्यासाठी परवाने देण्याची मागणी विविध स्तरांवर सातत्याने केली होती. आरबीआयचा हा निर्णय देशातील नागरी सहकारी बँकांच्या कार्यक्षमता आणि सुशासनासाठी उपयुक्त आहे. नवीन सहकारी बँकांच्या नोंदणीसाठी आवश्यक असलेल्या प्रवेश निकषांबाबत आरबीआयने व्यवहार्य आणि वास्तववादी निकष निश्चित करावेत तसेच पुढील पाच वर्षांसाठी कार्यक्षमतेची उद्दिष्टे गाठण्यासाठी टप्प्याटप्प्याने प्रगती करण्याची संधी उपलब्ध करून द्यावी, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

निवडक सशक्त पतसंस्थांना नागरी सहकारी बँकांमध्ये रूपांतरित करण्यासाठीही आता संधी उपलब्ध होईल, असे नमूद करून ते म्हणाले प्रादेशिक ग्रामीण बँकांमध्ये जोखीम व्यवस्थापन प्रणाली लागू करण्याच्या निर्णयामुळे त्या बँकांमधील सुशासन आणि कार्यक्षमता अधिक मजबूत होईल.

## विकसित भारतातील बँकिंग विषयावर उच्चस्तरीय समिती स्थापन होणार



**नवी दिल्ली –** बँकिंग क्षेत्रातील सुधारणांसाठी ही वेळ योग्य असून विकसित भारतातील बँकिंग या विषयावर एक उच्च स्तरीय समितीची स्थापना लवकरच देशात करण्यात येणार आहे अशी घोषणा केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी केली आहे. याबाबतचा एक प्रस्ताव अर्थसंकल्पात मांडण्यात आला होता. दोन दिवसीय बँकिंग परिषदेत त्या बोलत होत्या.

बँकिंग क्षेत्राचा अभ्यास करणाऱ्या एका उच्च स्तरीय समितीची स्थापना होणे अपेक्षित आहे असे नमूद करून त्या म्हणाल्या, नजीकच्या काळात समितीची घोषणा करण्यात येणार आहे ही समिती सरकारला भूमिका आणि शिफारसी सादर करणार आहे नुकत्याच मांडण्यात आलेल्या केंद्रीय अर्थसंकल्पात समितीच्या रचनेबाबत प्रस्ताव मांडण्यात आला होता. आर्थिक स्थिरता आणि सर्वसमावेशकता आणि ग्राहक संरक्षण याचे रक्षण करीत बँकिंग क्षेत्राचा आढावा घेऊन भारताच्या विकासाच्या पुढील टप्प्याशी सुसंगत विचार करण्याची आवश्यकता आहे. विकसित भारत २०४७ चे ध्येय आता फारसे दूर नाही बँकांचे थकीत कर्ज नीचांकी स्तरावर आहे. परिणामी बँकिंग क्षेत्रातील सुधारणा पुढे नेण्यासाठी ही वेळ योग्य आहे.

# सहकार क्षेत्राशी संबंधित संस्थाही आता 'एनसीडीसी'च्या कक्षेत

# थेट कर्ज व अनुदानाचा मार्ग मोकळा होणार

**नवी दिल्ली –** सहकार क्षेत्राच्या विकासाला अधिक व्यापक आर्थिक पाठबळ देण्यासाठी राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळाच्या (एनसीडीसी) अधिकारांचा विस्तार करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे.

राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ (दुरुस्ती) विधेयक २०२६ केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी लोकसभेत आणि राज्यसभेत मांडले. लोकसभेत आणि राज्यसभेत विधेयकाला मंजुरी मिळाली या दुरुस्तीमुळे सहकारी संस्थांबरोबरच सहकार क्षेत्राच्या विकासाशी संबंधित पात्र संस्थांनाही 'एनसीडीसी'कडून थेट कर्ज आणि अनुदान मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

देशातील सहकारी क्षेत्राचा संघटित आणि सर्वांगीण विकास करण्यासाठी आर्थिक मदत देण्याच्या उद्देशाने १९६२च्या 'एनसीडीसी कायद्यां'तर्गत महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे. सध्या 'एनसीडीसी'चे कार्य प्रामुख्याने सहकारी संस्थांच्या माध्यमातून कृषी उत्पादन, अन्नपदार्थ, औद्योगिक उत्पादन, पशुधन आणि संबंधित सेवांपुरते मर्यादित होते. मात्र, गेल्या काही वर्षांत प्रक्रिया, विपणन, साठवणूक, निर्यात-आयात यांसह पायाभूत सुविधा, तंत्रज्ञान आणि वित्तीय सेवांच्या क्षेत्रातही सहकाराचा विस्तार झाला आहे.

सहकार क्षेत्राच्या विकासात राज्य सरकारी यंत्रणा, वैज्ञानिक संस्था आणि अन्य विशेष संस्था महत्त्वाची भूमिका बजावत असल्या, तरी त्यातील अनेक संस्था सहकारी संस्थांच्या स्वरूपात नोंदणीकृत नाहीत. त्यामुळे विद्यमान कायद्यानुसार 'एनसीडीसी'ला त्यांना थेट आर्थिक मदत करता येत नाही. अशा संस्थांचे प्रस्ताव राज्य सरकार किंवा सहकारी संस्थांमार्फत सादर



**केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ**

करावे लागत असल्याने प्रक्रियेला विलंब होतो आणि आर्थिक मदतीची व्याप्ती मर्यादित राहते.

प्रस्तावित दुरुस्तीमुळे सहकारी संस्था या 'एनसीडीसी'च्या प्राथमिक लाभार्थी राहणार असल्या, तरी सहकार क्षेत्राच्या विकासाशी संबंधित पात्र संस्थांनाही आवश्यक सुरक्षा घेऊन 'एनसीडीसी'कडून थेट कर्ज आणि अनुदान देता येणार आहे. अन्नप्रक्रिया, कुटीर उद्योग, हस्तशिल्प आणि अन्य औद्योगिक क्षेत्रातील सहकारी संस्थांनाही याचा फायदा होण्याची शक्यता आहे. केंद्र सरकारच्या पूर्वपरवानगीने संबंधित सहकारी संस्था आणि संस्थांच्या भागभांडवलात भागीदारी करण्याची तरतूदही प्रस्तावित करण्यात आली आहे.

या विधेयकासाठी केंद्र सरकारकडून कोणत्याही अतिरिक्त अर्थसंकल्पीय निधीची तरतूद प्रस्तावित करण्यात आली नाही. कायद्यातील दुरुस्तीमुळे एनसीडीसी'च्या विद्यमान वैधानिक आणि आर्थिक कक्षेचा विस्तार करण्यात येणार आहे तसेच प्रस्तावित कलम १३(क)नुसार एनसीडीसीला रिझर्व्ह बँक, बँकिंग कंपन्या आणि अधिसूचित वित्तीय संस्थांशी कर्जासंबंधी माहितीची देवाणघेवाण करण्याचा अधिकार मिळणार आहे. कालबाह्य झालेल्या काही तरतुदीही काढून टाकण्यात येणार आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'सहकारातून समृद्धी' या संकल्पनेला प्रत्यक्ष बळ देण्यासाठी 'एनसीडीसी'चे कार्यक्षेत्र सध्याच्या गरजांनुसार विस्तारण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. केंद्रीय गृहमंत्री आणि सहकारमंत्री अमित शहा यांच्या नेतृत्वाखाली सहकार क्षेत्राच्या विकासासाठी सुरू असलेल्या विविध प्रयत्नांमुळे 'एनसीडीसी'ची भूमिका अधिक महत्त्वाची झाली असल्याचे अधोरेखित करण्यात आले.

सरकारच्या आकडेवारीनुसार, १९६३ ते २०१४ या कालावधीत एनसीडीसीमार्फत सुमारे ४५ हजार कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला. केंद्र सरकारच्या काळात २०१४ पासून आतापर्यंत सुमारे ४.५० लाख कोटी रुपयांचा निधी देण्यात आला असून, हा निधी मागील कालावधीच्या तुलनेत जवळपास दहा पट आहे. देशातील सहकार क्षेत्राची व्याप्ती आता पारंपरिक सहकारी संस्थांपुरती मर्यादित राहिलेली नाही.पायाभूत सुविधा, तंत्रज्ञान, प्रक्रिया, विपणन, साठवणूक आणि वित्तीय सेवांसारख्या क्षेत्रांमध्ये अनेक संस्था सहकाराच्या विकासासाठी काम करीत आहेत. कायद्यातील दुरुस्तीमुळे त्यांना 'एनसीडीसी'च्या माध्यमातून थेट कर्ज व अनुदान उपलब्ध करून देणे सुलभ होईल. त्यामुळे सहकार क्षेत्राच्या विस्ताराला आवश्यक संस्थात्मक आणि आर्थिक पाठबळ मिळेल. 'एनसीडीसी'च्या कार्यक्षेत्राचा हा विस्तार 'सहकारातून समृद्धी'च्या दिशेने महत्त्वाचे पाऊल आहे.

# एआयमुळे बँकिंग क्षेत्रात ग्राहक सेवा, वित्तीय समावेशनाला चालना




**नवी दिल्ली –** कृत्रिम बुद्धिमत्ता यामुळे नागरी सहकारी बँकांमधील कर्ज वितरणाची प्रक्रिया अधिक सुलभ होण्याबरोबर ग्राहकांचा अनुभव सुधारण्यास आणि वित्तीय समावेशन वाढविण्यास मदत होणार आहे असे मत आरबीआय गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी व्यक्त केले आहे. येथे आयोजित करण्यात आलेल्या एफआयबीएसी परिषदेत ते बोलत होते.

ते म्हणाले, बँकांनी एआयचा वापर जबाबदारीने करावा, भारतीय बँकिंग क्षेत्रातील निर्णयक बदल घडवून आणणारे तंत्रज्ञान आहे. सन ९० च्या दशकात आर्थिक उदारीकरण आणि सन २०१० च्या दशकात डिजिटलायझेशन याने भारतीय बँकिंग क्षेत्राची दिशा बदलली आहे. या दशकात एआय निर्णायक भूमिका बजावणार आहे. या नवीन स्वतंत्र अशा तंत्रज्ञानाकडे प्रकल्प म्हणून पाहिले जाऊ नये, तर एआयच्या मदतीने जोखमीचे मूल्यांकन, ग्राहकांची सेवा, भांडवलाची किंमत ठरविणे आणि संस्थात्मक व्यवस्थापन यामध्ये मोठे बदल घडू शकतात असे ते म्हणाले.

एआयचा वापर कसा करायचा याबाबत स्पष्ट धोरण बँकांनी ठरविण्याची गरज आहे असे त्यांनी नमूद केले.

# सहकारात नारीशक्ती : सक्षम महिला, समृद्ध महाराष्ट्र

**दि. ३ व ४ ऑक्टोबर रोजी शिर्डी येथे सहकार क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या महिलांचे संमेलन होत आहे. त्या निमित्ताने हा लेख...**

महाराष्ट्राच्या सामाजिक आणि आर्थिक प्रगतीमध्ये सहकार चळवळीचा इतिहास अत्यंत सुवर्ण अक्षरांनी लिहिला गेला आहे. पिढ्यान्‌पिढ्या शेती, पाणलोट क्षेत्र, दुग्धव्यवसाय, पणन आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला भक्कम उभारी देण्याचे काम सहकाराने केले आहे. मात्र, काळ बदलत असताना या चळवळीची परिभाषा आणि व्याप्तीही बदलली आहे. आज या प्रदीर्घ आणि यशस्वी प्रवासाला एका नव्या, आधुनिक आणि अधिक सर्वसमावेशक उंचीवर नेण्याचे महान कार्य आपल्या महाराष्ट्राची 'नारीशक्ती' करीत आहे.

केवळ घरची चूल-मूल सांभाळण्यापुरते मर्यादित न राहता, थेट राज्याच्या आणि देशाच्या आर्थिक गणितांमध्ये मोलाचा हातभार लावण्यापर्यंतचा महाराष्ट्रातील महिलांचा प्रवास थक्क करणारा आणि प्रेरणादायी आहे. आज महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात, प्रत्येक जिल्ह्यात आणि तालुक्यात कार्यरत असणारे महिला बचत गट गृह उद्योग, पापड-लोणचे उत्पादक गट, महिला सहकारी बँक, दुग्धव्यवसाय सोसायट्या आणि विविध महिला सहकारी संस्था या आज ग्रामीण व शहरी अर्थव्यवस्थेचा खरा कणा बनल्या आहेत. जेव्हा एका महिलेच्या हातामध्ये आर्थिक प्रगतीची आणि स्वावलंबनाची सूत्रे येतात, तेव्हा केवळ ती महिलाच नव्हे, तर संपूर्ण कुटुंब आणि पर्यायाने संपूर्ण समाज प्रगतीपथावर अग्रस्थानी जातो. हाच सहकार चळवळीचा खरा आणि मूळ आत्मा आहे.




**शरद जाधव**
**प्रदेश संघटनप्रमुख,**
**सहकार भारती**
**९४२२७६१६९९**


**❊ 'महाराष्ट्र महिला सहकारिता संमेलन' आयोजन –**

महाराष्ट्रातील महिलांनी सहकाराच्या क्षेत्रात कर्तृत्व सिद्ध केले असले, तरी आजही अनेक ग्रामीण व निमशहरी भागातील महिलांना त्यांच्या या कौशल्याला आणि उत्पादनांना योग्य व हक्काची बाजारपेठ मिळवणे, आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देणे आणि धोरणात्मक निर्णयांमध्ये योग्य तो सहभाग मिळवणे यात अनेक आव्हानांचा सामना करावा लागतो. हीच मोठी पोकळी भरून काढण्यासाठी आणि महिलांच्या उद्योगशीलतेला योग्य दिशा देण्यासाठी येत्या दि ३,४ ऑक्टोबर महिन्यात शिर्डी येथे अत्यंत दिमाखात 'महाराष्ट्र महिला सहकारिता संमेलन' आयोजित करण्यात आले आहे. या महासंमेलनाचे पूर्व-नियोजन सध्या राज्यभरात अत्यंत वेगाने सुरू असून, यादरम्यान महिलांच्या कलागुणांना आणि व्यावसायिक कौशल्यांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्यावर विशेष भर दिला जात आहे.

या संमेलनाचा मुख्य उद्देश केवळ महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करणे हा नसून, त्यांना सहकार क्षेत्राच्या संचालक मंडळात, धोरणनिर्मितीत आणि उच्च निर्णय प्रक्रियेत मुख्य प्रवाहात आणणे हा आहे. आजच्या वेगाने बदलणाऱ्या डिजिटल युगात इ-कॉमर्स प्लॅटफॉर्म्सचा वापर, सोशल मीडिया ब्रँडिंग, पॅकेजिंगची आधुनिक तंत्रे, वित्तीय साक्षरता आणि व्यवसाय व्यवस्थापनाचे प्रशिक्षण महिलांपर्यंत पोहोचवणे ही काळाची अत्यंत महत्त्वाची गरज बनली आहे. हे संमेलन राज्यातील कानाकोपऱ्यातील महिला उद्योजिकांना एकाच मंचावर एकत्र आणून त्यांच्यात विचारांची देवाणघेवाण घडवून आणण्यासाठी एक सुवर्णसंधी ठरणार आहे.

**❊ संमेलनात सहभागी होणाऱ्या महिलांना याचा नेमका काय फायदा होणार?**

**व्यवसायाची वाढ आणि नेटवर्किंग :** राज्यभरातील यशस्वी महिला उद्योजिका बचत गटांच्या नेत्या आणि सहकार क्षेत्रातील तज्ज्ञांशी थेट भेटून अनुभव आणि विचार यांची देवाणघेवाण करण्याची सुवर्णसंधी मिळेल.

**शासकीय योजनांची माहिती :–** शासनाच्या महिला व सहकार क्षेत्रासाठी असलेल्या विविध अनुदान, कर्ज आणि आर्थिक योजनांची सविस्तर माहिती एकाच छताखाली मिळते.

**आधुनिक प्रशिक्षण –** व्यवसाय वाढवण्यासाठी डिजिटल मार्केटिंग, पॅकेजिंग, इ-कॉमर्स आणि वित्तीय साक्षरतेचे मोलाचे मार्गदर्शन लाभते.

**हक्काची बाजारपेठ –** महिलांनी तयार केलेल्या उत्पादनांना मोठी बाजारपेठ मिळवण्यासाठी आणि ब्रँडिंग करण्यासाठी नवे व्यासपीठ उपलब्ध होवू शकते.

**नेतृत्व संधी –** केवळ व्यवसाय न करता, सहकार क्षेत्राच्या संचालक मंडळात आणि निर्णय प्रक्रियेत आपले नेतृत्व कसे सिद्ध करावे, याची दिशा मिळणार आहे. केवळ चर्चा नव्हे, तर प्रत्यक्षात यशस्वी झालेल्या महिलांच्या 'सक्सेस स्टोरीज. या संमेलनाचे सर्वात मोठे आकर्षण म्हणजे राज्यातील तळागाळातून आपल्या कष्टाच्या जोरावर उद्योजकतेचा डोंगर सर करणाऱ्या महिलांच्या 'यशस्वी गाथा' (Success Stories) येथे ऐकायला आणि अनुभवायला मिळणार आहेत. सामान्य बचत गटापासून ते मोठ्या सहकारी प्रकल्पांपर्यंतचा प्रवास कशा प्रकारे यशस्वी केला, याची यशोगाथा खुद्द त्या महिलाच मांडणार आहेत. इतरांच्या या प्रेरणादायी प्रवासातून आपल्यालाही आपल्या व्यवसायात किंवा उपक्रमात कोणकोणते नवे प्रयोग करता येऊ शकतात, याचे उत्तम मार्गदर्शन सत्रांमध्ये मिळणार आहे. दुसऱ्यांच्या यशातून शिकून स्वतःच्या प्रगतीचा नवा मार्ग शोधण्याची ही एक सुवर्णसंधी असणार आहे.

**❊ विविध विषयांवर मार्गदर्शन करणारी विशेष माहितीपर सत्रे! –** संमेलनाचे आणखी एक मुख्य आकर्षण म्हणजे, सहकार आणि महिला उद्योजगतेशी संबंधित विविध अत्यंत महत्त्वाच्या विषयांवर तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली होणारी विशेष माहितीपर सत्रे असणार आहेत. यामध्ये खालील प्रमुख विषयांचा समावेश असेल:

**आर्थिक व वित्तीय साक्षरता –** बँक खाती, सुलभ कर्जे, सरकारी अनुदान आणि आर्थिक व्यवस्थापन कसे करावे याचे सविस्तर मार्गदर्शन.

**कायदेशीर बाबी व नियम –** सहकारी संस्थांची स्थापना, तिचे नियम, कायदेशीर कागदपत्रे आणि पारदर्शकता याविषयी तज्ज्ञांचे मार्गदर्शन.

**आधुनिक तंत्रज्ञान व डिजिटल मार्केटिंग –** सोशल मीडियाचा वापर करून उत्पादनांची विक्री कशी वाढवावी आणि ब्रँडिंग कसे करावे याचे धडे.

**पॅकेजिंग आणि गुणवत्ता नियंत्रण –** उत्पादनाचा दर्जा कसा टिकवावा आणि ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी आकर्षक पॅकेजिंगचे महत्त्व.

या पूर्व-नियोजनाच्या टप्प्यापासूनच सर्वांनी यात सक्रिय सहभाग घेणे गरजेचे आहे. आपल्या भागातील महिलांना एकत्र आणून त्यांच्या अडीअडचणी समजून घेणे, त्यांना सरकारच्या सहकार आणि उद्योगविषयक योजनांची माहिती देणे आणि त्यांच्या उत्पादनांना योग्य ब्रँडिंग मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे हे कर्तव्य आहे.जेव्हा राज्यातील प्रत्येक महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम होईल, तेव्हाच खऱ्या अर्थाने 'समृद्ध महाराष्ट्राची' संकल्पना प्रत्यक्षात उतरेल. या ऐतिहासिक आणि परिवर्तनवादी पर्वाचे साक्षीदार बनूया. सहकार चळवळीला अधिक बळकट करण्यासाठी आणि आपल्या भागातील प्रत्येक महिलेला आत्मनिर्भर बनवण्यासाठी या पूर्वनियोजनाच्या प्रवासात खारीचा वाटा उचलूया.

अधिक माहितीसाठी, पूर्व-नियोजनाच्या सहभागासाठी आणि नोंदणीसाठी आजच संपर्क वैशालीताई आवाडे महाराष्ट्र प्रदेश महिला प्रमुख मोबाईल क्रमांक ९८२२२८८८०२ साधावा ही विनंती. महिलांच्या सक्षम सहभागाशिवाय समृद्ध महाराष्ट्राची स्वप्नपूर्ती कधीही पूर्ण होऊ शकत नाही. ऑक्टोबर महिन्यातील या महासंमेलनात जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हा. आपल्या विचारांची शिदोरी मांडा आणि प्रगतीचा एक नवा इतिहास स्वतःच्या हाताने लिहा.

❊❊❊❊❊

# प्रदेश सहकार भारतीच्या वतीने ३-४ ऑक्टोबर रोजी शिर्डीत

# 'नारी शक्ति सहकारिता संमेलना'चे आयोजन

**पुणे** – महिला सहकार चळवळीची भावी दिशा आणि युवा महिला – सहकार क्षेत्रातील संधी याबरोबर अन्य विषयानवर चर्चा करण्यासाठी आणि आगामी काळातील दिशा ठरविण्याच्या दृष्टीने प्रदेश सहकार भारतीच्या वतीने दि.३ आणि ४ ऑक्टोबर रोजी शिर्डी येथे 'नारी शक्ति सहकारिता संमेलना'चे आयोजन करण्यात आले आहे.

शिर्डी येथील साई आश्रम, भक्त निवास याठिकाणी होणाऱ्या संमेलनासाठी राज्याच्या विविध भागातून अंदाजे १५०० महिला सदस्य सहभागी होणार आहेत. या संमेलनाच्या नंतर प्रत्येक जिल्ह्यात महिला सहकार मंच, तसेच प्रत्येक तालुक्यात एक आदर्श महिला सहकारी संस्था विकसित करण्यात येणार आहे. सहकारी संस्थामध्ये महिलांचे प्रतिनिधित्व वाढविणे, तसेच एक ठोस कृती आराखडा तयार करण्यात येणार आहे.

दोन दिवासीय महिला संमेलनात विविध विषयांवर चर्चा करण्यात येणार आहे त्यामध्ये देशातील सहकार आणि महिलांची भूमिका, सहकारातून महिला सक्षमीकरण, सहकारातून समृद्ध भारत – महिलांचे योगदान, विकसित भारत २०४७ – आणि महिलांची सहकारातील भूमिका, महिला नेतृत्व आणि सहकारी प्रशासन, महिला बचत गट ते सशक्त सहकारी संस्था, सहकार क्षेत्र आणि महिला उद्योजक आणि वित्त पुरवठा, युवा महिला आणि सहकार क्षेत्रातील संधी या विषयांचा समावेश असणार आहे. तसेच महिला सहकार चळवळीची भावी दिशा चिंतन, प्रशिक्षण, नेटवर्किंग यावर चर्चा करून स्वतंत्र व्यासपीठ तयार करण्यात येणार आहे.



## नारीशक्ती सहकारिता संमेलनाचे महिला व बालकल्याण मंत्री बोर्डीकर यांना निमंत्रण

**मुंबई** – सहकार भारती महाराष्ट्र प्रदेशाच्या वतीने महाराष्ट्र राज्याच्या सहकार क्षेत्रात कार्यरत महिलांसाठी ३ आणि ४ ऑक्टोबर रोजी शिर्डी येथे 'नारीशक्ती सहकारिता संमेलनाचे' आयोजन करण्यात आले आहे.

राज्याच्या महिला व बाल कल्याण, पाणीपुरवठा व स्वच्छता सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण, राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांना निमंत्रण देण्यात आले. सहकार भारतीचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष दत्ताराम चाळके व प्रदेश महामंत्री विवेक जुगादे यांनी बोर्डीकर यांना कार्यक्रमाचे निमंत्रण दिले. संमेलनासाठी उपस्थित राहून या संमेलनाचे साक्षीदार होऊ असे आश्वासन त्यांनी दिले.

## सहकार भारती पदाधिकाऱ्यांना 'नारीशक्ती सहकारिता संमेलना'चे निमंत्रण

**बुलढाणा** – येत्या दि. ३ व ४ ऑक्टोबर या कालावधीत सहकार भारती महाराष्ट्र प्रदेशच्या वतीने शिर्डी येथे नारीशक्ती सहकारिता संमेलन आयोजित करण्यात आले आहे. अधिवेशनचे निमंत्रण व माहिती सत्यजित अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटी या संस्थेतर्फे चळवळीचे प्रमुख मार्गदर्शक तथा राष्ट्रीयमंत्री, सहकार भारती दिलीप पाटील यांना देण्यात आली.

संस्थेचे अध्यक्ष तथा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस सरचिटणीस श्याम उमाळकर, अमरावती विभाग प्रमुख अमित भिसे यांनी संस्थेचे अध्यक्ष यांना निमंत्रण पत्रिका देऊन सविस्तर माहिती दिली. मुख्य कार्यकारी अधिकारी घनश्याम जोशी, वृषल शिंदे (प्रदेश संयोजक, सहकार भारती) संकेत सावजी, सहकार भारती प्रकोष्ठ प्रमुख व सहकार सुगंध विदर्भ व मराठवाडा रिजनल हेड संतोष गावंडे उपस्थित होते.



## 'भारत टॅक्सी'ची सेवा आता पुणे जिल्ह्यातही उपलब्ध होणार

**पुणे** – देशभरात केंद्र सरकारच्या वतीने नव्याने सुरू करण्यात आलेल्याभारत टॅक्सी उपक्रमाला पुणे आणि पिंपरी चिंचवड परिसरात उस्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या अभिनव सेवेसाठी आजवर ४० हजारपेक्षा अधिक वाहनाची नोदणी करण्यात आली आहे, अशी माहिती उपलब्ध झाली आहे.

सहकार क्षेत्राच्या माध्यमातून सुरू करण्यात आलेल्या भारत टॅक्सी सेवेमध्ये प्रवासी वर्गाकडून प्रादेशिक परिवहन कार्यालयाने निश्चित केलेल्या दरानुसार भाडे आकारणी करण्यात येणार आहे. या सेवेमुळे प्रवासी वर्गाला कोणत्याही वेळेत योग्य आणि वाजवी दरात प्रवास करता येणार आहे. पुणे आणि पिंपरी चिंचवड प्रमाणे जिल्ह्यातील अन्य भागातही भारत टॅक्सी सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. शहराप्रमाणे अन्य शहरात देखील यासेवेचा लाभ प्रवासी यांना घेता येणार आहे.




यासाठी संबंधित यंत्रणेमधून नोंदणी केल्यास साधारण चार ते पांच मिनिटाच्या कालावधीत वाहन उपलब्ध होणार आहे. याबाबत आरटीओ निश्चित केलेल्या दरप्रमाणे या सेवेसाठी दराची आकारणी करण्यात येणार आहे, असे स्पष्ट करण्यात आले.

# आरबीआय आपल्या दारी हा एकदिवसीय प्रशिक्षण वर्ग यशस्वी

**पंढरपूर –** महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक फेडरेशन व पंढरपूर अर्बन बँक यांच्या संयुक्त विद्यमाने आरबीआय आपल्या दारी हा एकदिवसीय प्रशिक्षण उपक्रम आयोजित करण्यात आला होता. सुरूवातीला श्री पांडुरंगाच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आले. बँकेचे अध्यक्ष सतीश मुळे यांनी पाहुण्याचा सन्मान केला.

प्रशिक्षण कार्यक्रमासाठी कॉलेज ऑफ ॲग्रीकल्चर बँकिंग रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे जनरल मॅनेजर हरिप्रसाद पटनाईक तसेच संतोष पांडे यांनी रिझर्व बँक तपासणी व गुंतवणूक बाबत धोरणात्मक बाबीबाबत मार्गदर्शन केले. फेडरेशनचे अध्यक्ष अजय ब्रह्मेचा म्हणाले, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या तज्ज्ञ अधिकाऱ्यांकडून थेट ग्रामीण भागातील पंढरपूर अर्बन बँक येथे येऊन नागरी सहकारी बँकांसाठी अत्यंत महत्त्वाची व आनंदाची बाब असल्याचे नमूद केले. प्रशिक्षण कार्यक्रमास नगर, सोलापूर, लातूर व धाराशिव जिल्ह्यांमधून विविध नागरी सहकारी बँकांचे १६० हून अधिक पदाधिकारी व संचालक उपस्थित होते.



प्रशिक्षणादरम्यान गुंतवणूक विषयक बाबी, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडून होणारे परीक्षण, निरीक्षणातील त्रुटी, दोष दुरुस्ती अहवाल याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. दैनंदिन बँकिंग कामकाज अधिक सक्षमपणे व नियमानुसार करण्यासाठी प्रशिक्षणाचा निश्चितच फायदा होईल. मध्यवर्ती ठिकाणी अशा प्रकारचे प्रशिक्षण कार्यक्रम सातत्याने आयोजित व्हावेत, अशी अपेक्षा व्यक्त करताना महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक फेडरेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रसाद पाटील यांनी बँकेने घेतलेल्या पुढाकाराचे कौतुक व आभार व्यक्त केले. बँकेचे सीईओ उमेश विरधे यांनी मनोगतात प्रशिक्षण म्हणजे मिळालेली एक महत्त्वपूर्ण संधी आहे‘ असे स्पष्ट केले.

## आदर्श को-ऑप. क्रेडिट सोसायटीचा सदस्यांना ८ टक्के लाभांश

**आटपाडी, सांगली –** येथील आदर्श को-ऑप. क्रेडिट सोसायटीच्या वतीने सदस्यांना ८ टक्के लाभांश जाहीर करण्यात आला आहे तर संस्थेला ३२ लाख ६५ हजार रूपयांचा नफा झाला असल्याचे सांगण्यात आले. संस्थेची १० वार्षिक सर्व साधारण सभा नुकतीच झाली. सभेत सर्व विषय बहुमताने मंजूर करण्यात आले. अध्यक्ष प्रकाश दौंडे सभेच्या अध्यक्षस्थानी होते.

उपाध्यक्ष दीपक देशमुख यांनी स्वागत केले तर सचिव दत्तात्रय स्वामी यांनी अहवाल वाचन आणि गत वर्षीच्या संस्थेच्या कामकाजाची आकडेवारी सादर केली. भाग भांडवल १ कोटी १० लाख ५८ हजार रुपये तर अन्य निधी ९८ लाख ५५ हजार रुपये असून ठेवी ८ कोटी ३३ लाख ४२ हजार रुपये आणि गुंतवणूक ३ कोटी ५५ लाख आणि कर्ज वाटप ७ कोटी १ लाख ७३ हजार आहे. लेखापरीक्षणात संस्थेला ‘अ’ दर्जा मिळाला आहे.

संस्थेचे पदाधिकारी, संचालक, अधिकारी ग्राहक सभेला उपस्थित होते.

## दि कोल्हापूर अर्बन बँकेच्या व्यवसायात उल्लेखनीय वाढ

**कोल्हापूर –** दि कोल्हापूर अर्बन बँकेने आर्थिक प्रगतीची वाटचाल कायम ठेवली असून व्यवसायात उल्लेखनीय वाढ केली आहे. तसेच नजीकच्या काळात १५०० कोटी व्यवसायाचे उद्दीष्ट ठेवण्यात आले आहे. बँक अध्यक्ष शिरीष कणेरकर यांनी बँकेच्या सभेत ही माहिती सांगितली.

ते म्हणाले, बँकेने एनपीएचे प्रमाण शून्य टक्के ठेवण्यात यश मिळविले आहे. तसेच ग्राहकांच्या गरजा लक्षात घेऊन बँकेने विविध प्रकारच्या कर्ज योजना कार्यान्वित केल्या आहेत.

बँकेचा सीआरएआर २६.९२ टक्के आहे तर एनपीए शून्य टक्के ठेवण्यात यश मिळविले आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर बँकेच्या रोजच्या कामकाजात मोठ्या प्रमाणावर करण्यात येतो आहे. नजीकच्या काळात बँकेच्या वतीने नेट बँकिंग सुविधा सुरू करण्यात येणार आहे.

## जनता सहकारी बँकेच्या ठेवींमध्ये लक्षणीय वाढ

**पुणे –** नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात जनता सहकारी बँकेच्या ठेवीमध्ये लक्षणीय वाढ झाली असून एकूण व्यवसायात वाढ झाली असल्याची माहिती बँकेच्या ७७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सांगण्यात आली. अध्यक्षस्थानी बँक अध्यक्ष रवींद्र हेजीब होते. या सभेत कार्यक्रम पत्रिकेवरील सर्व विषय मंजूर करण्यात आले.

बँकेच्या ठेवी १०,८११,४० कोटी इतक्या झाल्या असून बँकेने ६,७११.१७ कोटींचे कर्ज वाटप केले आहे तर एकूण व्यवसाय १७,५२२.५७ कोटी इतका झाला असून बँकेची नेट वर्थ ५५६.५२ कोटी रूपये झाली आहे. बँकेच्या वतीने उद्योग क्षेत्रासाठी कर्जाची उपलब्धता करण्यावर भर दिला जात आहे. उद्यम विकास सहकारी बँकेच्या विलीनीकरणाबाबतचा प्रस्ताव सभेने एकमताने मंजूर केला. सदस्यांनी सभेत उपस्थित केलेल्या प्रश्नांना मुख्य कार्यकारी आधिकारी जगदीश कश्यप यांनी उत्तरे दिली.

बँक अध्यक्ष हेजीब यांनी अध्यक्षीय भाषणात मागील आर्थिक वर्षात बँकेने व्यवसाय वाढीसाठी केलेले प्रयत्न आणि ग्राहकाना उपलब्ध करून देण्यात आलेल्या सेवा तसेच बँकिंग क्षेत्रासमोरील विविध आव्हाने याबाबतचा सविस्तर आढावा घेतला. तसेच आगामी काळातील बँकेच्या विविध उपक्रमांची माहिती सांगितली.

## श्री आर्य चाणक्य पतसंस्थेची दहावी शाखा सुरू

**सांगली –** येथील श्री आर्य चाणक्य नागरी सहकारी पतसंस्थेची दहावी शाखा विश्रांमबाग येथे नुकतीच कार्यरत झाली आहे. शिव प्रतिष्ठानचे संस्थापक संभाजी भिडे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

सहकार भारतीचे प्रदेश कोषाध्यक्ष गणेश गाडगीळ पतसंस्थेचे सल्लागार किशोर लुल्ला, रा. स्व. संघाचे सांगली जिल्हा संघचालक सुधीर चापोरकर, उपस्थित होते. पतसंस्थेचे आगामी काळात बँकेत रूपांतर होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. व्यवस्थापक अमित देशपांडे यांनी स्वागत तर संचालक पंकज मेकटाहता यांनी आभार आणि संचालक नरोत्तम लाटा यांनी सूत्रसंचालन केले.

# बँकिंग सुधारणांचा पुढचा टप्पा - जनतेला नेमके काय हवे! सुधारणा बँकांसाठी की सामान्य ग्राहकांसाठी?

भारतीय बँकिंग क्षेत्रासाठी पुन्हा एकदा मोठ्या सुधारणांचा टप्पा सुरू होण्याची चिन्हे दिसत आहेत. केंद्रीय अर्थमंत्री श्रीमती निर्मला सीतारामन यांनी 'विकसित भारत-२०४७'च्या उद्दिष्टपूर्तीसाठी एक उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याची घोषणा केली. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या परिषदेतून आलेल्या सूचना या समितीसमोर ठेवल्या जाणार आहेत. आज बँकिंग क्षेत्राची आर्थिक परिस्थिती पूर्वीपेक्षा अधिक मजबूत आहे. बँकांच्या अनुत्पादक कर्जाचे (NPA) प्रमाण ऐतिहासिकदृष्ट्या कमी पातळीवर आहे. त्यामुळे बँकिंग क्षेत्रात आवश्यक सुधारणा करण्यासाठी ही योग्य वेळ असल्याचे मा. अर्थमंत्र्यांनी स्पष्ट केले आहे.



विद्याधर अनास्कर
मो.नं. ९८५०९७४०७५

आपणास आठवत असेल, की यापूर्वी सन २०१५ मध्ये पुण्यामधील एन.आय.बी.एम. येथे बँकिंग क्षेत्राच्या सुधारणांसाठी 'ज्ञान-संगम' या दोन दिवसीय बँकर्स परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेला स्वतः मा. पंतप्रधानांनी मार्गदर्शन केले होते. या परिषदेला सार्वजनिक क्षेत्रातील बँका, वित्तीय संस्था, आर.बी. आय. तसेच केंद्र सरकारमधील प्रमुख अधिकारी सहभागी झाले होते. त्या वेळच्या चर्चेतून 'बँक बोर्ड ब्युरो' (BBB) ही संकल्पना पुढे आली होती. मात्र, पुढे दि. ०१ जुलै २०२२ रोजी 'बँक बोर्ड ब्युरो'ची कायदेशीर तरतूद रद्द करून, त्याऐवजी 'फिनान्शिअल सर्व्हिसेस इन्स्टिट्युशन्स ब्युरो' (FSIB) स्थापन करण्यात आले. त्या वेळी बँकिंग प्रक्रियांचे डिजिटायझेशन, जोखीम व्यवस्थापन, भांडवलाचा कार्यक्षम वापर आणि वित्तीय समावेशन (Financial Inclusion) यावर भर देण्यात आला होता.

आज तब्बल अकरा वर्षांनंतर परिस्थिती एका नव्या वळणावर आली आहे. 'विकसित भारत-२०४७' च्या उद्दिष्टपूर्तीसाठी बँकिंग क्षेत्राची भूमिका निश्चित करण्यासाठी ही समिती स्थापन करण्यात आली आहे. यासाठी अर्थमंत्र्यांनी बँकिंग क्षेत्राला पुढील सुधारणांसाठी सूचना देण्याचे आवाहन केले आहे. वास्तविक, या समितीचा उद्देश बँकिंग क्षेत्रात आणखी कोणत्या सुधारणा करावयाच्या आहेत, इतक्यापुरत्या मर्यादित नसून, या सुधारणा केवळ बँकांसाठी उपयुक्त ठरणार आहेत की सामान्य ग्राहकांसाठीही, याचाही विचार करणे आवश्यक आहे. त्यामुळे सुधारणा सुचविताना, त्या सामान्य ग्राहकाच्या बँकिंग अनुभवात नेमके कोणते बदल घडवून आणणार आहेत, याचेही विश्लेषण संबंधितांनी देणे अपेक्षित आहे.



'विकसित भारत'ची खरी कसोटी केवळ मोठ्या बँका, मोठ्या कर्जपुरवठ्याची क्षमता किंवा तंत्रज्ञानाच्या मोठ्या प्रकल्पांमध्ये नसून, सामान्य ग्राहकाला मिळणाऱ्या बँकिंग सेवा, त्यांच्या ठेवींची सुरक्षितता, कर्जावरील व्याजाचा वाजवी भार, डिजिटल व्यवहारांची सुरक्षितता तसेच तक्रारींचे जलद आणि प्रभावी निराकरण यांमध्येही विकसित भारताचे खरे प्रतिबिंब दिसले पाहिजे.

गेल्या काही वर्षांत बँकिंग क्षेत्र मोठ्या प्रमाणावर डिजिटल झाले आहे. मोबाइल बँकिंग, यूपीआय, इंटरनेट बँकिंग आणि कार्ड व्यवहारांमुळे बँकिंग सेवा अधिक सुलभ आणि वेगवान झाल्या आहेत. मात्र, केवळ डिजिटल सेवा उपलब्ध झाल्याने ग्राहकसेवा आपोआप चांगली होते असे नाही. ग्राहकांना अनेकदा चुकीचे शुल्क, अनावश्यक विमा उत्पादने, अस्पष्ट अटी व शर्ती, तक्रारींच्या निवेदनातील विलंब तसेच विविध सेवांसाठी वेगवेगळ्या पद्धतींचा सामना करावा लागतो.

या पार्श्वभूमीवर आगामी सुधारणा 'ग्राहक हा केंद्रबिंदू मानून करण्यात याव्यात. बँकिंग सुधारणांमध्ये 'कर्जाच्या किमतीतील पारदर्शकता' हा महत्त्वाचा विषय असणे अपेक्षित आहे. कर्जाच्या किमतीमध्ये कोणतेही छुपे शुल्क नसावे. कर्जाचा एकूण खर्च ग्राहकाला एका पानावर स्पष्टपणे दिसला पाहिजे. जाहीर केलेला व्याजदर आणि प्रत्यक्ष आकारला जाणारा व्याजदर यामध्ये कोणताही तफावत असू नये. व्याजाव्यतिरिक्त प्रक्रिया शुल्क, विमा, दंडात्मक शुल्क व इतर आकारणी यांची संपूर्ण माहिती सोप्या भाषेत आणि स्थानिक भाषांमधून देणे बंधनकारक केले पाहिजे. तसेच, ज्येष्ठ नागरिकांच्या वेगळ्या गरजा आणि अडचणी लक्षात घेऊन त्यांच्यासाठी 'सीनियर सिटिझन फ्रेंडली बँकिंग'चे स्वतंत्र धोरण राबविणे आवश्यक आहे.

आज ग्राहकाच्या मोबाइलमध्येच त्याचे संपूर्ण बँकिंग आहे. त्यामुळे जशा - जशा डिजिटल बँकिंग सुविधा वाढल्या आहेत, तसाच सायबर फसवणुकीचा धोकाही वाढला आहे. यामुळे या सुधारणांमध्ये 'झीरो टॉलरन्स फॉर डिजिटल फ्रॉड' ही समितीची भूमिका केंद्रस्थानी असणे अपेक्षित आहे. फसवणूक झाल्यानंतर ग्राहकाला अनेक ठिकाणी तक्रार नोंदविण्यासाठी धावपळ करावी लागू नये. त्याऐवजी 'सिंगल विंडो फ्रॉड रिपोर्टिंग' या प्रणालीद्वारे ग्राहक, बँक, पेमेंट प्रणाली आणि पोलिस यांच्यात तत्काळ समन्वय होणे आवश्यक आहे.

सध्या बँकिंग क्षेत्रासमोर ठेवी वाढविण्याचे प्रमुख आव्हान आहे. सामान्य ठेवीदाराला आपल्या पैशांची सुरक्षितता, ठेवींवरील विमा संरक्षण आणि बँकेची आर्थिक स्थिती यांबाबतची स्पष्ट माहिती मिळविण्याचा अधिकार आहे. विमा महामंडळ बँकांच्या एकूण ठेवींवर विम्याचा प्रीमियम आकारते, परंतु ठेवींना संरक्षण मात्र फक्त रु.५ लाखांपर्यंतच्या ठेवींनाच दिले जाते. या विरोधाभासाचाही विचार होणे आवश्यक आहे. नुकतेच ठेवी मिळविण्यासाठी एक प्रतिष्ठित बँकेने सुमारे रु. ४५ कोटींची अतिरिक्त व्याजाची रक्कम त्रयस्थ संस्थेला दिल्याचे प्रकरण उजेडात आले. अशा अनिष्ट गोष्टींवरदेखील कडक नियंत्रण ठेवण्याचे आवश्यक अधिकार रिझर्व्ह बँकेला दिले पाहिजेत.

मा. अर्थमंत्र्यांनी विशेषत: युवकांकडे लक्ष देणे आवश्यक आहे. भारताच्या लोकसंख्येत १५ ते २९ या वयोगटाचा हिस्सा सुमारे २९% असल्याने भविष्यातील बँकिंग धोरणामध्ये युवकांचा विचार महत्त्वाचा ठरणार आहे. युवकांसाठी केवळ डिजिटल सेवा पुरेशा नाहीत, तर शिक्षण, कौशल्यविकास, स्टार्टअप रोजगार, बचत अशा विविध टप्प्यांवर त्यांना बँकिंगची गरज आहे. त्यामुळे 'बँकिंग फॉर लाइफ सायकल' ही संकल्पना विकसित करून, युवकांच्या आर्थिक प्रवासाच्या प्रत्येक टप्प्यावर बँकेने त्यांच्या सोबत राहिले पाहिजे.

शेतकरी आणि लघुउद्योजकांच्या बाबतीत केवळ कागदपत्रांपेक्षा विश्वासार्हता आणि कॅरेक्टर स्क्रूटिनीला अधिक महत्त्व दिले पाहिजे. या अहवालामध्ये

पुढील पानावर...

# एनसीडीसीकडून राज्य सहकारी बँकेला पाच हजार कोटींचे खेळते भांडवल

**मुंबई** – एनसीडीसी या संस्थेकडून महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेला पांच हजार कोटी रुपयांचे खेळते भांडवली कर्ज मंजूर करण्यात आले आहे. इतक्या मोठ्या प्रमाणावर एनसीडीसीकडून कर्ज मंजूर होणारी राज्य सहकारी बँक ही देशातील पहिली सहकारी बँक ठरली आहे.

उपलब्ध निधीचा उपयोग राज्य सहकारी बँक स्वताच्या सभासद सहकारी संस्थांना कर्जपुरवठा करण्यासाठी करणार आहे. राज्य सहकारी बँक ही राज्यातील सहकारी बँकिंग व्यवस्थेची शिखर संस्था असून राज्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, विविध सहकारी संस्था तसेच सहकार क्षेत्रातील इतर घटकांना वित्तपुरवठा करण्यामध्ये राज्य सहकारी बँकेची महत्वपूर्ण भूमिका असणार आहे. या वित्त पुरवठ्यामुळे राज्यातील सहकारी संस्थांच्या खेळत्या भांडवलाच्या गरजा पूर्ण करण्यास तसेच त्यांच्या आर्थिक व्यवहारांना गती देण्यासाठी मोठी मदत होणार आहे. मंजूर कर्जाचा कालावधी पांच वर्षाचा असून त्याची परतफेड दहा सहामाही टप्प्यात करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

परतफेड केलेल्या मुद्दलाच्या ठराविक मर्यादेपर्यंत आणि सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. परिणामी राज्य सहकारी बँकेच्या खेळत्या भांडवलाच्या व्यवस्थापनाला लवचिकता अधिक प्रमाणात प्राप्त होणार आहे. या उपलब्ध निधीचा म्हणजे राज्य सहकारी बँकेच्या सभासद सहकारी संस्थांना कर्ज पुरवठा करणे हा आहे. देशाच्या सहकार चळवळीसाठी महाराष्ट्र राज्याने महत्वपूर्ण योगदान दिले आहे. या पार्श्वभूमीवर एनसीडीसीची भूमिका महत्वपूर्ण मानली जात आहे. सहकारी संस्थांच्या आर्थिक बळकटीसाठी केंद्र सरकारच्या सहकार मंत्रालयाच्या अखत्यारीतील एनसीडीसीची मंजूरी महत्वाची आहे. मुख्य म्हणजे या प्रक्रियेमुळे सहकारातून समृद्धी या व्यापक संकल्पनेला आर्थिक बळ देणारे महत्वाचे पाऊल असणार आहे.

महाराष्ट्राच्या सहकारी क्षेत्रासाठी हा प्रसंग नक्कीच ऐतिहासिक असणार आहे. देशातील राज्य सहकारी बँकिंग क्षेत्रात राज्य सहकारी बँकेने नवीन विश्वास निर्माण केला आहे. तसेच आर्थिक क्षमता आणि सहकार क्षेत्रातील मध्यवर्ती भूमिका महत्वपूर्ण ठरणारी आहे. राज्यातील सहकारी संस्थासाठी ही अभिमानाची घटना असणार आहे.

# सहकार क्षेत्राला एनसीडीसीचे भक्कम पाठबळ - विद्याधर अनास्कर

**पुणे** – देशातील सहकार चळवळीला आधुनिक अर्थव्यवस्थेत अधिक सक्षम करण्यासाठी संसदेने राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ दुरूस्ती विधेयक मंजूर केले आहे. या मंजुरीमुळे केवळ नोंदणीकृत सहकारी संस्थाच नाही तर सहकार क्षेत्राच्या विकासामध्ये योगदान देणार्या बिगर सहकारी संस्थांना थेट कर्ज, अनुदान आणि भांडवल उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे, असे मत राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर यांनी व्यक्त केले आहे.

ते म्हणाले, विद्यमान कायद्यातील सहकारी संस्थेमार्फत या शब्दापेक्षा आता सहकारी विकासासाठी अशी सुधारणा करण्यात आली आहे. यामुळे नागरी सहकारी बँकासाठी स्थापन करण्यात आलेली एनबीएफसी राज्य आणि राष्ट्रीय फेडरेशन असोसिएशन आयटी व सॉफ्टवेअर कंपन्यांना एनसीडीसीकडून थेट निधी उपलब्ध होणार आहे. या दुरुस्तीनुसार केवळ शेतमाल नाही तर प्रक्रियायुक्त अन्न पदार्थ याचा वित्तपुरवठ्यात समावेश करण्यात आला आहे. पारदर्शकता राखण्यासाठी महामंडळ सिबिल आणि वित्तीय संस्थाशी माहितीची देवाण घेवाण करू शकणार आहे.

देशातील १४७२ नागरी बँकापैकी १०० कोटींपेक्षा कमी ठेवी असणाऱ्या ७८६ लहान बँकांना मोठ्या प्रमाणावर पाठबळ मिळणार आहे असे नमूद करून ते म्हणाले, तोट्यातील अथवा भांडवल पर्याप्ततेचे प्रमाण राखण्यासाठी संघर्ष करणार्या जिल्हा बँकामध्ये एनसीडीसी आता केंद्र सरकारच्या परवानगीने भांडवली गुंतवणूक करू शकणार आहेत.

**मागील पानावरून...**

# बँकिंग सुधारणांचा पुढचा टप्पा...

सरकारी बँकांचे मूल्यमापन केवळ नफा आणि बाजारमूल्याच्या आधारे न होता, त्यांची ग्रामीण भागातील पोहोच, सामाजिक बँकिंग (जे व्यापारी बँकांना मान्य नाही) लघु-सूक्ष्म- मध्यम उद्योगांना कर्जपुरवठा, ग्राहक समाधान आणि आर्थिक समावेशन या आधारावर केले पाहिजे.

या सर्व सुधारणांमध्ये सरकारी बँकांचा आणि सहकारी बँकांचा स्वतंत्रपणे विचार होणे आवश्यक आहे. ग्रामीण भागातील शेतकरी, लघुउद्योजक, छोटे व्यापारी आणि मध्यमवर्गीय ग्राहकांपर्यंत सहकारी बँका पोहचल्या आहेत. त्यामुळे सहकारी बँकांना आधुनिक तंत्रज्ञान, सक्षम भांडवल, व्यावसायिक व्यवस्थापन आणि योग्य नियमनांची जोड देऊन त्यांना सक्षम करणे अत्यंत आवश्यक आहे.

ग्राहककेंद्रित या सुधारणा अपेक्षित असतानाच 'तंत्रज्ञान' हा या सुधारणांमधील अत्यंत महत्त्वाचा स्तंभ आहे. त्यामुळे आर्टिफिशल इंटेलिजन्सचा (AI) उपयोग केवळ ग्राहकसेवेपुरता मर्यादित न ठेवता, कर्जनिर्णय, फ्रॉड डिटेक्शन, रिस्क असेसमेंट, ग्राहकांच्या गरजांचे विश्लेषण आणि वैयक्तिक आर्थिक सल्ला यांसाठीही केला पाहिजे. मात्र, अंतिम निर्णय पूर्णपणे मशीनवर सोपविता कामा नये; त्यामध्ये मानवी निर्णयाचे महत्त्वाचे स्थान असले पाहिजे. तंत्रज्ञानाचा खरा उपयोग तेव्हाच होईल, जेव्हा ते ग्रामीण भागातील ग्राहकांनाही सहज आणि सोप्या पद्धतीने वापरात येईल. या दृष्टीने बँकिंग तंत्रज्ञानाचा विकास स्थानिक भाषांमध्ये विकसित झाला पाहिजे.

मा. अर्थमंत्र्यांनी घोषणा केलेल्या या समितीसमोर अनेक धोरणात्मक प्रश्न असतील. बँकांचे आकारमान, भांडवल, तंत्रज्ञान, डिजिटल बँकिंग, बँकांची भूमिका, कर्जवाढ, ठेवी, सायबर सुरक्षा, जागतिक स्पर्धा आदी विविध विषयांवर समितीला विचार करावा लागणार आहे. परंतु या सर्व प्रश्नांच्या केंद्रस्थानी एक साधा आणि महत्त्वाचा प्रश्न असेल, तो म्हणजे या सुधारणांमुळे सामान्य ग्राहकाचे बँकिंग आणि दैनंदिन आर्थिक जीवन किती सोपे होणार आहे?

विकसित भारतासाठी 'विकसित बँकिंग' आवश्यक आहे. २०४७ पर्यंत आपण विकसित भारताचे स्वप्न पाहत आहोत. त्यासाठी पायाभूत सुविधा, उद्योग, रोजगार, तंत्रज्ञान आणि गुंतवणूक आवश्यक आहे. या सर्वांसाठी सक्षम, विश्वासार्ह आणि लोकाभिमुख बँकिंग व्यवस्था असणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे आगामी समितीसमोर केवळ बँका कशा मोठ्या होतील आणि अधिक नफा कसा कमावतील हे उद्दिष्ट असण्यापेक्षा त्या कशा अधिक सक्षम, अधिक पारदर्शक, अधिक सुरक्षित आणि अधिक ग्राहकाभिमुख होतील, हे उद्दिष्ट असणे अपेक्षित आहे.

**– विद्याधर अनास्कर, मो. नं. – ९८५०९७४०७५**
Email Id : v_anaskaryahoo.com *****

# ज्येष्ठ बँकिंग तज्ज्ञ व जनता सहकारी बँकेचे माजी अध्यक्ष अरविंद खळदकर यांचे निधन



**पुणे** – जनता सहकारी बँकेचे माजी अध्यक्ष, डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे माजी अध्यक्ष, भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेचे माजी विश्वस्त, महाराजा शिवछत्रपती प्रतिष्ठानचे माजी विश्वस्त, सहकार भारती नागरी बँक विभागाचे मार्गदर्शक आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ स्वयंसेवक अरविंद केशव खळदकर (वय ८४) यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

विविध विषयांचा व्यासंग असलेले खळदकर तल्लख बुद्धिमत्तेचे कुशल प्रशासक होते. आयकर खात्यातून उपायुक्त पदावरून त्यांनी १९९४ मध्ये स्वेच्छानिवृत्ती घेतली आणि त्यानंतर ते अखेरपर्यंत कर सल्लागार म्हणून काम करत होते. जनता सहकारी बँकेचे ते १९९७ पासून संचालक व २००१ पासून अध्यक्ष होते. त्यांच्या कार्यकाळात जनता सहकारी बँक आर्थिक अडचणीतून बाहेर आली. ज्याचे रिझर्व्ह बँकेने देखील विशेष कौतुक केले होते. याबाबतचे त्यांचे 'नवल वर्तले' हे पुस्तक विशेष गाजले. मराठी आणि इंग्रजीतून प्रकाशित झालेले हे पुस्तक बँकिंग क्षेत्रात अभ्यासासाठी घेतले जाते. त्यांच्या कार्यकाळात जनता बँकेला बहुराज्यीय बँकेचा दर्जा मिळाला.

शेअर बाजाराशी मैत्री, जोडोनिया धन शेअर्स व्यवहारे, गुंतवणुकीचे शास्त्र ही त्यांची पुस्तके वाचकप्रिय झाली. शेअर मार्केट, गुंतवणूक, बँकिंग आणि सहकार या विषयांवर अनेकदा व्याख्याने दिली आणि विविध नियतकालिकांमधून विपुल लेखनही केले होते. संत साहित्याचा त्यांचा विशेष अभ्यास होता. मराठी, इंग्रजी आणि संस्कृत भाषांवर त्यांचे विशेष प्रभुत्व होते.

# सांगली अर्बनच्या विश्रामबाग शाखेचे नूतनीकरण व विस्तारित लॉकरचे उद्घाटन



**सांगली** – सांगली अर्बन बँकेच्या आजवरच्या वाटचालीप्रमाणे सहकार क्षेत्रातील अन्य संस्थांनी आधुनिक तंत्रज्ञान आणि ग्राहकांचा विश्वास यांची सांगड घालून पुढे जाण्याची आवश्यकता असल्याचे मत आमदार सुधीर गाडगीळ यांनी व्यक्त केले. सांगली अर्बन को-ऑप. बँक विश्रामबाग शाखेचे नूतनीकरण व विस्तारित लॉकरचे उद्घाटन आमदार गाडगीळ यांच्या हस्ते करण्यात आले. रा. स्व. संघाचे महानगर संघचालक डॉ. प्रियदर्शन चितळे उपस्थित होते.

बँकेचे अध्यक्ष सीए श्रीपाद खिरे, व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष गणेश गाडगीळ, उपाध्यक्ष संजय पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी उल्हास नायक, संचालक सीए अनंत मानवी, हणमंतराव पाटील, संजय धामणगांवकर, कालिदास हरिदास, सागर घोंगडे, स्वाती करंदीकर, अश्विनी आठवले, रविंद्र भाकरे आणि मनोज कोरडे, तज्ज्ञ संचालक सीए सागर फडके, सरव्यवस्थापक वासुदेव दिवेकर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व बँक संस्थापक स्व. अण्णा गोडबोले यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. त्यानंतर फीत कापून नूतनीकृत शाखा व विस्तारित लॉकरचे उद्घाटन करण्यात आले. हर्षल वैद्य यांनी सहकार गीत सादर केले संचालक संजय धामणगांवकर यांनी प्रास्ताविक स्वागत व कार्यक्रमाची भूमिका मांडली. बदलत्या बँकिंग क्षेत्रात ग्राहकांना आधुनिक, तत्पर, सुरक्षित आणि दर्जेदार सेवा उपलब्ध करून देणे. तसेच ग्राहकांचा अनेक वर्षांचा विश्वास अधिक दृढ करणे, हा शाखा नूतनीकरण व लॉकर विस्तारामागील प्रमुख उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.

नूतन विस्तारित लॉकरचे ग्राहक गणपती मंदिर ट्रस्टचे गजानन लोहगावकर यांना आमदार गाडगीळ यांच्या हस्ते चावी प्रदान करण्यात आली. सिद्धिविनायक नागरी सहकारी पतसंस्थेचे व्यवस्थापक वाडकर यांना ठेव पावती डॉ. चितळे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आली. बँकेशी दीर्घकाळ जोडलेल्या विविध क्षेत्रांतील ग्राहकांचा तसेच उद्योजक श्रीकांत तारळेकर, केदार खरे, पोलीस कर्मचारी सहकारी पतसंस्थेचे अभिजित पाटील यांचा सत्कार करण्यात आला.

बँकेच्या माजी संचालिका डॉ. संपदा कानिटकर यांचा संचालिका स्वाती करंदीकर यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. तसेच उद्योजक अमोल रास्ते, मोहन जगताप, जयवंत माने, बांधकाम व्यावसायिक तात्यासाहेब खोत उद्योजिका. वर्षा मालेदार, पार्थ चव्हाण, जया जोशी यांचा सत्कार झाला. विश्रामबाग शाखेच्या वाटचालीत योगदान दिलेल्या माजी शाखाधिकारी नारायण पाटील, अरविंद पुराणिक, सुरेश कोटीभास्कर, प्रमोद गोसावी, महावीर चौगुले यांचा सन्मान करण्यात आला. वास्तुविशारद सचिन साळुंखे, बांधकाम समिती सल्लागार अभियंता विवेक चौथाई, कंत्राटदार जोशी यांचा सत्कार झाला. ग्राहकांच्या वतीने श्रीकांत तारळेकर, जयवंत माने, तात्यासाहेब खोत, ॲड. योगेश कुलकर्णी यांनी मनोगत व्यक्त केले.

व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष गणेश गाडगीळ यांनी परिवर्तनच्या माध्यमातून बँकेला कशाप्रकारे प्रगतीपथावर आणले याबाबत सांगितले. बँकेचे अध्यक्ष खिरे यांनी बँकेच्या प्रगतीचा आढावा घेत ग्राहकाभिमुख सेवेसाठी बँकेची कटिबद्धता व्यक्त केली. प्रमुख पाहुणे डॉ. प्रियदर्शन चितळे यांनी संघ शताब्दी निमित्ताने पंच परिवर्तनविषयी मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन प्रसिद्धी अधिकारी संदीप कुलकर्णी यांनी संचालक सागर घोंगडे यांनी आभार मानले.

## शंकर नागरी सहकारी बँकेच्या संचालकपदाची निवडणूक बिनविरोध

**नांदेड** – येथील शंकर नागरी सहकारी बँकेच्या संचालकपदाची निवडणूक बिनविरोध झाली. जिल्हा उपनिबंधक शाहूराज हिरे आणि निवडणूक अधिकारी के. बारकूल यांनी काम पाहिले. प्रवीण पोकर्णा, मनोज भंडारी, नम्रता तरोडेकर हे संचालक म्हणून निवडून आले. नवीन संचालक मंडळातील सदस्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

## वनश्री नानासाहेब महाडीक मल्टिस्टेट सोसायटी कार्यविस्तार करणार

**पुणे** – येथील वनश्री नानासाहेब महाडीक मल्टिस्टेट अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटीने शहरात कार्याचा विस्तार केला असून गुलटेकडी परिसरात संस्थेची नवीन शाखा सुरू करण्यात आली आहे. केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते नूतन शाखा सुरू करण्यात आली आहे. मल्टिस्टेट अध्यक्ष सुरेश वाबळे, संस्था संस्थापक राहुल महाडीक आदी यावेळी उपस्थित होते. संस्था अध्यक्ष सतीश महाडीक उपाध्यक्ष प्रदीप पाटील, तसेच संचालक, अधिकारी यावेळी उपस्थित होते.

# बँकिंग आणि सहकार चळवळीचे मार्गदर्शक हरपले...




**सहकार भारती नागरी बँक विभागाचे मार्गदर्शक, पुणे जनता सहकारी बँकेचे माजी अध्यक्ष, डेक्कन एज्येकशन सोसायटीचे माजी अध्यक्ष, भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेचे माजी विश्वस्त, महाराजा शिवछत्रपती प्रतिष्ठानचे माजी विश्वस्त, मोरया हॉस्पिटल (चिंचवड) चे माजी विश्वस्त आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ स्वयंसेवक अरविंद केशव खळदकर यांचे वयाच्या ८४ व्या वर्षी अल्पशा आजाराने नुकतेच निधन झाले. त्यांच्या पवित्र स्मृतीस आदरांजली वाहणारा हा लेख....**

खळदकर मूळचे सासवडजवळच्या पारगाव-नेमाणे येथील. त्यांची संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली आणि सोपानदेव या भावंडांवर भक्ती होती, प्रेम होतं. ज्ञानेश्वरी आणि दासबोध हे ग्रंथ जवळपास त्यांचे मुखोद्गत होते. यातील अनेक संदर्भ त्यांनी अनेकदा रोजच्या व्यावहारीक जीवनात वापरले. संतसाहित्यातून मिळालेलं सार त्यांनी अनेकदा आपल्या भाषणांमधून आणि गप्पांमधून सर्वांना वाटलं. मराठी, इंग्रजीबरोबरच संस्कृत भाषेवर त्यांचे विशेष प्रभुत्व होते. अनेक पुस्तकं ते कायम वाचत असत आणि अनेकांना वाचनाची प्रेरणा देत असत.

आयकर खात्यातून उपायुक्त पदावरुन १९९४ मध्ये स्वेच्छानिवृत्ती घेतलेल्या अरविंदरावांचा स्वभाव बहुदा सरकारी नोकरीमुळे 'अरे ला कारे' म्हणण्याचा, काहीसा रागीट वाटावा असा होता. मात्र जी जी मंडळी त्यांच्या जवळ गेली त्यांना अरविंदरावांनी आपलेसे करुन टाकले, मित्र बनवले होते. अत्यंत स्पष्टवक्ते असूनही त्यांच्या वागण्या-बोलण्यातून त्यांनी कोणालाही साधा ओरखडा देखील येऊ दिला नाही. हे कसब त्यांच्या ठायी होतं, ज्याला त्यांच्यातील अध्यात्मिक बैठकीचं अधिष्ठान होतं. त्यांनी वकिली, कर सल्लागार म्हणून केलेला व्यवसाय असो की त्यांनी स्विकारलेली एखादी संस्थेची सामाजिक जबाबदारी असो, त्यांची कोणतेही कार्य तडीस नेण्याची हातोटी मात्र जबरदस्त होती. विविध विषयांचा व्यासंग असलेले अरविंदराव तल्लख बुध्दीमत्तेचे कुशल प्रशासक होते.

अरविंदरावांचे महाविद्यालयीन काळातले मित्र म्हणजे स्व. मदनदासजी देवी (पूर्व सहसरकार्यवाह, रा.स्व.संघ). त्यांच्यामुळेच त्यांना संघकार्याची विशेष आवड निर्माण झाली. तरुण पणात त्यांना संघाचा परिचय झाला आणि ते संघाचे होऊन गेले. आयकर विभागातून स्वेच्छानिवृत्ती घेतल्यानंतर अरविंदरावांनी स्वदेशी जागरण मंचाच्या कामाला सुरुवात झाली आणि त्यांचा एका अर्थाने आर्थिक संस्थांशी संबंध येऊ लागला. दरम्यानच्या काळात देशातील सुप्रसिध्द आणि प्रदीर्घ परंपरा लाभलेल्या डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या नियामक मंडळाचे अध्यक्षपदही भूषविले, ऐतिहासिक परंपरा लाभलेल्या भांडारकर संस्थेचेही ते विश्वस्त राहिले. चिंचवडच्या मोरया हॉस्पिटलच्या विश्वस्त म्हणून देखील त्यांनी आपल्या कामाची छापव पाडली. कोणतेही पद ही मोठी जबाबदारी असते, ती प्रामाणिकपणाबरोबरच निष्ठेने निभावणे अत्यंत आवश्यक आहे, असे ते म्हणायचे आणि प्रत्यक्षातही वागायचे.

१९९६ मध्ये पुणे जनता सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणूकीत ते निवडून आले. ज्या मंडळाचे नेतृत्व ज्येष्ठ बँकर वि. श्री. दामले आणि हरिभाऊ मिरासदार यांच्याकडे होते. तेथूनच त्यांनी बँकिंगचे धडे गिरवले. अरविंदराव नेहमी म्हणत असत, की मला इन्कम टॅक्स कळतो पण बँकिंग नाही. जे आपल्याला माहित नाही, ज्याचे ज्ञान आपल्याला नाही, हे मोकळेपणाने मान्य करण्याइतका मोठेपणा त्यांच्या ठायी होता. पुणे जनता सहकारी बँकेचे १९९७ पासून संचालक व २००१ पासून ते अध्यक्ष राहीले होते. त्यांच्याच कार्यकाळात जनता सहकारी बँक आर्थिक अडचणीतून बाहेर आली, ज्याचे रिझर्व्ह बँकेने देखील विशेष कौतुक केले होते. जनता बँकेचा १९९७ ते २०११ असा खडतर आणि धास्तावणारा काळ होता, ज्यावेळी अरविंदराव पहाडासारखे उभे होते. बँक या संकटातून जात असतांना अरविंदरावांच्या समर्थ नेतृत्वाखाली संचालक मंडळाने धाडसी निर्णय घेतले आणि त्याची अचूक अंमलवजावणी केली. मार्च २००२ मध्ये सुमारे २८०० कोटींचा व्यवसाय असलेल्या जनता बँकेने मार्च २०१४ अखेर १० हजार कोटींचा टप्पा पूर्ण करुन बहुराज्यीय दर्जाही मिळवला आणि खऱ्या अर्थाने या बँकेने ऐतिहासिक कामगिरी करुन दाखवली, ज्याचे आजही बँकिंग क्षेत्रात संदर्भ दिले जातात. या सर्व काळात त्यांना बरोबरीने साथ दिली ते विजय भावे, सदानंद जोशी, सदानंद भागवत, जयंत काकतकर, जगदीश कश्यप या आणि अशा सर्वच अधिकारी मंडळींनी. त्याचबरोबर संचालक मंडळातील हरिभाऊ मिरासदार, संजय लेले, सुधीर पंडीत, जगदीश कदम, डॉ. मुकुंद तापकीर या ज्येष्ठ संचालकांनी आणि अन्य सहकाऱ्यांनी अरविंदरावांना खंबीरपणे साथ दिली. अरविंदराव नेहमी म्हणत, त्यागी आणि समर्पित सेवक, निष्ठावान खातेदार, संयमी भागधारक (सभासद) आणि धाडसी व अचूक निर्णय घेणारे नि:स्वार्थी संचालक मंडळ आणि कुशल व अनुभवसंपन्न मुख्य कार्यकारी अधिकारी या पाच घटकांच्या अथक परिश्रमाने आणि समर्पणामुळेच जनता बँकेचे 'टर्न अराऊंड' झाले. यशाचे सर्व श्रेय त्यांनी कायम या पाच घटकांनाच दिले. स्वत:ला कधीही नाही. तडफेने आणि धडाकेबाज पध्दतीने त्यांनी जनता बँक अडचणीतून केवळ बाहेर काढली नाही तर तिचा मोठा विस्तारही केला. या बँकेच्या कारकिर्दीचा धांडोळा घेणारे, अडचणीतून मार्ग काढणारे अनेक मुद्दे, आठवणी त्यांनी शब्दबध्द केल्या आहेत, एका विशेष अशा यशोगाथेतून, ज्याचे शिर्षक आहे - 'नवल वर्तले', तेही श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या शब्दातलेच! 'नवल वर्तले' हे पुस्तक विशेष गाजले. मराठी आणि इंग्रजीतून प्रकाशित झालेले हे पुस्तक बँकिंग क्षेत्रात अभ्यासासाठी घेतले जाते. अरविंदरावांच्या जीवनातले जनता बँक हे एक 'महापर्व' होते, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

अरविंदराव सिध्दहस्त लेखक होते. त्यांनी लिहिलेली शेअर बाजाराशी मैत्री, जोडोनिया धन शेअर्स व्यवहारे, गुंतवणूकीचे शास्त्र ही त्यांची पुस्तके वाचकप्रिय झाली, त्याच्या अनेक आवृत्या निघाल्या. शेअर मार्केट, गुंतवणूक, बँकिंग आणि सहकार या विषयावर अनेकदा व्याख्याने दिली आणि विविध नियतकालिकांमधून विपुल लेखनही केले. बँकिंग आणि सहकाराचा चालता-बोलता इतिहास हरपल्याची अनेकांची भावना आहे. सहकार भारतीच्या कामात देखील अरविदरावांनी सक्रीय सहभाग घेतला. सहकार भारतीच्या माध्यमातून महाराष्ट्रातील अनेक नागरी सहकारी बँकांना त्यांचे मार्गदर्शन लाभले. अत्यंत चोख व्यवहार, कायद्याची, नियमांची प्रचंड जाण, बँकिंग क्षेत्रातलं अत्यंत 'व्हिजनरी' नेतृत्व आणि समाजभान जपणारा सत्शील 'माणूस' म्हणून अरविंदरावांची इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंद होईल. अरविंदरावांना भावपूर्ण श्रद्धांजली! शांती...

**- भालचंद्र कुलकर्णी (संपादक -सहकार सुगंध)**
**मो. नं.- ९८२२८८२५०९ *******

# व्यवसाय वृद्धिसाठी सहकारी बँकांनी प्रयत्न करण्याची गरज - सतीश मराठे




**नाशिक** – नागरी सहकारी बँकांनी आपला व्यवसाय १०% ते १५% कसा वाढेल याकडे लक्ष द्यायला हवे. केवळ व्हॉटस् पवर मेसेज पाठवून, फेसबुक पोस्ट करून मार्केटिंग करून चालणार नाही, तर चांगले कर्जदार शोधून, कर्ज व्यवहार वाढवण्यावर भर देणारे मार्केटिंग करणे काळाची गरज आहे, असे भारतीय रिझर्व्ह बँक व नाबार्डचे संचालक सतीश मराठे यांनी सांगितले.

सहकार भारती सहकार प्रशिक्षण सहकारी संस्थेच्या वतीने, आयोजित केलेल्या नागरी सहकारी बँकांच्या प्रशिक्षण कार्यशाळेच्या समारोप समारंभात ते बोलत होते. ते म्हणाले, सहकारी बँकांमधील प्रत्येक घटकांची क्षमता, कौशल्य वाढली पाहिजे त्यासाठी प्रशिक्षण घेणे आवश्यक आहे. सहकारी बँकांमधील थकीत कर्जांचे प्रमाण कमी झाल्याचे आढळते, निव्वळ नफ्यात अपेक्षित वाढ झालेली दिसत नाही, त्यासाठी अभ्यासपूर्वक व्याजदर निश्चित करण्याची आवश्यकताही त्यांनी अधोरेखित केली.

प्रशिक्षण कार्यशाळेचे उद्घाटन सहकार भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. उदय जोशी यांनी केले. त्यांनी सहकार भारतीच्या कार्याची माहिती सांगितली, उद्घाटन समारंभास विशेष अतिथी म्हणून नाशिक जिल्हा उपनिबंधक कुंदन भोळे उपस्थित होते.

सुशासनाच्या माध्यमातून संचालक मंडळाची कार्यक्षमता कशी वाढवता येईल याविषयी भारतीय रिझर्व्ह बँकेचे उपसरव्यवस्थापक मनिष कुमार यांनी मार्गदर्शन केले. डीपीडीपी अॅक्ट व त्याचा सहकारी बँकांवर होणारा परिणाम याबाबत कल्याण जनता सहकारी बँकेचे माजी अध्यक्ष सीए सचिन आंबेकर यांनी सादरीकरणासह विषय मांडणी केली. कायद्याची आवश्यकता, त्यातील तरतुदी, कायदा अंमलबजावणीसाठी करावी लागणारी सिध्दता, कायद्याचे पालन न केल्यास होणारी दंडात्मक कारवाई याविषयी सविस्तर माहिती सांगितली.

जोखीम व्यवस्थापन या विषयावर महाराष्ट्र अर्बन को ऑप बँक्स् फेडरेशनचे अध्यक्ष सीए अजय ब्रम्हेचा यांनी मार्गदर्शन केले. व्यवसाय करताना कोण कोणत्या जोखीम येऊ शकतात. त्याबाबत कोणती उपाययोजना करणे आवश्यक आहे. सहकारी बँकेतील प्रत्येक घटकाने याविषयी कसे जागरूक असले पाहिजे, याविषयी त्यांनी सादरीकरणासह सविस्तर माहिती सांगितली. सहकार भारती सहकार प्रशिक्षण सहकारी संस्थेचे अध्यक्ष संजय बिर्ला यांनी प्रास्ताविकात स्वागत केले व प्रशिक्षणाचे महत्त्व विषद केले.

संस्थेचे उपाध्यक्ष शरद जाधव यांनी संस्थेच्या विविध प्रशिक्षण कार्यक्रमांची माहिती सांगितली आणि आभार मानले. सहकारी बँकांमधील नवीन कर्मचारी भरतीसाठी परिक्षा आयोजित करण्यास संस्थेला शासनाकडून अनुमती मिळाल्याचे त्यांनी सांगितले.

प्रशिक्षण कार्यशाळेस उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ व मुंबईतील, ३२ सहकारी बँकांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, व्यवस्थापन मंडळ सदस्य व मुख्य कार्यकारी अधिकारी उपस्थित होते.

सूत्रसंचालन प्रशिक्षण प्रमुख व्यंकटेश कुलकर्णी यांनी तर वक्त्यांचा परिचय संचालक उदय पेंडसे यांनी करून दिला. संचालिका संध्या कुलकर्णी उपस्थित होत्या.

# डोंबिवली नागरी बँकेच्या अध्यक्षपदी गणेश धारगळकर व उपाध्यक्षपदी सीए अभिजीत मराठे

## संचालक मंडळाची निवडणूक बिनविरोध



गणेश धारगळकर
अध्यक्ष



सीए अभिजित मराठे
उपाध्यक्ष

**डोंबिवली** – डोंबिवली नागरी सहकारी बँकेच्या नवनियुक्त संचालक मंडळाची बिनविरोध निवड झाली आहे. संचालक मंडळात एकूण ११ संचालक यांचा समावेश आहे. बँकेच्या अध्यक्षपदी गणेश धारगळकर आणि उपाध्यक्षपदी सीए अभिजित मराठे यांची निवड करण्यात आली आहे

संचालक मंडळात योगेश चौधरी, सतीश पटवर्धन, डॉ. प्रसाद पत्की, नरेंद्र म्हसकर, गजानन गोडबोले, सुधा अय्यर, सीए मनोज उततूरकर, सीए मधुरा ठक्कर यांचा समावेश आहे. आगामी काळात डिजिटल बँकिंग, व्यावसायिक क्षेत्राला अधिक सक्षम सुविधा उपलब्ध करून देणे, ग्राहकांसाठी विविध सेवांचा विस्तार आणि विविध योजना सुरू करणे यांवर अधिक भर देण्यात येणार आहे, तसेच गुजरात आणि कर्नाटक राज्यात शाखा विस्तार करणे यावर भर दिला जाणार आहे, असे सांगण्यात आले.

# आर्थिक समावेशनाची प्रक्रिया : सहकारी बँका व पतसंस्थांची भूमिका



संतोष मानूरकर

आर्थिक समावेशन ही संकल्पना जरी सन २००५ पासून आली असली, तरी प्रत्यक्षात तिची सुरुवात ही देशाच्या आर्थिक नियोजनापासूनच झालेली आहे. आर्थिक समावेशन (Financial Inclusion) म्हणजे समाजातील सर्व घटकांना विशेषतः आर्थिकदृष्ट्या वंचित असलेल्या घटकांना परवडणाऱ्या (Affordable) सहज प्राप्त होतील (Accessable) व पुरेशा (Adequable) प्रमाणात आर्थिक सुविधा पुरविणे होय. आपल्या देशाने कल्याणकारी राज्याची संकल्पना स्वीकारलेली असून समाजातील सर्व घटकांचे कल्याण हे ध्येय निश्चित केलेले आहे.

**※ आर्थिक समावेशनाचे उद्दिष्टे :-**

१) लोकांमध्ये बचतीच्या सवयी वृद्धिंगत करणे.

२) प्राप्त बचतीतून गुंतवणुका विशेषतः पायाभूत सुविधामधील गुंतवणुका वाढविणे.

३) शासकीय योजनांचे लाभ थेट लाभधारकांच्या बँक खात्यात जमा करणे.

४) गरजूंना संस्थात्मक कर्जपुरवठा करणे जेणेकरुन खासगी सावकारीला आळा बसेल.

५) विमा, पेन्शन यांसारख्या सुविधा उपलब्ध करून देणे.

आर्थिक समावेशन प्रक्रियेची सुरुवात व प्रगती यांचा अभ्यास केल्यास १९६९ साली १४ बँकांचे व १९८० साली ०६ बँकांचे राष्ट्रीयीकरण हा एक महत्त्वाचा टप्पा असून बँकिंग सुविधा या ग्रामीण, अर्ध-शहरी भागात पोहोचविण्याच्या दृष्टीने ते एक महत्त्वपूर्ण पाऊल होते. १९६९ सालची अग्रणी बँक योजना, १९७६ साली स्थापना झालेल्या प्रादेशिक ग्रामीण बँका हे देखील महत्त्वाचे पाऊल समजले जाते.

१९८२ साली नाबार्डची स्थापना करण्यात आली, तिचा मुख्य उद्देश शहरी भागातून ग्रामीण भागात निधी / पैशाचा प्रवाह गतिमान करणे हा होता. नाबार्ड ही एक बँकांना पुनर्वित पुरवठा करणारी संस्था असून ग्रामीण पतपुरवठ्यातील शिखर बँक आहे. ती राज्य सहकारी बँका, प्रादेशिक ग्रामीण बँकांना पुनर्वित पुरवठा करत असल्याने ग्रामीण भागातील लोकांना स्वस्त व्याजदरात कर्ज उपलब्ध होते. आर्थिक समावेशनात नाबार्ड खालीलप्रमाणे भूमिका अदा करते.



१) स्वयं सहायता गट ही संकल्पना नाबार्डने १९९२ साली प्रथम आणली असून ती जगातील सर्वांत मोठी लघुवित्त पुरवठा करणारी ठरली आहे. या गटातील सभासद या महिला असल्याने महिला सक्षमीकरणाला मोठा हातभार लागत आहे.

२) KCC कार्ड योजना ही १९९८ साली सुरु झाली असून लहान सीमांत शेतकऱ्यांना वेळेत कर्जपुरवठा करणे हा प्रमुख उद्देश आहे.

३) संयुक्त दायित्व गट (JLG Group) :-

यामध्ये भूमिहीन, बटईदार शेतकरी यांना विनातारणी कर्ज प्राप्त होतात. रिझर्व्ह बँकेने १९८० च्या दशकात बँकांना अग्रक्रम क्षेत्र कर्जपुरवठा (Priority Sector Lending) चे लक्षांक निर्धारित करून दिलेले आहे. आज ही व्यापारी, सहकारी, लघुवित्त, प्रादेशिक ग्रामीण, परदेशी बँकांना रिझर्व्ह बँकेच्या सूचनेप्रमाणे कृषी, सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग, गृह कर्जे, नवीकरणीय ऊर्जा (Renewable Energy) शैक्षणिक कर्जे, निर्यात या क्षेत्रांसाठी रिझर्व्ह बँक लक्षांक घालून देत आहे. त्यामुळे समाजातील बरेच घटक या अंतर्गत आर्थिक समायोजनांच्या कक्षेत येत आहेत. त्यातून त्यांची कर्जाची गरज भागून त्यांच्या उपजीविकेचा प्रश्न मार्गी लागून त्यांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावत आहे.

२१ व्या शतकातील पहिल्या ०२ दशकांत आर्थिक समावेशन प्रक्रियेने जोर पकडला. त्याची प्रमुख कारणे म्हणजे २० व्या शतकातील १९८० ते १९९० च्या दशकात संगणकीकरणाची सुरुवात झाली तो पहिला टप्पा होता. सन २००० ते २०१० हा इंटरनेट व कोअर बँकिंगचा टप्पा... याची आर्थिक समावेशनात प्रमुख भूमिका राहिली असून तो दुसरा टप्पा म्हणता येईल. सन २००४ व २००५ मधील इलेक्टॉनिक फंड ट्रान्सफर (NEFT / RTGS / IMPS) मुळे आर्थिक सुविधा व्यक्तींना सहज प्राप्त होऊ लागल्या. २०१४ पासून आजपर्यंतचा कार्यकाल हा डिजिटल क्रांतीचा कालावधी समजला जातो. या अंतर्गत प्रधानमंत्री जनधन योजना ही २०१४ साली सुरू झालेली योजना अत्यंत महत्त्वाची ठरली असून दि. ३१/०३/२०२६ अखेर या अंतर्गतच्या खात्यांची संख्या ही ५७.७१ कोटी आहे. ज्यांची पूर्वी बँकांमध्ये खाती नव्हती अशा बँकेपासून वंचित घटकांना या खात्याच्या माध्यमातून रु.२.०० लाख अपघाती विमाकवच, अधिकर्ष सवलत अशा सुविधा मिळत आहेत. प्रादेशिक ग्रामीण बँकानी सन २०२५-२६ मध्ये या योजने अंतर्गत ५४.९८ लाख बँक खाती उघडली आहेत. १ जानेवारी २०१३ रोजी केंद्र शासनाने थेट लाभ हस्तांतरण (DBT) प्रणाली सुरू केल्याने कल्याणकारी योजनांचे पैसे थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा होतात, त्यामुळे बँकेत खाते नसलेल्या अनेक लोकांची बँक खाती उघडली गेली व त्यांचा आर्थिक समावेशनात सहभाग निश्चित झाला आहे. सन २०१५ मध्ये सुरू झालेली पी.एम. मुद्रा योजनेमुळे असंघटित क्षेत्रातील छोट्या उद्योगांना, फेरीवाल्यांना, कारागिरांना आर्थिक सुविधा, कर्जे प्राप्त होऊन ती बँकिंग प्रवाहात आली आहेत. त्याचबरोबर २०१५ साली सुरू झालेल्या अटल पेन्शन योजनेमुळे असंघटित क्षेत्रातील कंत्राटी कामगारांस त्यांच्या वयाच्या ६० व्या वर्षानंतर पेन्शन योजना चालू केल्याने त्या वर्गाचा आर्थिक समावेशनात सहभाग निश्चित झाला आहे.

लघुवित्त बँका (Small Financial Banks), पेमेंट बँका या समाजातील विशिष्ट घटकांना म्हणजेच ज्या बँकिंग सेवेपासून दूर आहेत. त्यांना बँकिंग सेवा देण्यासाठी रिझर्व्ह बँकेद्वारा परवानगी दिलेल्या विशेषीकृत बँका (Differentiated Banks) असून आर्थिक समायोजन हा अशा बँका स्थापनेमागील मुख्य हेतू आहे. सद्य:स्थितीत भारतात (११) लघुवित्त बँका व (५) पेमेंट बँका कार्यरत आहेत. या दोन्हीपैकी लघुवित्त बँका या व्यापारी बँकाप्रमाणेच ठेवी स्वीकारतात व प्रामुख्याने लहान उद्योगांना, असंघटित क्षेत्रातील व्यक्तींना कर्जपुरवठा करतात. मात्र पेमेंट बँका या प्रति ग्राहक रु.२.०० लाखांच्या मर्यादेत केवळ मागताक्षणी परत करावयाच्या ठेवी (Demand Deposits) स्वीकारतात. या बँका कर्जपुरवठा करीत नाहीत. ग्राहकांना डेबिट / ए.टी.एम कार्ड सुविधा देतात. तसेच म्युच्युअल फंड, पेन्शन, विमा अशा सुविधा वितरणाची भूमिका पार पाडतात. पेमेंट बँका या स्थलांतरित मजूर, बांधकाम मजूर व असंघटित क्षेत्रातील व्यक्तींना वित्तीय सेवा जसे, की इतरत्र पैसे पाठविणे वगैरे उपलब्ध करून देतात.

२०१६ साली रिझर्व्ह बँकेने NPCI च्या माध्यमातून UPI सुविधा चालू केली व डिजिटल पेमेंट व्यवहारांची प्रचंड मोठ्या प्रमाणात सुरुवात झालेली असून केवळ माहे जुलै २०२६ या एका महिन्यामध्ये एकूण २३६५.८३ कोटी UPI व्यवहार झाले असून त्यामध्ये रु. २९.८८ लाख

पुढील पानावर...




# श्री आनंद नागरी सहकारी पतसंस्थेचा सभासदांना आठ टक्के लाभांश

**कळवण, नाशिक –** येथील श्री आनंद नागरी सहकारी पतसंस्था वार्षिक सर्वसाधारण सभा येथे संस्थेचे अध्यक्ष सुनील जैन यांच्या अध्यक्षतेखाली झाली. सभेत सदस्यांना ८ टक्के लाभांश जाहीर करण्यात आला.

व्यवस्थापक राजेंद्र जुन्नरे यांनी संस्थेचा ताळेबंद नफा तोटा व अंदाजपत्रक व नफा वाटणे याबाबत संस्थेच्या सभासदांना माहिती सांगितली. अध्यक्ष जैन यांनी संस्थेच्या ठेवी भाग भांडवल याबाबत सभासदांना माहिती देऊन सभासदांनी आपली ठेव सुरक्षित आहे तेथेच ठेवावी अशी सूचना केली. संस्थेला यावर्षी निव्वळ नफा ६३ लाख ४४००० झाला असून या नफ्यातून आठ टक्क्यांइतका लामांश जाहीर केला. संस्थेच्या वतीने कमको बँकेची अध्यक्ष शालिनी महाजन व संस्थेचे ज्येष्ठ संचालक प्रभाकर पाटील यांची भारतीय राष्ट्रीय काँग्रेस जिल्हा उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला.

सभेला संस्थापक अध्यक्ष सुनील जैन पदाधिकारी संचालक, अधिकारी ग्राहक सभासद उपस्थित होते. आभार प्रसाद कोठावदे यांनी सूत्रसंचालन प्रा. भिका भारती यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी राजेंद्र जुन्नरे, प्रसाद कोठावदे शहीद शेख, तुकाराम जाधव, सुनीता जगताप, संजय भानसी, रामदास महाजन, संगीता कापडणे यांनी परिश्रम घेतले.

या सभेला पतसंस्थेचे सभासद, ग्राहक, खातेदार उपस्थित होते.

मागील पानावरून...

# आर्थिक समावेशनाची प्रक्रिया....

कोटी रक्कमांचे व्यवहार घडून आले आहेत. आर्थिक समावेशनाच्या या सर्व प्रयत्नामुळे समाजातील बहुतांश घटकांना कर्जे, विमा, पेन्शन यांसारख्या बाबींचे लाभ देणे शक्य झालेले आहे. डिजिटल बँकिंगमुळे आर्थिक व्यवहारांमध्ये पारदर्शकता, कर चुकवेगिरी, काळा पैसा, भ्रष्टाचार यांना आळा बसत आहे. अर्थव्यवस्थेची वाटचाल ही Cashless कडे चाललेली आहे. UPI, बँकिंग ॲप्स, इंटरनेट बँकिंग, डिजिटल वॉलेटस यामुळे व्यक्ती केव्हाही, कुठेही आर्थिक व्यवहार करू शकत आहेत. त्यामुळे वेळेची व खर्चाची बचत होत आहे, त्यामुळे भौगोलिकदृष्ट्या कितीही दूर असलेल्या व्यक्तीशी व्यवहार करताना सुलभता आली आहे.

मात्र या विषयीची दुसरी बाजू पाहता आर्थिक समावेशनात काही आव्हानेही आहेत.

१. डिजिटल फसवेगिरी २. सायबर हल्ले

अशा धोक्यांमुळे आर्थिकदृष्ट्या व विशेषतः बँकिंग साक्षरता नसलेल्या लोकांमध्ये एक प्रकारची भीती आहे. त्यासाठी साक्षरतेच्या माध्यमातून विश्वास निर्माण करणे गरजेचे आहे. भारताचा सध्याचा आर्थिक समावेशनाचा दर ७० टक्के असून मागील काही वर्षांत तो सतत वाढत जात आहे, ही नक्कीच समाधानकारक बाब आहे. मात्र आर्थिक समावेशन ही निरंतर चालणारी प्रक्रिया असल्याने त्याबाबत सतत प्रयत्न करणे आवश्यक असते.

**✲ आर्थिक समावेशनात सहकारी बँका व पतसंस्थांची भूमिका :–**

आर्थिक समावेशनाचे उद्दिष्ट ठेवून शासन आपल्या स्तरावर विविध माध्यमांतून कार्यरत आहे. रिझर्व्ह बँक इतर बँकांच्या मदतीने त्यात आपली भूमिका अदा करीत आहे. त्याचबरोबर ग्रामीण भागात आजही ज्या गावात बँका नाहीत, त्या ठिकाणी पतसंस्था या आर्थिक समावेशनात आपली भूमिका नेटाने पार पाडत आहेत. स्मॉल फायनान्स बँका ज्याप्रमाणे छोटे उद्योग, असंघटित क्षेत्रातील व्यक्ती यांना कर्जवाटप करतात. त्याचप्रमाणे सहकारी बँका व पतसंस्था देखील ग्रामीण भागात छोट्या छोट्या कर्जदारांना कर्जवाटप करीत आहेत. नागरी सहकारी बँका / पतसंस्थांचा सभासद हा मुख्यत: समाजातील निम्न मध्यम व गरीबवर्ग असून अशा वर्गाच्या आर्थिक गरजा या बँका व पतसंस्था भागवित असून वीज बिल भरणा केंद्र, RTGS सारख्या सुविधा ही पुरवत आहेत. पतसंस्था सदस्यांना कर्जपुरवठा करीत असल्याने त्यांचे असंघटित क्षेत्रावरील म्हणजेच मित्र, नातेवाईक, सावकार यांचेवरील अवलंबित्व कमी झाले आहे. सभासदांच्या बचती अर्थव्यवस्थेच्या मुख्य प्रवाहात येण्यास मदत झाली आहे. सहकारी बँका / पतसंस्थामधील सेवक हे स्थानिक असल्याने त्यांना स्थानिक भाषा येत असते. स्थानिक बाजारपेठेचे, संभाव्य कर्जदाराचे चारित्र्य, व्यवहार यांबाबत चांगली माहिती असते. या ज्ञानाचा त्यांना कर्जवाटपात फायदा होत असतो. तसेच सभासदांची कर्जाची गरज भागल्याने तोही समाधानी असतो. आर्थिक समावेशन प्रक्रियेस सहकारी बँका व पतसंस्था गती देतात.

पतसंस्था या सभासदांमध्ये बचत काटकसरीची सवय लावत आहेत. पतसंस्थांनी ठरावीक कर्जदारांना मोठ्या प्रमाणात कर्जपुरवठा करण्याऐवजी छोटी छोटी कर्जे देऊन जास्तीत जास्त सभासदांना कर्जपुरवठा करून आर्थिक समावेशनात आपली चोख भूमिका बजावली आहे व बजावत आहेत. नागरी सहकारी बँकांनी व पतसंस्थांनी आर्थिक समावेशनाचा दृष्टिकोन ठेवल्यास त्यांच्या कासा ठेवींच्या प्रमाणातही वाढ होऊ शकते. त्यांना कासा ठेवींचे आदर्श प्रमाण राखणे यामुळे निश्चितच सुलभ होणार आहे. तसेच या बँका / पतसंस्थांनी समाजातील सर्व घटकांना मोफत आर्थिक साक्षरता आणि कर्जाबद्दल समुपदेशन प्रदान करणे ज्यायोगे ठेव, कर्ज, विमा आणि डिजिटल उत्पादनांसह विविध आर्थिक उत्पादनांबद्दल आर्थिक जागरूकता निर्माण होऊन सामान्य लोकांना चांगले आर्थिक नियोजन आणि आर्थिक शिस्त अनुसरण्यास मदत होईल. अशा प्रशिक्षित लोकांमधूनच सहकारी बँका / पतसंस्थांना संभाव्य कर्जदार मिळतील. थोडक्यात सहकारी बँकांना व पतसंस्थांना आर्थिक समावेशन प्रक्रियेत लोकांना सामावून घेण्यासाठी मोठी संधी आहे व ती त्यांनी घेतली पाहिजे.

**– संतोष मानूरकर,**
**विशेष लेखापरीक्षक वर्ग १, सोलापूर**
M.com, CAIIB, D.T.M., G.D.C. A.
**मो. नं. – ९८५०७८३९८३**

*****

# वारणा उद्योग समूहाचे प्रमुख डॉ. विनय कोरे सहकार भारतीच्या वतीने सन्मानित

**सांगली** – वारणा उद्योग समूहाचे प्रमुख आमदार डॉ. विनय कोरे यांना महाराष्ट्र शासनाचा सहकार भूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला. याबद्दल सांगली जिल्हा सहकार भारतीच्या वतीने (ग्रामीण विभाग) सत्कार करण्यात आला.



महाराष्ट्रात सहकार क्षेत्रात वारणा सहकार उद्योग समूहाने मोठे योगदान दिले आहे. सहकार, शैक्षणिक, अर्थकारण आणि सामाजिक क्षेत्रात या समूहाने दिशादर्शक काम केले आहे. याबद्दल त्यांना सहकार भूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. सहकार भारती सांगली जिल्ह्याचे अध्यक्ष सुमंत महाजन यांनी शाल, पुस्तक आणि अभिनंदन संदेश देऊन सत्कार केला.

संदेश पत्रात म्हटले आहे की, सहकार भारती ही देशभरातील सहकार चळवळीला बळकटी देण्यासाठी कार्यरत असलेली संघटना असून सहकारी संस्थांचा विकास, सहकार कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण, सहकाराविषयी जनजागृती, स्वावलंबी व सक्षम सहकारी संस्थांची निर्मिती आणि सहकाराच्या माध्यमातून समाजाचे आर्थिक उत्थान यासाठी सातत्याने कार्यरत आहे. सहकार क्षेत्रातील ज्ञान, प्रशिक्षण आणि उत्तम कार्यपद्धती समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचविणे हा सहकार भारतीच्या कार्याचा महत्त्वपूर्ण भाग आहे. आपल्या नेतृत्त्वाखालील वारणा सहकारी साखर कारखाना, वारणा सहकारी दूध उत्पादक प्रक्रिया संघ, वारणा सहकारी बँक, वारणा महिला सहकारी संस्था, वारणा बाजार तसेच शिक्षण आणि विविध सामाजिक-आर्थिक उपक्रम यांचा विस्तार झाला आहे. सहकार हा केवळ आर्थिक व्यवहाराचा मार्ग नसून शेतकरी, महिला, कामगार, उद्योजक, विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनमानात सकारात्मक परिवर्तन घडविण्याचे प्रभावी माध्यम आहे हे कार्यातून सिद्ध झाले आहे. त्यामुळे सहकार भारती आपले मनापासून अभिनंदन करत आहे असे महाजन यांनी संदेश पत्रात लिहिले आहे. यावेळी महाजन यांनी सहकार भारती च्या कार्याविषयी सविस्तर माहिती दिली.

आमदार डॉ. कोरे म्हणाले की सहकार भारतीचे कार्य माहिती आहे. वारणा सहकार समुहातील संस्था सहकार भारतीशी आपण जोडू असे आश्वासन यांनी दिले. यावेळी उद्योजक स्वानंद महाजन, डॉ. शिवाजी जाधव, प्रकाश मोहरेकर, शहाजी पाटील उपस्थित होते.

## सांगली अर्बनचे दहा हजार कोटींचे व्यवसायाचे उद्दिष्ट

**सांगली** – सांगली अर्बन सहकारी बँकेच्या वतीने आगामी काळात दहा हजार कोटी व्यवसायाचे उद्दिष्ट ठरविले असून यासाठी व्हिजन २०३५ तयार करण्यात आला आहे. नव्याने ९८ शाखांचा विस्तार करण्याचा मानस आहे. बँकेने नुकत्याच सदस्यांसाठी ८ टक्के लाभांश जाहीर केला. बँक अध्यक्ष श्रीपाद खिरे यांनी ही माहिती सर्वसाधारण सभेत जाहीर केले.

उपाध्यक्ष संजय पाटील व्यवस्थापन मंडळ अध्यक्ष गणेश गाडगीळ संचालक, सीए अनंत मानवी, तसेच अन्य संचालक अधिकारी ग्राहक उपस्थित होते. सभेच्या आधी सायबर सिक्युरिटी या विषयावर सुजीत जोशी यांनी माहिती सांगितली संदीप कुलकर्णी यांनी त्यांचा परिचय करून दिला.

बँक संस्थापक स्व. अण्णा गोडबोले यांच्या प्रतिमेचे पूजन आणि दीप प्रज्वलन करण्यात आले. अध्यक्ष खिरे यांनी सांगितले की, बँकेने २३२८ कोटींचा एकूण व्यवसाय केला आहे तर कर्ज वितरणात २२।५१ टक्के वाढ करण्यात आली आहे. तसेच ठेवीमध्ये ९.३४ टक्के वाढ झाली आहे. निव्वळ नफा ६.६५ कोटी झाला आहे थकबाकी २२ टक्क्यांवरून पावणे तीन टक्क्यांवर आली आहे.

## भगिनी निवेदिता सहकारी बँकेचा १५ टक्के लाभांश जाहीर

**पुणे** – येथील भगिनी निवेदिता सहकारी बँकेच्या वतीने सदस्यांना १५ टक्के लाभांश जाहीर करण्यात आला आहे. बँकेची ५४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच बँक अध्यक्षा सीए रेवती पैठणकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. अहवाल वर्षात बँकेचा १७०० कोटींपेक्षा अधिक व्यवसाय झाला आहे. मुख्य म्हणजे बँकेने सलग २१ वर्षे एनपीए शून्य टक्के ठेवण्यात यश मिळविले आहे. लेखापरीक्षणास 'अ' वर्ग मिळाला आहे.

## अण्णासाहेब मगर सहकारी बँकेच्या सदस्यांना ८ टक्के लाभांश

**पुणे** – येथील अण्णासाहेब मगर सहकारी बँकेच्या सदस्यांना ८ टक्के लाभांश जाहीर करण्यात आला आहे. बँकेची २७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच पार पडली. त्यामध्ये वरील निर्णय जाहीर करण्यात आला.

बँकेचे अध्यक्ष नंदकुमार लांडे अध्यक्ष स्थानी होते. सभेत सर्व विषयांवर चर्चा झाली. त्यानंतर सर्व विषय मंजूर करण्यात आले. संचालक रामदास काळजे यांनी आभार मानले. या सभेला बँकेचे पदाधिकारी, संचालक, अधिकारी, खातेदार, तसेच ग्राहक उपस्थित होते. सभेत विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.

## संत सोपानकाका सहकारी बँकेची १० टक्के विकास निधीची तरतूद

**पुणे** – सासवड येथील संत सोपानकाका सहकारी बँक आगामी काळात आधुनिक तंत्रज्ञानावर अधिक भर देणार आहे. त्यासाठी १० टक्के विकास निधीची तरतूद करण्यात येणार आहे, अशी माहिती बँक संस्थापक अध्यक्ष आणि माजी आमदार संजय जगताप यांनी जाहीर केले आहे. बँकेच्या २९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ते बोलत होते.

संस्थेचे भाग भांडवल ३० कोटी ७६ लाख तर राखीव निधी ८२ कोटी ४८ लाख आणि ठेवी ८३१ कोटी ६४ लाख आणि कर्ज वाटप ४७६ कोटी ७७ लाख रूपये आहे. बँकेला ८ कोटी ४ लाख नफा झाला असून ९ टक्के लाभांश जाहीर करण्यात आला आहे. बँक अध्यक्ष रमणिक कोठडिया यांनी स्वागत तर मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप साबणे यांनी अहवाल वाचन केले. अनिल उरवणे यांनी सूत्रसंचालन तर प्रकाश पवार यांनी आभार मानले.

# शेती उत्पादक कंपनी संचालकांबरोबर सहकार भारतीचा संवाद



**अमरावती –** शेतकरी उत्पादक कंपन्यांचे संचालक यांचे एकत्रीकरण व संवादात्मक कार्यक्रम सहकार भारतीच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. या वेळी संचालक व पदाधिकारी उपस्थित होते.

शेतकरी उत्पादक कंपन्यांचे संचालक यांचे एकत्रीकरण व संवादात्मक कार्यक्रम हा बैठकीचा हेतू होता. शेतकरी उत्पादक कंपनी समोरील अडचणी, मार्केटची उपलब्धता, सहकार क्षेत्रातील योगदान आणि राष्ट्रीय पातळीवरील चळवळीची वाटचाल या विषयांवर दिलीप पाटील यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाची सुरुवात भारतमाता पूजन व दीपप्रज्वलनाने झाली. सहकार भारती राष्ट्रीयमंत्री दिलीप पाटील व विभाग प्रमुख अमित भिसे यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. प्रस्तावना व पार्श्वभूमी वृषल शिंदे यांनी सांगितली. सूत्रसंचालन सहकार भारती प्रकोष्ठ ॲड. संकेत सावजी यांनी केले.

# जागृतेश्वर ग्रामीण सहकारी पतसंस्था सभेत सर्व विषय मंजूर



**नागपूर –** जागृतेश्वर ग्रामीण सहकारी पत संस्था जिल्हा संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेचे अध्यक्ष संजयकुमार पुरुषोत्तम रोकडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. विषय पत्रिकेवरील एकूण ११ विषयावर सविस्तर चर्चा होऊन ठरावांना सर्वानुमते मंजुरी दिली.

संचालिका निता रोकडे अहवाल वाचन उपाध्यक्ष अजय रोकडे व आभार व्यवस्थापिका मीना चरडे यांनी मानले. दिव्यांग मूकबधीर विद्यार्थ्यांना शालेय गणवेश वाटप, ज्येष्ठ नागरिक सम्मान, गुणवंत विद्यार्थ्यांना 'गौरव पुरस्कार 'उत्कृष्ट ठेवीदार, उत्कृष्ट ग्राहक करण्यात आले. अध्यक्षस्थानी सहकार भारतीचे महाराष्ट्र प्रदेश महामंत्री विवेक जुगादे, विशेष अतिथी सदानंद वूईके, जिल्हा उपनिबंधक पंकज वानखेडे, प्रमुख मार्गदर्शक रविन्द्र वसू, राजेंद्र घाटे, अध्यक्ष नागपूर जिल्हा पतसंस्था फेडरेशन, अरुणकुमार पांडेय यांच्या हस्ते करण्यात आला.

संस्थेचे अध्यक्ष संजयकुमार रोकडे, उपाध्यक्ष अजय रोकडे, सचिव किरणकुमार झाडे व संचालक यांनी सत्कार केला. चंद्रशेखर लांडे, मंगेश सातपुते, किरणकुमार रोकडे यांचे मार्गदर्शन झाले. संचालिका अनिता झाडे यांनी प्रास्ताविक अध्यक्ष संजयकुमार रोकडे व आभार संचालिका निता रोकडे यांनी मानले.

## सहकारी संस्था स्थापन करणे सोपे, सक्षमतेने चालविणे कठीण : बटेसिंग रघुवंशी

**नंदूरबार –** सहकारी संस्था स्थापन करणे सोपे आहे. मात्र सतत सक्षमतेने चालविणे कठीण असते. कारण अनेक संस्था स्थापन झाल्यानंतर कालांतराने अडचणीत आल्या आहेत, असे माजी आमदार बटेसिंग रघुवंशी यांनी सांगितले. येथे विविध सहकारी संस्थांच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ते बोलत होते.

यावेळी बोलताना आमदार चंद्रकांत रघुवंशी यांनी सांगितले की, सहकार क्षेत्राच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिक शेतकरी शेतमजूर आणि व्यापारी यांच्या हिताचे काम करण्यात येत असून नागरिकांनी सहकारी संस्थांना सहकार्य करावे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या वतीने अनेक सहकारी संस्थांच्या लिलावाची प्रक्रिया सुरू आहे. काही संस्थांचे लिलाव थांबविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. सहकार क्षेत्रात काम करताना समाजातील विविध घटकाच्या हिताचे निर्णय घेण्यात आले आहेत.

## केशव नागरी सहकारी पतसंस्था आयोजित रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**पांढरकवडा, नागपूर –** येथील केशव नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरास मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळाला. डॉ. हेडगेवार रक्तपेढी यांचे विशेष सहकार्य शिबिराच्या आयोजनासाठी मिळाले.

शिबिराच्या सुरुवातीला भारत माता, डॉ. केशव हेडगेवार, गोळवलकर गुरुजी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. संस्थेचे संचालक प्रदीप राशतवार, नगर संघचालक डॉ. किरण मायी, यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दीपक दीकुंडवार यांनी प्रास्ताविक केले. शिबिरात १०३ रक्तदाते सहभागी झाले होते.

प्रशस्तीपत्र व भेटवस्तू देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. संस्था अध्यक्ष चंद्रशेखर खोंड, उपाध्यक्ष दौलत वाघमारे, मानद सचिव अनिल अक्केवार, संचालक, तसेच तज्ञ संचालक यावेळी उपस्थित होते.

## मूर्तीजापूर तालुका सहकार भारतीची नूतन कार्यकारिणी जाहीर

**अकोला –** अकोला जिल्ह्यातील मूर्तीजापूर तालुका सहकार भारतीची नूतन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे. अध्यक्षपदी कीर्तीकुमार भारुका यांची निवड करण्यात आली. सहकार भारती जिल्हाध्यक्ष रामेश्वर फुंडकर, महामंत्री जैनेंद्र लुंकड आदी पदाधिकारी उपस्थित होते. सहकार क्षेत्राला संस्काराची जोड देण्याचे काम सहकार भारतीच्या वतीने करण्यात येत आहे. तालुका उपाध्यक्ष म्हणून नूतन पिंपळे, सचिव म्हणून संतोष पाठक यांची निवड करण्यात आली. तसेच सदस्यांची निवड यावेळी जाहीर करण्यात आली. ज्ञानेश देशपांडे यांनी प्रास्ताविक, सूत्रसंचालन रागिनी किडे, संतोष पाठक यांनी आभार मानले.

# वीराचार्य सहकारी पतसंस्थेचा १५ टक्के लाभांश जाहीर




**सांगली –** वीराचार्य पतसंस्थेची ३३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात झाली. या सभेत सदस्यांसाठी १५% लाभांश जाहीर करण्यात आला. प्रारंभी स्वागत उपाध्यक्ष. जे. जे. पाटील यांनी केले.

प्रमुख पाहुणे म्हणून लठ्ठे एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष राजीव पाटील, दक्षिण भारत जैन सभेचे अध्यक्ष भालचंद्र पाटील, मुख्य महामंत्री अनिल बागणे, व उपस्थित होते. सभेपुढील नोटीस वाचन अध्यक्ष मोहन नवले यांनी करून वार्षिक अहवाल वाचून संस्था ५०० कोटी ठेवीची पूर्तता करीत असून १००० कोटी व्यवसायाकडे गतीने मार्गक्रमण करीत असल्याचे सांगीतले. शून्य टक्के एनपीएची परंपरा कायम राखून १५% लाभांश प्रस्तावित केल्याचे सांगितले.

सभेपुढील विषयांचे वाचन संचालक महावीर पाटील, जे. जे. पाटील, महावीर पाटील, मोहन लांडे, सुभाष मगदुम, सुनिल कोगनोळे, शशिकांत राजोबा, अरुण कुदळे, अरूण पाटील, मनोज भिलवडे, शितल सावळवाडे, व्यवस्थापक शितल मसुटगे यांनी केले. सर्व विषय एकमताने मंजूर करणेत आले. सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांना राजोबा यांनी उत्तरे देऊन शंका समाधान केले.

प्रमुख पाहुणे सागर चौगुले, अनिल बागणे व भालचंद्र पाटील यांनी मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्या. आभार सल्लागार संचालक भूपाल मगदूम यांनी मानले. राष्ट्रगीताने सभेची सांगता झाली. सभासदांना प्रा. सतिश होनराव यांनी सहकार शिक्षण प्रशिक्षण दिले. संस्थेचे सर्वश्री संचालक डॉ. अजित पाटील, अजितकुमार भंडे, एन. जे. पाटील, प्रकाश सांगावे, डी. के. पाटील, रंजना गोरवाडे, महावीर कुचनुरे, राजाराम हराळे, उत्तम कांबळे, डॉ. सुरेंद्र ठिकणे व सभासद व सेवक वर्ग उपस्थित होते.

## विद्या सहकारी बँकेची निधी हस्तांतरण करण्याची अभिनव सुविधा

**पुणे –** विद्या सहकारी बँकेच्या ग्राहकांना आता यापुढील काळात केवळ ३० सेकंदात निधी हस्तांतरण करण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. यासाठी बँकेने शाखा स्तरावर त्वरित देयक सेवा नुकतीच सुरु केली आहे. या अंतर्गत निधी हस्तांतरण सुविधा सुरू केली असून ही सेवा जलद आणि कार्यक्षम असणार आहे. साधारणपणे ३० सेकंदाच्या आत संबंधित खात्यात रक्कम जमा होणार आहे. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मिलिंद पाटणकर यांनी ही माहिती सांगितली. या नवीन सुविधेच्या माध्यमातून बँकेच्या ग्राहकांना देशभरातील अन्य बँकेतील खात्यावर निधी हस्तांतरित करता येणार आहे. त्याचप्रमाणे अन्य बँकांमधून एमपीएसच्या माध्यमातून आपल्या बँकेतील ग्राहकांपर्यंत रक्कम प्राप्त करता येणार आहे. या नवीन सुविधेमुळे तातडीची देयके आर्थिक व्यवहार वेगवान आणि सुरक्षित विश्वासार्ह होण्यास मदत होणार आहे.

नुकतीच संपलेल्या आर्थिक वर्षात बँकेच्या एकूण ठेवी ४३० कोटी इतक्या झाल्या असून बँकेच्या १३ शाखांच्या द्वारे २३४.४२ कोटी कर्ज आणि एकूण व्यवसाय ६६४.७८ कोटी झाला आहे. नेट एनपीएचे ०.४० टक्के असून बँकेला सलग तीन वर्षे 'अ' दर्जा प्राप्त झाला आहे.

## राजर्षि शाहू सहकारी बँकेचा सदस्यांसाठी ९ टक्के लाभांश जाहीर

**पुणे –** येथील राजर्षि शाहू सहकारी बँकेच्या वतीने सदस्यांसाठी ९ टक्के लाभांश जाहीर करण्यात आला. तसेच आगामी काळात बँकेच्या नव्याने ५ शाखा सुरू करण्यात येणार असल्याचे जाहीर करण्यात आले. बँकेची वार्षिक सर्व साधारण सभा नुकतीच झाली त्यामध्ये वरील निर्णय जाहीर करण्यात आला. बँकेचे अध्यक्ष पद्माकर पवार यांनी ही महाइति सांगितली. नुकत्याचा संपलेल्या आर्थिक वर्षात बँकेने एकूण १६८७ कोटीचा व्यवसाय केला असून लेखा परीक्षणात 'अ' वर्ग मिळाला आहे तर एकूण नफा ८.३० कोटी इतका झाला आहे. बँकेची आर्थिक स्थिति सक्षम असून नेट एनपीए १ टक्का आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब डोईफोडे यांनी सभेचे इतिवृत सादर केले. उपाध्यक्ष अभय मोहिते तसेच संचालक, अधिकारी, खातेदार यावेळी उपस्थित होते. रमेश सुतार अभिजीत शितोळे यांनी सूत्र संचालन केले.

## इथेनॉलचे धोरण ऊस उत्पादक शेतकऱ्यांना लाभदायक - विस्मा अध्यक्ष बी. बी. ठोंबरे



बी. बी. ठोंबरे

**पुणे –** देशातील साखर उत्पादनामुळे ऊस आणि साखरेचे दर घसरण्याचा धोका इथेनॉलच्या धोरणामुळे कमी होण्यास मदत झाली आहे. ऊस उत्पादक शेतकरी यांना त्याचा फायदा होतो आहे, असे मत वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोसिएशन अध्यक्ष बी. बी. ठोंबरे यांनी व्यक्त केले आहे.

ते म्हणाले, भारतीय वाहन उद्योगात आणि आटोमोटिव्ह रिसर्च असोसिएशन ऑफ इंडिया यांनीदेखील इथेनोल मिश्रित पेट्रोलमुळे कोणतीही समस्या निर्माण होणार नाही असा दावा केला आहे. उलट ते पर्यावरण पूरक असल्याचे स्पष्ट केले आहे. ऊस, मका, नेपियर गवत उत्पादक शेतकरी यांना आर्थिक स्थिरता देत आहे, असे त्यांनी नमूद केले. ब्राझीलमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून इथेनोलचा वापर करण्यात येत आहे. त्यामुळे ते व्यवहार्य इंधन आहे, असे ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी नमूद केले आहे.

## कल्पवृक्ष ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेला २ कोटी ११ लाख नफा

**पुणे –** येथील कल्पवृक्ष ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच झाली. त्यामध्ये सदस्यांना १३ टक्के लाभांश जाहीर करण्यात आला. तसेच संस्थेला २ कोटी ११ लाख रूपयांचा नफा झाला आहे. संस्थेला लेखा परीक्षणात 'अ' दर्जा मिळाला असल्याची माहिती सभेत सांगण्यात आली.

संस्थेचे संस्थापक अध्यक्ष नानासाहेब सूर्यवंशी आणि संचालक यांनी सरस्वती पूजन आणि दीपप्रज्वलन केले. प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन नगरसेवक रमेश निवंगुणे यांनी केले. अध्यक्ष सूर्यवंशी यांनी संस्थेच्या आर्थिक वाटचालीची आणि प्रगतीची माहिती सांगितली. संस्थेचा एकूण निधी १२ कोटी ६१ लाख रुपये असून ठेवी ३४ कोटी इतक्या आहेत.

# आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेला १५ कोटींचा नफा

## पतसंस्थेच्या नावात बदल करण्याचा ठराव मंजूर



**रायगड –** अलिबाग येथील आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेच्या नावात सुरेश पाटील आदर्श अर्बन को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी असा बदल करण्याचा ठराव येथे आयोजित २८ व्या वार्षिक सभेत मंजूर करण्यात आला. पतसंस्थेचे अध्यक्ष अभिजित सुरेश पाटील हे अध्यक्षस्थानी होते.

सभेत आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेच्या नावात बदल करून पतसंस्थेचे नाव 'सुरेश पाटील आदर्श अर्बन को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड' असे करण्याचा ठराव संचालक ॲड. आत्माराम काटकर यांनी या सभेत मांडला. तो एकमताने मंजूर करण्यात आला. सभासदांनी टाळ्यांचा कडकडाट करून ठरावाचे स्वागत केले. पतसंस्थेच्या रायगड जिल्ह्यातील नियोजित माणगाव येथील शाखेसाठी व वारजे (पुणे) येथील शाखेसाठी जागा खरेदी करण्याचा ठराव देखील सभेतच मंजूर करण्यात आला.

आदर्शचे ५८ हजार ८८६ सभासद असून रु.५९६ कोटी ८८ लाख ठेवी आहेत तसेच रु. ४६० कोटी ७३ लाख रुपये कर्ज वितरित केले असून एकत्रित व्यवसाय रु.१०५७ कोटी ६१ लाख रुपये आहे. आर्थिक वर्षात ढोबळ नफा रु. १५ कोटी ४१ लाख रुपये झाला तर ३७ टक्क्यांनी ठेवी व ४५ टक्क्यांनी कर्जवाढ झाली आहे. आदर्शची आर्थिक परिस्थिती भक्कम आहे, अशी ग्वाही अध्यक्ष पाटील यांनी भाषणात दिली.

मागील एका वर्षात रु. ३०४ कोटी रुपयांची विक्रमी व्यवसाय वाढ केली. अशी कामगिरी करणारी राज्यातील पहिली संस्था होण्याचा मान आदर्शला मिळाला. आर्थिक वर्षात १५०० कोटी रुपयांचा एकत्रित व्यवसाय तर पुढील दोन वर्षांत २५०० कोटी रुपयांचा एकत्रित व्यवसाय करण्याचा मानस असल्याचे त्यांनी जाहीर केले.

सभेपूर्वी सभासदांसाठी आयोजित प्रशिक्षण शिबिरात पतसंस्थेचे सल्लागार व बँकिंग तज्ज्ञ नितीन वाणी यांनी सभासदांना त्यांची कर्तव्ये–जबाबदारी–हक्क यांबाबत मार्गदर्शन केले. रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप नाईक सभेसाठी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. आदर्शचा पाया कसा भक्कम आहे व संस्थापक सुरेश पाटील यांनी लावलेले रोप त्यांचा मुलगा अभिजित पाटील तंत्रज्ञानाच्या साहाय्याने कसे वाढवत आहे, याची त्यांनी माहिती सांगितली.

देशासाठी शहीद झालेले जवान सुयोग अशोक कांबळे यांच्या वीरपत्नी श्रीमती निशा सुयोग कांबळे यांचा ऋणनिर्देश म्हणून शाल श्रीफळ व रु. ५१ हजारांचा धनादेश देऊन सन्मान करण्यात आला. वाघ्रण येथील कौस्तुभ मेहुल पाटील याची हवाई दलात लढाऊ विमान वैमानिक म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल संस्थेकडून सन्मान करण्यात आला. शास्त्रज्ञ व सभासद प्रदीप ताम्हाणे व सभासद यांचा सत्कार करण्यात आला.

संस्थेचे कर्मचारी ऋतुराज पाटील, रेश्मा पाटील, निखिल पाटील, ग्रीष्मा सातामकर, ऐश्वर्या पाटील हे कस्टमर सर्विस बँकिंग कोड अँड स्टँडर्ड या परीक्षेत उत्तीर्ण झाल्याबद्दल तर रेश्मा पाटील व प्रियांका वाळंज या एलएलबी परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल त्यांचे सत्कार करण्यात आले.

पतसंस्थेचे संस्थापक व संचालक सुरेश पाटील, अध्यक्ष अभिजित पाटील, उपाध्यक्ष कैलास जक्षे, संचालक सतीश प्रधान, ॲड आत्माराम काटकर, विलाप सरतांडेल, ॲड रेश्मा पाटील, ॲड वर्षा शेठ, भगवान वेटकोळी, महेश चव्हाण, श्रीकांत ओसवाल, श्रीमती सुचित्रा दिवाण, योगेश वीरकुड, तज्ज्ञ संचालक संजय राऊत, डॉ. मकरंद आठवले, कार्यलक्षी संचालिका मीनाक्षी पाटील सभेला उपस्थित होते. उपमुख्य कार्यकारी अधिकारी उमेश पाटील यांनी सूत्रसंचालन केले तर डॉ. मकरंद आठवले यांनी आभार मानले.

# जय श्रीराम नागरी सहकारी पतसंस्थेतर्फे गुणवंतांचा सत्कार



**मुरुड –** जय श्रीराम नागरी सहकारी पतसंस्थेच्या ३३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत तालुक्यातील दहावी व बारावीत सर्वप्रथम उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा व सदस्यांच्या पाल्यांचा प्रशस्तीपत्रे व रोख रक्कम देऊन जयश्रीराम पतसंस्थेचे अध्यक्ष दिलीप जोशी व संचालकांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

गुणवंतांमध्ये दीप महेंद्र घाटवळ, तुबा सज्जाद मोझर, वेदांत योगेश केने, इर्तिझा इम्तिहाज, गोलंदाज रुद्राणी हेरंब जोशी, मिताली मनोहर कोतवाल, ॲड. ओम राजन जोशी, ॲड. मोहित मोहन तांबडकर, राहुल मिलींद जोशी, विहांग विनायक निरकर, आदिती देविदास कुमरोटकर आदींचा समावेश होता. संचालक डॉ. संजय पाटील यांनी मनोगत व्यक्त केले.

उपाध्यक्ष प्रा. मेघराज जाधव यांनी पतसंस्थेच्या सदस्यांचे हक्क आणि कर्तव्ये याविषयी माहिती देताना सांगितले की, सभासदांनी किमान एक हजाराचे तरी भाग खरेदी करावेत. केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन करून सुधारित आदर्श उपविधीवर अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले. संस्थेला जिल्हा कार्यक्षेत्राची परवानगी मिळाल्याने बोर्ली–पंचतन व चेंढरे (अलिबाग), तळा पोयनाड पाली येथे शाखा विस्ताराचा प्रस्ताव मांडला. त्यास एकमताने सर्व सदस्यांनी मंजुरी दिली. सभेच्या प्रारंभी श्रीराम प्रतिमेचे पूजन ज्येष्ठ सदस्य रमेश जनार्दन कवळे यांचे हस्ते करण्यात आले.

प्रास्ताविकात अध्यक्ष दिलीप जोशी यांनी सांगितले की, पतसंस्थेकडे भाग भांडवल ४ कोटी ३ लाख रुपये असून ६४ कोटी ४३ लाख ठेवी असल्याचे स्पष्ट करत ७७ लाख ४५ हजार नफा प्राप्त केला असे सांगितले. सलग १२ वर्षे १२ टक्के लाभांशांची परंपरा या वर्षी ही कायम राखल्याचे स्पष्ट केले. आगामी वर्षात एकत्रित व्यवसाय ११५ कोटींपर्यंत जाईल असा विश्वास जोशी यांनी व्यक्त केला.

ॲड. मोहन तांबडकर, बाळकृष्ण कासार, सुनिल विरकुड, डॉ. संजय पाटील, डॉ. अमित बेनकर, प्रमोद उपाध्ये, समीर उपाध्ये, अशोक दिवेकर, जयश्री जोशी, अश्विनी पाटील, सिद्धेश गद्रे, सरव्यवस्थापक संजय ठाकूर उपस्थित होते. डॉ. संजय पाटील यांनी सूत्रसंचालन तर डॉ. अमित बेनकर यांनी आभार मानले.

# सहकार क्षेत्राला नवी दिशा...

सहकार हा भारताच्या सामाजिक आणि आर्थिक परिवर्तनाचा महत्वाचा आधार असल्याने संसदेत सादर केलेले राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ अर्थात ‘एनसीडीसी’च्या कायद्यातील सुधारणा विधेयक महत्त्वाचे आहे. देशातील सहकारी संस्थांना अधिक व्यापक आर्थिक सहाय्य मिळवून देणे, त्यांच्या कार्यक्षेत्राचा विस्तार करणे आणि ग्रामीण भागात तयार होणाऱ्या उत्पादनांना मोठी बाजारपेठ उपलब्ध करून देणे, हा या सुधारणांचा व्यापक उद्देश आहे. सध्या भारतामध्ये आठ लाखांहून अधिक नोंदणीकृत सहकार समित्या कार्यरत असून देशाची २२ टक्क्यांहून अधिक लोकसंख्या या क्षेत्रावर अवलंबून आहे. ग्रामीण भारताचा तब्बल ९८ टक्के भाग या ना त्या कारणाने सहकारी संस्थांशी जोडलेला आहे. देशाच्या एकूण स्थूल देशांतर्गत उत्पादनामध्ये म्हणजेच जीडीपीमध्ये या सहकार क्षेत्राचे योगदान सुमारे १५ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे. याच पार्श्वभूमीवर या क्षेत्राचा आवाका वाढवण्यासाठी आणि कामाला वेग देण्यासाठी केंद्र सरकारने हे सुधारणा विधेयक आणले आहे. या बदलाचा परिणाम मोठ्या लोकसंख्येवर होऊ शकतो.



सूर्यकांत पाठक
राष्ट्रीय उपाध्यक्ष
अ. भा. ग्राहक पंचायत
९४२२० १६८९५

एकट्या शेतकऱ्याची बाजारपेठेतील ताकद मर्यादित असते; मात्र अनेक उत्पादक एकत्र आले की, उत्पादन, प्रक्रिया, साठवणूक, कर्जपुरवठा आणि विक्री यांची सामूहिक व्यवस्था उभी करता येते. मध्यस्थांची साखळी कमी करून उत्पादकाला अधिक योग्य मोबदला मिळवून देणे, ही सहकाराची मूलभूत संकल्पना आहे. स्वातंत्र्यानंतरच्या काळात महाराष्ट्रात सहकार चळवळीने ग्रामीण समाजजीवन आणि अर्थव्यवस्थेचे स्वरूप मोठ्या प्रमाणात बदलले. विशेषतः सहकारी साखर कारखान्यांनी केवळ साखर उत्पादन केले नाही, तर त्याभोवती रोजगार, वाहतूक, प्रक्रिया उद्योग, शिक्षण, बँकिंग आणि स्थानिक बाजारपेठेचे एक व्यापक जाळे उभे केले. महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांची चळवळ ही ग्रामीण औद्योगिकीकरणाचा एक महत्त्वाचा प्रयोग मानली जाते. सहकार हा एका उत्पादनाचा उद्योग उभारताना त्याभोवती अनेक पूरक उद्योग निर्माण करणारा आर्थिक नमुना ठरला. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, प्राथमिक कृषी पतसंस्था आणि विविध सहकारी वित्त संस्थांनी ग्रामीण कर्जव्यवस्थेला संस्थात्मक आधार दिला. शेतकरी आणि लघुउद्योजकांना औपचारिक वित्तव्यवस्थेशी जोडण्याचे काम केले.

एनसीडीसीच्या प्रस्तावित सुधारणांमध्ये आर्थिक सहाय्याची व्याप्ती वाढविण्याचा विचार आहे. आतापर्यंत प्रामुख्याने नोंदणीकृत सहकारी संस्थांना आर्थिक मदत मिळत होती. सुधारित व्यवस्थेमुळे विकासाशी संबंधित काही अशा संस्थांनाही आर्थिक सहाय्याचा मार्ग खुला होऊ शकतो, ज्या पारंपरिक अर्थाने सहकारी संस्था नसतील, ग्रामीण भागातील प्रक्रिया उद्योग, साठवणूक व्यवस्था, विपणन, मूल्यवर्धन आणि पायाभूत सुविधांना याचा फायदा होऊ शकतो.

खाद्यपदार्थाच्या व्याख्येची व्याप्ती वाढविण्याचा प्रस्तावही महत्त्वाचा आहे. ग्रामीण उत्पादकांनी फक्त कच्चा माल विकण्याऐवजी त्यावर प्रक्रिया करून मूल्यवर्धित उत्पादन तयार करणे ही आजच्या अर्थव्यवस्थेची गरज आहे. शेतकऱ्याने टोमॅटो पिकवून बाजारात विकण्यापेक्षा त्यापासून सॉस तयार केला, आंब्यापासून प्रक्रिया केलेली उत्पादने तयार केली किंवा धान्याचे पॅकेजिंग करून विक्री केली, तर या मूल्यवर्धनातून उत्पन्नाची शक्यता वाढते; मात्र त्यासाठी भांडवल, तंत्रज्ञान, गुणवत्ता नियंत्रण आणि बाजारपेठ आवश्यक असते. याच ठिकाणी भौगोलिक मर्यादा हटविण्याचा प्रस्ताव महत्त्वाचा ठरतो. ग्रामीण भागात तयार होणाऱ्या उत्पादनांना केवळ स्थानिक बाजारपेठेपुरते मर्यादित ठेवण्याऐवजी देशभर विक्रीची संधी मिळाली, तर छोट्या उत्पादकांसाठी मोठी बाजारपेठ खुली होऊ शकते. ओडीशातील सहकारी संस्थांनी तयार केलेल्या संबलपुरी पिशव्या महाराष्ट्रात किंवा उत्तर प्रदेशात विकल्या जाणे, हे त्याचे सहज समजणारे उदाहरण आहे. महाराष्ट्रातील कोल्हापुरी चप्पल, सोलापुरी चादर, पैठणी, वारली कलाकुसर किंवा विविध ग्रामीण हस्तकला यांनाही अशा व्यापक बाजारपेठेचा फायदा होऊ शकतो; मात्र बाजारपेठ खुली करणे आणि बाजारपेठ मिळवून देणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. ग्रामीण उत्पादकाला देशभर विक्रीची परवानगी मिळाली म्हणून ग्राहक आपोआप मिळणार नाहीत. त्यासाठी दर्जेदार उत्पादन, आकर्षक पॅकेजिंग, विश्वासार्ह वितरण व्यवस्था, डिजिटल विक्री आणि ब्रँड उभारणी आवश्यक आहे. सहकारी संस्थांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार केला नाही, तर मोठ्या कंपन्यांच्या स्पर्धेत त्यांची उत्पादने मागे पडू शकतात.

**राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ म्हणजेच एनसीडीसी संशोधन विधेयक २०२६ मुळे देशांतर्गत उत्पादनांना विशिष्ट क्षेत्रापुरते मर्यादित ठेवणारी जुनी बंधने संपुष्टात येणार आहेत. ग्रामीण भागातील उत्पादक आणि कारागीर आपली उत्पादने देशभरात कुठेही सहज विकू शकतील.**

महाराष्ट्रातील सहकार चळवळीने एकेकाळी ग्रामीण भागात उद्योग उभे केले. आता पुढची गरज ग्रामीण भागातील उत्पादनांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेशी जोडण्याची आहे. साखर कारखान्यांपासून सुरू झालेली ग्रामीण औद्योगिकीकरणाची कल्पना आता अन्न प्रक्रिया, दुग्ध व्यवसाय, कृषीआधारित उद्योग, हस्तकला, वस्त्रोद्योग आणि सेवा क्षेत्रापर्यंत विस्तारण्याची वेळ आली आहे. विशेषतः तरुण पिढीला या व्यवस्थेत सहभागी करून घेणे आवश्यक आहे. तंत्रज्ञानाची जाण असलेली तरुण पिढी सहकारी संस्थांमध्ये आली, तर उत्पादन आणि बाजारपेठ यांच्यातील अंतर कमी करता येईल. डिजिटल व्यवहार, ऑनलाईन विक्री, सामाजिक माध्यमांवरील विपणन आणि आधुनिक लेखाव्यवस्थेचा वापर करून सहकारी संस्था नव्या अर्थव्यवस्थेशी जोडता येतील.

नक्षलवादाचा प्रभाव राहिलेल्या भागांमध्ये सहकारी संस्थांच्या माध्यमातून निर्माण होणाऱ्या रोजगाराच्या संधींचे महत्त्व तर आणखी मोठे आहे. हिंसा आणि असुरक्षिततेच्या सावटाखाली राहिलेल्या ग्रामीण समाजाला सुरक्षेबरोबरच रोजगार, बाजारपेठ आणि आर्थिक स्वावलंबनही द्यावे लागते. शेती, दुग्ध व्यवसाय, लघुउद्योग आणि स्थानिक उत्पादनांच्या माध्यमातून उत्पन्नाची साधने निर्माण झाली, तर तरुणांना विकासाच्या मुख्य प्रवाहाशी जोडता येते. भारतातील सहकार क्षेत्राचा विस्तार हा त्यामुळे केवळ आर्थिक विषय नाही, तो ग्रामीण समाजाच्या आत्मनिर्भरतेशी संबंधित आहे; मात्र सहकाराचा पुढचा टप्पा जुन्या पद्धतीने चालणार नाही. राजकीय हस्तक्षेप, अपारदर्शक कारभार आणि कालबाह्य व्यवस्थापन यांना दूर करून तंत्रज्ञान, व्यावसायिकता आणि बाजाराभिमुख दृष्टिकोन स्वीकारावा लागेल.

एनसीडीसी सुधारणा विधेयकामुळे ३० कोटी नागरिकांच्या आर्थिक संधी वाढण्याची शक्यता आहे; परंतु विधेयक हे साधन आहे. अंतिम परिणाम त्याच्या अंमलबजावणीवर अवलंबून असेल. सहकारी संस्थांना स्वस्त वित्तपुरवठा मिळाला, उत्पादनाला गुणवत्ता मिळाली, तरुणांना व्यवस्थापनात स्थान मिळाले आणि स्थानिक उत्पादनांना देशव्यापी बाजारपेठ मिळाली, तर ग्रामीण अर्थव्यवस्थेचे चित्र बदलू शकते. महाराष्ट्राने सहकाराच्या माध्यमातून ग्रामीण भागात उद्योग उभे करण्याचा प्रयोग केला. आता त्या प्रयोगाला, नव्या काळातील बाजारपेठ, तंत्रज्ञान आणि उद्योजकतेची जोड देण्याची गरज आहे. सहकाराचा अर्थ केवळ संस्था उभारणे नसून उत्पादकाच्या हातात आर्थिक शक्ती देणे हा आहे. ही शक्ती स्थानिक उत्पादनाला देशव्यापी बाजारपेठ मिळवून देऊ शकली, तर संबलपुरी पिशवी असो वा पैठणी, गावातील दूध असो वा शेतकऱ्याचे प्रक्रिया केलेले अन्नपदार्थ ‘स्थानिक उत्पादन ते राष्ट्रीय बाजारपेठ’ हा प्रवास ग्रामीण भारताच्या आर्थिक परिवर्तनाचा नवा अध्याय ठरू शकतो.

*****

# साखरेचा गोडवा कमी होतोय का?

**गेल्या दोन महिन्यांमध्ये साखरेच्या दराने बाजारात मोठी उसळी मारली. त्याचा परिणाम ग्राहक, कारखानदार, व्यापारी अशा विविध घटकांवर कमी-अधिक प्रमाणात होतो आहे. या निमित्ताने एकूणच साखर उद्योगाबाबत चर्चा सुरू झाली आहे. याबाबत विवेचन करण्याचा एक प्रयत्न!**



गेल्या दोन महिन्यांच्या कालावधीत साखरेचा मुद्दा मोठ्या प्रमाणावर चर्चेच्या केंद्रस्थानी राहिला आहे साखरेची उपलब्धता, दरवाढीचा वेग, आगामी सणासुदीच्या काळातील मागणीचे वाढते प्रमाण, साखर आयात करण्याची आलेली वेळ, दरातील घसरण, साखरेच्या विषयामुळे एकूणच गुळाच्या बाजारपेठेवर झालेला परिणाम आगामी हंगामातील साखरेचे उत्पादन आणि सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे सर्वसामान्य ग्राहकांची भूमिका याबरोबर आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे घरगुती आणि व्यावसायिक मागणीचे प्रमाण या सर्व बाबींचा विचार करण्याची वेळ आली आहे.

याबरोबरच आणखी एक मुद्दा महाराष्ट्राच्या दृष्टीने महत्त्वाचा वाटतो तो म्हणजे सहकारी साखर कारखान्यांची कमी होत असणारी संख्या. काही वर्षांपूर्वी महाराष्ट्रात सहकारी साखर कारखान्यांची संख्या २२५ होती. आजच्या घडीला हीच संख्या १०० पर्यंत खाली घसरली आहे, त्याला अनेक कारणे आहेत. त्याचाही पुन्हा एकदा विचार करण्याची वेळ आली आहे तर दुसरीकडे खासगी साखर कारखाने वाढत आहेत.

*** साखरेबरोबर गुळाच्या दरात घसरण –**

गेल्या दोन महिन्यांच्या कालावधीत साखर उद्योगाच्या क्षेत्रात बऱ्याच घडामोडी झाल्या आहेत. त्यातील महत्त्वाची बाब म्हणजे देशांतर्गत बाजारातील साखरेच्या दरावर नियंत्रण ठेवण्यासाठी साखरेची आयात करण्याचा निर्णय केंद्र सरकारला घेणे भाग पडले आहे. त्याचबरोबर साखरेच्या साठेबाजीला आळा घालणे आणि आगामी सणासुदीच्या काळात मागणी लक्षात घेऊन साखरेच्या किमती स्थिर राहण्यासाठी धोरण तयार करणे, साखर आयातीचा निर्णय हा बऱ्याच वर्षांनंतर घेणे भाग पडले आहे. साखर दराचा आढावा घेतला असता साधारणपणे २० ते २५ टक्क्यांपेक्षा अधिक वाढ झाली. प्रती किलोचा ४० रुपयांच्या आसपास होता. तो दर ७२ ते ७५ रुपयांवर पोचला होता पण केंद्र सरकारच्या धोरणामुळे हाच दर घसरून प्रती किलो ५८ ते ६० रुपये झाला आहे.

*** साखरेची आयात होण्यास वेळ लागणार –**

साखरेच्या दरावर गुळाचे दर अवलंबून असतात. त्याचे प्रत्यंतर गेली दोन महिन्यांच्या घडामोडीमध्ये अनुभवास आले आहे. जसे साखरेचे दर वधारले. त्याप्रमाणे गुळाच्या दरात वाढ झाली. प्रती क्विंटलचे दर ६,५०० ते ६,८०० पर्यंत वधारले पण साखरेच्या दरात घसरण होताच ५००-६०० रुपये कमी होऊन ५,८०० ते ६,२०० रुपये इतके झाले आहे. काही दिवसांपूर्वी साखरेच्या दरातील घसरण झाली आणि त्यापाठोपाठ गुळाचे दर घसरले आहेत. केंद्र सरकारने साखर आयातीचा निर्णय जाहीर केला आहे पण साखर येण्यास किमान दीड महिन्याचा कालावधी आहे. त्यानंतर दराबाबतचे चित्र स्पष्ट होणार आहे. जगातील साखर उत्पादनाचा आढावा घेतला तर ब्राझीलच्या खालोखाल भारताचा क्रमांक आहे. त्यातही भारताचा विचार करता उत्तर प्रदेशानंतर महाराष्ट्राचा क्रमांक लागतो. याखेरीज अन्य काही मोजकी राज्य आहेत. जेथे साखर उत्पादन घेण्यात येते.

*** घरगुती स्तराव साखर वापराचे प्रमाण घटले –**

देशातील लोकसंख्या वाढली. मात्र त्या तुलनेत घरगुती स्तरावर साखरेच्या मागणीत वाढ झाली नाही, असे गेल्या दहा वर्षांतील चित्र आहे. त्यामुळे केंद्र सरकारने किमान आगामी दहा वर्षांसाठी साखर उद्योगाबाबत धोरण तयार करावे, अशी अपेक्षा राष्ट्रीय साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी व्यक्त केली. घरगुती आणि व्यावसायिक स्तरावरची मागणी आणि त्याचे दर अशी स्वतंत्र दर पातळी तयार करण्याची गरज आहे. साधारणपणे देशातील साखरेचा खप काही वर्षांपूर्वी २७० ते २७५ लाख टन इतका होता आणि आजही तितकाच आहे. महत्त्वाची बाब म्हणजे देशात शुगर फ्री मार्केट ३६ टक्के आहे आणि घरगुती वापराचे प्रमाण कमी झाले आहे. साखर कारखान्यांच्या कर्जाची फेररचना तसेच ऊस तोडणीसाठी अत्याधुनिक यंत्रणाची उपलब्धता, इथेनॉलसाठी टास्क फोर्स आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी एमएसपीच्या रकमेत वाढ करण्यात यावी, तो साधारण ४००० रुपये करण्यात यावा, अशी मागणी त्यांनी केली.

*** निर्यातीनंतर आयातीची वेळ –**

गेल्या दोन महिन्यांच्या कालावधीत साखरेच्या दरात ४० ते ४५ टक्के वाढ झाली असे नमूद करून ते म्हणाले, दरवाढीचा फायदा हा शेतकरी अथवा कारखाने यांना होणार नाही. गेली काही वर्ष भारताने साखर निर्यात केली पण आयात करण्याची वेळ आली आहे. निर्यातीला २० लाख टन परवानगी मिळाली पण प्रत्यक्षात ८ लाख टन निर्यात झाली आहे. त्यानंतर निर्यात बंद करण्यात आली, अशी माहिती त्यांनी सांगितली.

*** साखरेच्या विक्रीचा दर वाढणे आवश्यक –**

माजी साखर आयुक्त शेखर गायकवाड यांनी सांगितले, गेल्या वर्षी देशात ४१ टक्के आणि राज्यात ११ टक्के साखर उत्पादन कमी झाले आहे. तसेच उसाचे राज्यातील क्षेत्र कमी झाले आहे. ते सुमारे २ लाख हेक्टर इतके आहे. तसेच साखरसाठा कमी होतो आहे. सन २०२१ मध्ये देशातून साखर निर्यात ११० लाख टन झाली. त्यानंतर गेल्या वर्षी साखर निर्यात झाली. ती ८ लाख टन साखर विक्रीचा दर ३१ तर एफआरपी ३४ रुपये आहे. हा दर परवडणारा नाही. म्हणूनच साखर विक्रीचा दर ३१ वरुन ४५ रुपये करण्यात यावा, तसेच सरकारने साखर उद्योगाबाबत धोरण ठरवावे, असे ते म्हणाले.

**– विनायक कुलकर्णी**

**मो.नं. – ९४२२३ २१६२६ ******

## साखर उद्योगाचा रखडलेला प्राप्तीकराचा प्रश्न सुटला

**पुणे – साखर उद्योगाचा अनेक वर्ष रखडलेला प्राप्तीकराचा प्रश्न केंद्र सरकारने कायम स्वरूपी मार्गी लावला असून साखर कारखान्यांना दहा हजार कोटी रुपयांची सवलत देण्यात आली आहे अशी माहिती केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी सांगितली.ते म्हणाले,राष्ट्रीय सहकार विकास महामंडळाच्या माध्यमातून राज्यातील साखर उद्योगाला ११ हजार कोटी रूपयांचा भरीव निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. त्याचप्रमाणे राजकारण बाजूला ठेवून सहकार आणि शेतकरी यांच्या कल्याणासाठी केंद्र सरकार कायमच प्रयत्नशील राहणार आहे असे त्यांनी नमूद केले.**

# पतसंस्थांच्या ठेव संरक्षणासाठी शासनाने भरीव योगदान द्यावे




**रत्नागिरी –** राज्य फेडरेशनच्या पोटनियमात सुधारणा करण्यात यावी, तसेच ठेव संरक्षणासाठी शासनाने भरीव योगदान देण्यासाठी प्रयत्न करावेत आणि प्रत्येक महिन्यात संस्थेने नवीन १० युवकांना संस्थेबरोबर सलग्न करण्याचे आवाहन फेडरेशनच्या वार्षिक सभेत करण्यात आले. राज्य पतसंस्था फेडरेशनची सभा दीपक पटवर्धन यांच्या अध्यक्षतेखाली झाली. सभेला महाराष्ट्रातल्या विविध जिल्ह्यातील विविध संस्था प्रतिनिधी सहभागी झाले होते.

फेडरेशनच्या पोट नियमात अनेक बदल सभेने मंजूर केले. फेडरेशन वर्गीकरण अन्य संस्था प्रकारात करण्यासाठी सभेने मंजुरी दिली आहे. संस्थांच्या ठेवींना संरक्षण मिळावे यासाठी शासनाचे योगदान मिळावे. योग्य यंत्रणा प्रभावी पद्धतीने कार्यान्वित करावी तोपर्यंत अंशदान भरण्याची सक्ती संस्थांवर करू नये अशा आशयाचा ठराव मंजूर करण्यात आला. पतसंस्थाना क्रेडिट इन्स्टिट्यूशन म्हणून मान्यता देण्यासाठी केंद्रीय कायद्यातील तरतुदींचा वापर आरबीआयने करावा. त्याचप्रमाणे पत संस्थाचे वाढते व्यवहार लक्षात घेऊन पतसंस्थाची श्रेणी ठरवून वर्गवारी करावी. पतसंस्थानच्या वाढीसाठी पूरक धोरण ठरवण्यात यावे, यासाठी प्रयत्न करण्याचा ठराव सभेत मंजूर करण्यात आला.

पतसंस्थांसाठी प्रशिक्षणाचे महत्व लक्षात घेऊन प्रशिक्षणासाठी सर्वंकष अभ्यासक्रम तयार करण्याची तसेच संस्थांच्या व्यवहारांचे डॉक्यूमेंटेशन कायद्याच्या चौकटीत आणण्यासाठी अर्ज करार, रोखे, इत्यादी कागदपत्राचे आदर्श नमुने पुस्तिका दोन महिन्यात प्रकाशित करण्यात येईल अशी घोषणा फेडरेशनचे अध्यक्ष पटवर्धन यांनी केली. संस्थानी आपली प्रतिमा अधिक विश्वासार्ह, शिस्तप्रिय करण्यासाठी सजग राहावे, युवा वर्गाला संस्थांशी सलग्न करण्यासाठी उपक्रम राबवावेत, प्रत्येक महिन्यात किमान १० नवीन युवक संस्थेबरोबर जोडण्याचा कार्यक्रम सर्व संस्थांनी अग्रक्रमाने राबवावा, असे आवाहन अध्यक्षीय समारोपात केले.

वार्षिक सभा आणि अभ्यासवर्गा रत्नागिरीत संस्था प्रतिनिधींच्या उपस्थितीत पार पडला. फेडरेशन महासचिव राजोबा सर उपाध्यक्ष डॉ. शिंगी, माजी अध्यक्ष काका कोयटे डॉ. भोसले, छाबडा, प्रा. आकरे, वाजे, तांबेकर, बांगर. मुख्य कार्यकारी अधिकारी लांडे. यासह विभागीय फेडरेशनचे संतोष थेराडे, सिंधुदुर्ग पतसंस्थेचे अध्यक्ष राऊळ डीसीसी बँकेचे संचालक सचिन भिंगार्डे, शिवकृपा पतसंस्थेचे अध्यक्ष गोरखनाथ चव्हाण, राजापूर कुणबी संस्थेचे अध्यक्ष मांडवकर, नागपूर पतसंस्था जिल्हा फेडरेशन अध्यक्ष राजेंद्र घाटे यांचेसह अनेक संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

जिल्हा उपनिबंधक रत्नागिरी राम कुलकर्णी यांनी अभ्यासवर्गाचे उद्घाटन केले. अभय माटे माजी अध्यक्ष जनता सहकारी बँक डॉ. सोपान शिंदे सुहास पाटणकर यांनी अभ्यासवर्गाला मार्गदर्शन केले.

# सिंधुदुर्ग जिल्हा बँकेचा कर्मचारी व कुटुंबिय स्नेह मेळावा उत्साहात साजरा



**सिंधुदुर्ग –** सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कर्मचारी व कुटुंबियांचा स्नेह मेळावा येथे मोठ्या उत्साहात पार पडला. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया व नाबार्डचे संचालक सतीश मराठे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून मेळाव्यास सुरुवात झाली. स्वागत बँकेचे अध्यक्ष मनीष दळवी यांनी केले. बँकेने मागील पाच वर्षांत केलेल्या कामकाजाच्या आढावा पुस्तिकेचे प्रकाशन मराठे यांच्या हस्ते करण्यात आले.

बँकेचे अध्यक्ष मनीष दळवी, उपाध्यक्ष अतुल काळसेकर, संचालक गजानन गावडे, प्रकाश मोरये, आत्माराम ओटवणेकर, गणपत देसाई, रवींद्र मडगावकर, विठ्ठल देसाई, नीता राणे, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिरुद्ध देसाई, कर्मचारी संचालक सुनील फणसेकर, देवेंद्र धुरी, सहकार भारतीचे राष्ट्रीय संघटक मंत्री संजय पाचपोर, राज्य काजू महामंडळ संचालक तथा सहकार भारती कोकण विभाग प्रमुख धनंजय यादव, सहकार भारतीचे राष्ट्रीय उपाध्यक्ष शैलेश दरगोडे, संघटन प्रमुख शरद जाधव, जिल्हा बँकेचे कर्मचारी व त्यांचे कुटुंबीय उपस्थित होते.

भारतात गेल्या १०-१२ वर्षांत आर्थिक परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे, असे नमूद करून मराठे यांनी सांगितले की, भारताचा बँकिंग सेक्टरचा ग्रोथ नॅशनल ग्रोथपेक्षाही चांगला आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्याचा आर्थिक विकास झपाट्याने होईल, असा विश्वास आहे. पूर्वी शेती १००% पावसावर अवलंबून होती. आज ५५-६५% शेती सिंचनाखाली आली आहे. भारताचे फायनान्शियल इकोसिस्टिम मजबूत करण्यासाठी प्रयत्न झाले. आज पब्लिक सेक्टर बँका प्रायव्हेट बँकांच्या तोडीस तोड नफा कमवत आहेत. गेल्या ८ वर्षात जन-धन खात्यांमुळे ५० कोटी लोक औपचारिक बँकिंगमध्ये आले. रिटेल क्रेडिट ग्रोथ वाढला. २५ कोटी लोक दारिद्र्य रेषेच्यावर आले आहेत. गेल्या ४-५ वर्षांत ५ कोटी नवीन लघु उद्योजक उभे राहिले आहेत. ग्रामीण भागातही डिजिटल व्यवहार वाढतील आणि इकॉनॉमीचे फॉर्मलायझेशन होईल. सहकारी संस्थांनी सभासदांना 'आयुष्मान भारत' सारख्या योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी मोहीम राबवावी, असे आवाहन त्यांनी केले.

अध्यक्ष दळवी म्हणाले, बँकेचा प्रत्येक कर्मचारी मनापासून काम करतो. शिवरामभाऊ जाधव आणि ढोलम यांनी बँकेच्या वाटचालीसाठी जी रूपरेषा आणि कामाची पद्धत ठरवून दिली. त्यातून प्रेरणा घेऊन काम करतो सिंधुदुर्ग ही महाराष्ट्रातील सर्वात कमी वयाची जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक असूनही, दुप्पट-तिप्पट वय असलेल्या मोठ्या जिल्हा बँकांना मागे टाकून स्पर्धेत आघाडीवर आहोत. रत्नागिरी, रायगडसारखे मोठे जिल्हे असताना पतसंस्था, साखर कारखाने, सुतगिरण्या नसतानाही केवळ वैयक्तिक ग्राहकांपर्यंत पोहोचून विश्वास संपादन केल्याने व्यवसाय वाढवता आला. व्यवस्थापन खर्च २.३५% वरून १.७१% पर्यंत कमी करण्यात यश आले आहे. यामुळेच नवीन कर्मचारी भरती आणि शिपाई भरती शक्य झाली. महाराष्ट्रात सलग तीन वर्षे सर्वात आधी वार्षिक सर्वसाधारण सभा घेणारी बँक म्हणून नावलौकिक आहे, असे ते म्हणाले.

उपाध्यक्ष काळसेकर यांनी कर्मचाऱ्यांचे विशेष कौतुक केले. प्रास्ताविक मुख्य कार्यकारी अधिकारी अनिरुद्ध देसाई यांनी केले. सूत्रसंचालन व आभार शरद सावंत यांनी केले. स्नेहमेळाव्याच्या वेळी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

## खामगाव अर्बन बँकेचा सदस्यांना लाभांश जाहीर

खामगाव, अकोला - खामगाव अर्बन बँकेचे सदस्य आणि ग्राहक यांच्या विश्वासामुळे बँकेची प्रगतिची वाटचाल कायम स्वरूपी सुरू असल्याचे मत बँकेचे अध्यक्ष प्रा. विजय मुंडे यांनी येथे सांगितले. बँकेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ते बोलत होते. ते म्हणाले, नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात बँकेने ९.८६ कोटी निव्वळ नफा मिळविला आहे तर एनपीएचे प्रमाण शून्य टक्के राखण्यात यश मिळविले आहे. बँकेचे भाग भांडवल ३६.५२ कोटी असून ठेवी १३२९.५६ कोटी आहेत. तसेच ७९६.६६ कोटी कर्ज वाटप करण्यात आले आहे. मुख्य म्हणजे सदस्यांना ७ टक्के लाभांश जाहीर करण्यात आला आहे. तसेच लेखा परीक्षणात बँकेला सतत 'अ' वर्ग मिळाला आहे. बँकेच्या मुख्य कार्यालयाची नवीन इमारत उभी करण्याचा मानस असल्याचे त्यांनी सांगितले. या सभेत विविध विषयावरील ठराव मंजूर करण्यात आले.

बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ज्ञानेश्वर जाधव यांनी प्रास्ताविक केले. यामध्ये त्यांनी बँकेच्या वाटचालीचा आढावा घेतला. बँकेने वर्षभरात २१०० कोटींचा व्यवसाय केला असल्याची माहिती त्यांनी सांगितली. उपाध्यक्ष डॉ. सतीश कुलकर्णी तसेच पदाधिकारी, संचालक, अधिकारी, ग्राहक यावेळी उपस्थित होते.

## समृद्धी नागरी ग्रामीण सहकारी पतसंस्थेच्या वतीने विविध रोपांचे वृक्षारोपण

**वाशिम** - येथील समृद्धी नागरी आणि ग्रामीण सहकारी पतसंस्थेच्या वतीने गुरु पोर्णिमेच्या निमित्ताने फळ झाडांच्या रोपांची लागवड करण्यात आली. आंबा, चिक्कू, नारळ, अंजीर, फणस अशा विविध प्रकारच्या सुमारे ५० फळ झाडांची लागवड करण्यात आली. संस्था अध्यक्ष प्र. सी. बागडे, उपाध्यक्ष बी. जे. पाटील, तसेच संचालक मुख्य कार्यकारी अधिकारी एम. आर. होले तसेच अधिकारी पदाधिकारी कर्मचारी यावेळी उपस्थित होते.


व्यापारी मित्र
अमृतपर्व
25 K वर्गणीदार

कर व व्यापारी विषयक कायद्यातील
क्लिष्ट विषयांची सहज सोप्या भाषेत
माहितीसह आर्थिक गुंतवणूक,
आरोग्याविषयी माहिती देणारे
व्यापारी बांधवांचे हक्काचे एकच व्यासपीठ

स्थापना १९५०

**व्यापारी मित्र**

मासिकातील एखाद्या माहितीने आपला लाखो रुपयांचा फायदा होऊ शकतो.

संस्थापक संपादक : स्व. श्री. जी. डी. शर्मा

Payment Getway link

भारतात कुठेही
निश्चित अंक मिळण्यासाठी
मॅगझीन पोस्टिंगसह वर्गणीदर

| ३ वर्षांसाठी | २ वर्षांसाठी | १ वर्षांसाठी |
|---|---|---|
| २९०० | २००० | १०५० |

'परशुराम कुटी', १०६/९, एरंडवणा, पुणे - ४११००४
फोन (०२०) २५४३ १०९४ (W) : 94218 80290
E-mail : sampadak@vyaparimitra.com


## वर्धा जिल्हा सहकार भारती आयोजित सहकार संवाद उपक्रम यशस्वी

**हिंगणघाट** - वर्धा जिल्हा सहकार भारती व जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था अभिनव महिला बचत गट यांच्या संयुक्त विद्यमाने सहकार संवाद कार्यक्रमाचे आयोजन नुकतेच येथे करण्यात आले होते. या विशेष कार्यक्रमात सहकार क्षेत्रातील विविध विषयांवर विचारमंथन व मुक्त संवाद करण्यात आला. अध्यक्षस्थानी डॉ. नयना तुळसकर नगराध्यक्ष, सुधीर कोठारी उपस्थित होते.

सहकार भारती महामंत्री विवेक जुगादे, विभागीय सहनिबंधक, सदानंद उईके यांनी मार्गदर्शन केले. सहायक निबंधक स्वप्नील पुराम नागपूर विभाग प्रमुख सहकार भारती संजय रोकडे, प्रदेश सचिव, विनोद भिमनवार, सहकार भारती वर्धा जिल्हा अध्यक्ष प्रभाकर कोळसे, महामंत्री श्यामकुमार खत्री संघटन मंत्री, मनोज पाचखेडे, सहसंघटन मंत्री प्रशांत मुळे, वर्धा जिल्हा पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष सुधाकर घवघवे उपस्थित होते.

सहकार संवाद कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. लिना शेंडे यांनी, प्रास्ताविक श्यामकुमार खत्री तर आभार सहकार भारती वर्धा जिल्हा अध्यक्ष प्रभाकर कोळसे यांनी मानले. सहकार संवाद कार्यक्रमाचे यशस्वितेसाठी हिंगणघाट तालुका सहकार भारतीचे अध्यक्ष रामदास खेकारे, महामंत्री नंदकुमार सिंगरु, संजय तराळे, सपना जाना, प्रा. लिना शेंडे, चंदनखेडे, शेखर दाते, कांचन खत्री, अभिनव विचार मंच हिंगणघाटचे अध्यक्ष नितीन सुकळकर, सचिव ओमप्रकाश मुंडे, वर्धा जिल्हा सहकार भारती उपाध्यक्ष तुषार गिरडे यांनी सहकार्य केले.

## राजर्षि शाहू मल्टिस्टेटची 'माझी लेक जिजाऊ' बचत ठेव योजना

**बुलढाणा** - येथील राजर्षि शाहू मल्टिस्टेटच्या वतीने 'माझी लेक जिजाऊ' या बचत ठेव योजनेचा प्रारंभ करण्यात आला आहे. मुलींच्या उज्ज्वल भविष्यासाठी हा महत्वाचा उपक्रम असणार आहे. संस्थेचे मुख्य आधारवड भाऊसाहेब शेळके यांच्या हस्ते प्रारंभ करण्यात आला आहे. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष संदीप शेळके, संस्थाध्यक्षा मालती शेळके, संचालक अधिकारी, ठेवीदार, ग्राहक उपस्थित होते. बचत ठेव योजनेची सविस्तर माहिती संस्थेच्या सर्व शाखांमध्ये उपलब्ध करण्यात आली आहे.

## धुळे जिल्हा मध्यवर्ती सहकारी ग्राहक भांडार संस्थेला १४ लाख ६२ हजार नफा

**धुळे** - धुळे जिल्हा मध्यवर्ती सहकारी ग्राहक भांडार संस्थेला नुकतीच संपलेल्या आर्थिक वर्षात १४ लाख ६२ हजाराचा नफा झाला असल्याची माहिती अध्यक्ष अनिल मुंदडा यांनी संस्थेच्या सभेत सांगितली. संस्थेची ६४ वी वार्षिक सर्व साधारण सभा नुकतीच झाली त्यामध्ये वरील माहिती सांगण्यात आली.

## जीपी पारसिक सहकारी बँकेची फोंडा येथे नवीन शाखा सुरू

**फोंडा, गोवा** - येथील जीपी पारसिक सहकारी बँकेने नुकतीच गोव्यात फोंडा येथे नव्याने शाखा सुरू केली आहे ही बँकेची ९२ वी शाखा असणार आहे. नवीन शाखेचे उद्घाटन बँक अध्यक्ष विक्रम पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. संचालक रणजीत पाटील, नारायण गावंड, राजश्री पाटील तसेच अधिकारी उपस्थित होते. नवीन शाखेमुळे या परिसरातील नागरिक आणि व्यावसायिक यांना जलद आणि उत्तान बँकिंग सेवा उपलब्ध होणार आहे.

# रिझर्व्ह बँकेने दार उघडले आहे की उंबरठाच उंच केला आहे?

रिझर्व्ह बँकेच्या नवीन धोरणाकडे सहकारी बँकिंग क्षेत्राच्या नजरेतून पाहण्याची वेळ आली आहे भारतातील अर्बन को-ऑपरेटीव्ह बँकिंग सेक्टर गेल्या काही वर्षांत मोठ्या रेग्युलेटरी ट्रान्सफॉर्मेशन मधून जात आहे. Governance, Capital, Asset Quality, Technology, Risk Management, Professional Management Financial Strength या सर्व बाबतीत Reserve Bank of India (RBI)




**व्यंकटेश कुळकर्णी**
९४०३० ८०७५१


भारतीय रिझर्व्ह बँकेने सहकारी बँकांकडून अधिक सक्षम होण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे. याच पार्श्वभूमीवर आरबीआयने अर्बन को-ऑपरेटीव्ह बँक्ससाठी On-Tap Licensing Framework आणण्याची दिशा दाखवली आहे. वरवर पाहता हा निर्णय निश्चितच स्वागतार्ह आहे. कारण याचा सरळ अर्थ असा वाटतो की-योग्य क्षमता, आर्थिक सुदृढता आणि मजबूत गव्हर्नन्स असलेल्या को-ऑपरेटीव्ह क्रेडिट सोसायटीना बँकिंग सेक्टरमध्ये प्रवेश करण्याची संधी उपलब्ध करून देणे. परंतु प्रस्तावित अटी बारकाईने पाहिल्या तर एक वेगळाच प्रश्न निर्माण होतो. रिझर्व्ह बँक खरोखर नवीन अर्बन को-ऑप. बँक्स निर्माण करू इच्छिते का? की नवीन अर्बन को-ऑप. बँक्ससाठी Policy Window उघडली आहे; पण Entry Barrier इतका उंच ठेवला आहे की, प्रत्यक्षात फारच थोड्या संस्था त्या दारातून प्रवेश करू शकतील? प्रश्न विचारणे आवश्यक आहे.

**१) पॉलिसी च्या चेहऱ्यावर दिसणारा सकारात्मक संदेश :-**

रिझर्व्ह बँकच्या प्रस्तावित फ्रेमवर्कमधून फायनान्सिअली साऊंड आणि वेल मॅनेजड को-ऑपरेटीव्ह क्रेडिट सोसायटीजकडे UCB Licensing साठी पाहण्याची दिशा दिसते. याचा सकारात्मक अर्थ असा घेता येतो की भारतीय रिझर्व्ह बँकला को ऑपरेटीव्ह बँकिंग सेक्टरमध्ये योग्य पात्रता असलेल्या नवीन संस्थांना बँकिंग लायसन्स देण्यास तत्त्वतः आक्षेप नाही. On-Tap Licensing ही संकल्पनाही सकारात्मक आहे. लायसंन्ससाठी एखाद्या विशिष्ट वर्षाची किंवा मर्यादित विंडोची वाट पाहण्याऐवजी पात्र संस्था आवश्यक अटी पूर्ण करून अर्ज करू शकतील, अशी संधी निर्माण होते. पण इथेच पुढचा प्रश्न सुरू होतो ही संधी कोणासाठी?

२. Entry Gate **वर पहिली अट-१० वर्षांचा** Track Record -

प्रस्तावित फ्रेमवर्क नुसार ॲप्लिकेन्ट क्रेडिट को ऑपरेटीव्ह सोसायटी कडे किमान १० वर्षांचा अस्तित्वाचा ट्रॅक रेकॉर्ड असणे अपेक्षित आहे. ही अट वरकरणी योग्य वाटते, कारण Banking हा विश्वासाचा व्यवसाय आहे. परंतु जर एखादी संस्था बँकिंग सेक्टरमध्ये येण्यासाठीच पात्रता निर्माण करत असेल, तर बँकिंग लायसन्स मिळविण्यासाठी आधी १० वर्षे अस्तित्वात राहण्याची अट काहीशी विरोधाभासी वाटू शकते. क्रेडिट को-ऑपरेटीव्ह सोसायटी आणि UCB's regulatory framework, business model, governance structure risk profile पूर्णपणे समान नसतात. म्हणून प्रश्न असा आहे. १० वर्षांचा अस्तित्वाचा कालावधी हा Financial Capability मोजण्याचा योग्य पॅरामीटर आहे का? की त्यापेक्षा पुढील बाबींना अधिक weightage दिले पाहिजे?

Capital Adequacy, Governance., Professional Management., Technology

Risk Management, Asset Quality, Business Model, Depositor Protection

अर्थात, ट्रॅक रेकॉर्ड महत्त्वाचा आहेच; परंतु तो एकमेव किंवा सर्वात महत्त्वाचा eligibility parameter असावा का, हा विचार करण्याचा मुद्दा आहे.

**३) दहा हजार कोटी - डिपोझीट्स खरा एन्ट्री बॅरीअर ?**

प्रस्तावित लायसंन्सिंग फ्रेमवर्कमधील सर्वात लक्षवेधी अट म्हणजे: ठेवी कमीतकमी १०,००० कोटी आणि त्यासोबत किमान नक्त भांडवल - ३०० कोटी अशा अटी प्रस्तावित फ्रेमवर्क संदर्भात चर्चेत आहेत. आता प्रश्न असा आहे, जर एखादी क्रेडिट को-ऑपरेटीव्ह सोसायटी आधीच १०,००० कोटी ठेवीच्या पातळीवर पोहोचली असेल, तर तिला बँकिंग लायसन्स मिळाल्यानंतर होणारा इनक्रेमेन्टल बेनेफिट किती असेल?

दुसऱ्या शब्दांत, ज्यांनी आधीच मोठ्या अर्बन को-ऑपरेटीव्ह बँके सारखी आर्थिक क्षमता निर्माण केली आहे, त्यांनाच अर्बन बँक होण्याची संधी देणे ही New Banking Licence Policy आहे की Large Existing Institutions Conversion Policy? हा प्रश्न गंभीर आहे.

**४) यापेक्षाही मोठे व्यावहारिक आव्हान लोन पोर्टफोलिओमधील कॉनसेन्ट्रेशन रिस्क :-**

प्रस्तावित भारतीय रिझर्व्ह बँकेच्या निकषांनुसार बँकिंग लायसन्ससाठी पात्र ठरणाऱ्या पतसंस्थांसमोर Capital Net Worth किंवा CRAR पेक्षाही एक वेगळे आणि अधिक व्यावहारिक आव्हान उभे राहू शकते. Loan Portfolio Concentration Risk Management.: सध्याच्या अनेक पतसंस्थांच्या कर्जवाटपाची रचना पाहिली तर मोठ्या प्रमाणावर कर्जे गोल्ड लोन प्लेज लोन आणि इतर काही रिटेल ओरिएंटेड प्रॉडक्ट्समध्ये केंद्रित असलेली दिसतात. पतसंस्थेच्या विद्यमान व्यवसायासाठी ही रचना कदाचित व्यवहार्य आणि फायदेशीर असू शकते. परंतु एकदा ती संस्था बँकेत रूपांतरित झाली किंवा बँकिंग लायसन्स साठी पात्र ठरली, तर भारतीय रिझर्व्ह बँकेच्या Prudential Framework अंतर्गत Concentration Risk हा अत्यंत महत्त्वाचा Regulatory Parameter ठरणार आहे. बँकिंग क्षेत्रात लोन पोर्टफोलिओचे विविध रेग्युलेटरी दृष्टिकोनातून वर्गीकरण केले जाते. उदा.- Priority Sector Lending (PSL)

Secured / Unsecured Advances. Commercial Real Estate (CRE) / Non-CRE. Borrower-wise / Group-wise Exposure. Capital-linked Exposure Limits.

यामुळे आज एखाद्या पतसंस्थेचा व्यवसाय मोठ्या प्रमाणावर गोल्ड लोन किंवा प्लेज लोनवर आधारित असेल, तर उद्या अर्बन बँक म्हणून काम करताना त्याच लोन पोर्टफोलिओचे RBI Concentration Risk Framework alignment कसे केले जाणार, हा महत्त्वाचा प्रश्न आहे.विशेषतः, विद्यमान कर्जवाटपातील मोठा हिस्सा एखाद्या विशिष्ट प्रकारच्या कर्जात किंवा विशिष्ट exposure band मध्ये असेल, तर रेग्युलेटरी लिमिट्स पूर्ण करण्यासाठी त्या संस्थेला लोन पोर्टफोलिओ डायव्हर्सिफिकेशन करावे लागू शकते. याचा अर्थ केवळ नवीन कर्जे देण्याची दिशा बदलणे एवढाच नाही. तर

Product Mix, Borrower Mix, Secured / Unsecured Exposure,PSL Exposure

Capital-linked Exposure, Sectoral / Portfolio Concentration. यांचा पुनर्विचार करावा लागू शकतो. येथे एक मूलभूत प्रश्न निर्माण होतो. आज ज्या पतसंस्थेचा लोन पोर्टफोलिओ गोल्ड लोन आणि प्लेज लोनसारख्या उत्पादनांवर मोठ्या प्रमाणात आधारित आहे, ती संस्था उद्या बँक झाल्यानंतर RBI Concentration Risk Norms चे पालन करण्यासाठी हा पोर्टफोलिओ कसा पुनर्रचित करणार? आणखी महत्त्वाचे म्हणजे : भारतीय रिझर्व्ह बँक अशा संस्थांना Transition Period देणार आहे का? विद्यमान पोर्टफोलिओला Grandfathering मिळणार आहे का? की लायसंन्स मिळाल्यापासूनच लागू असलेल्या Prudential Limits नुसार पोर्टफोलिओ चे पुनर्संतुलन करावे लागेल?

हा केवळ Compliance चा प्रश्न नाही, याचा थेट परिणाम संस्थेच्या Profitability, Yield on Advances, Liquidity, Credit Strategy and Business Model वर होऊ शकतो. म्हणून नवीन UCB लायसन्सिंग फ्रेमवर्ककडे केवळ १०,००० कोटी ठेवी आणि ३०० कोटी नक्त भांडवल आणि CRAR १२% या प्रवेश निकषांच्या दृष्टीने पाहणे पुरेसे नाही. खरा

**पुढील पानावर...**

मागील पानावरून...

## रिझर्व्ह बँकेने दार उघडले आहे की उंबरठाच उंच केला आहे?

प्रश्न त्यानंतर सुरू होतो. बँकिंग लायसंन्स मिळाल्यानंतर त्या संस्थेचा विद्यमान Business Model RBI Prudential Framework मध्ये कितपत बसतो? यामध्ये Concentration Risk Management हा निश्चितच अत्यंत महत्त्वाचा मुद्दा आहे.

**५) स्मॉल आणि मेडीयम को ऑपरेटीव्ह इन्स्टिटयूशन्सचे काय?**

भारतामध्ये सहकारी संस्थांची रचना विविध स्तरांवर आहे. काही संस्था स्थानिक पातळीवर मजबूत आहेत, त्यांनी सभासदांमध्ये विश्वास निर्माण केला आहे, चांगली Financial Discipline ठेवतात, Technology स्वीकारली आहे, Governance सुधारले आहे, पण त्यांच्याकडे १०,००० कोटी ठेवी नाहीत. मग त्यांच्यासाठी बँकिंग लायसन्सचे दार कितपत खुले आहे? जर एन्ट्री थ्रेशहोल्ड इतका मोठा असेल, तर New UCB Formation ही संकल्पना प्रत्यक्षात मोठ्या क्रेडिट को-ऑपरेटीव्ह सोसायटी पुरती मर्यादित होण्याची शक्यता नाही का? हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे.

६) Multi-State Condition **– आणखी एक प्रश्न :–**

प्रस्तावित फ्रेमवर्कच्या सुरुवातीच्या इलीजीबीलिटीमध्ये मल्टि-स्टेट को ऑपरेटीव्ह सोसायटी असण्यावर भर दिल्याचे दिसते. इथेही प्रश्न निर्माण होतो की, बँकिंग लायसंन्स मिळवण्यासाठी मल्टि-स्टेट असणे आवश्यक का?



एका राज्यात अत्यंत मजबूत - Governance Capital -sset Quality Technology

Management - Risk Management. असलेली क्रेडिट को-ऑपरेटीव्ह सोसायटी केवळ जीओग्राफिक स्प्रेड कमी असल्यामुळे बँकिंग लायसन्ससाठी कमी पात्र ठरते का?

Geographical Spread is the only Banking Capability indicator?

७) CRAR **१२% आणि** Net NP- Below 3% -

प्रस्तावित फ्रेमवर्कमध्ये मागील पाच वर्षांच्या Financial Performance मध्ये- CRAR ≥ १२%आणि Net NPA < ३% यांसारख्या अटींचा विचार आहे. ही अट मात्र Prudential दृष्टिकोनातून पूर्णपणे समजण्यासारखी आहे. कारण बँकिंग लायसन्स म्हणजे पब्लिक डिपोसिटर्सच्या विश्वासाची जबाबदारी. त्यामुळे Capital Adequacy आणि Asset Quality मजबूत असणे अत्यावश्यक आहे. परंतु प्रश्न असा आहे की - सतत पाच वर्षे हीच स्थिती असणे ही एकमेव योग्य तपासणी आहे का? एखाद्या संस्थेने मागील काही वर्षांत मोठे ट्रान्सफॉर्मेशन करून-

NPA मोठ्या प्रमाणात कमी केले, Capital वाढवले, Governance सुधारले, Technology मजबूत केली, Risk Management सक्षम केले, तर त्या संस्थेच्या Improvement Trajectory ला किती weightage मिळणार? फक्त आजची स्थिती पाहायची की सुधारणेची क्षमता आणि दिशा देखील पाहायची?

**८ ) रिझर्व्ह बँकेच्या धोरणातील विरोधाभास की विचारपूर्वक ठेवलेली सुरक्षितता?**

इथेच आपल्या चर्चेचा मूळ मुद्दा येतो. रिझर्व्ह बँकेचा व्यापक Policy Message असा आहे, Co-operative Banks should become stronger, more professional, technology-driven and financially resilient. हा दृष्टिकोन निश्चितच स्वागतार्ह आहे. पण दुसरीकडे, नवीन बँकिंग लायसन्ससाठी एन्ट्री कंडिशन्स इतक्या कठोर ठेवायच्या की फक्त अत्यंत मोठ्या आणि आधीपासूनच फायनान्सियली स्ट्रॉंग संस्था पात्र ठरतील. मग प्रश्न निर्माण होतो की, रिझर्व्ह बँकेला नवीन सहकारी बँक निर्माण करायच्या आहेत की Existing Large Co-operative Institutions चे Conversion Facilitate करायचे आहे? कदाचित हा विरोधाभास नसून RBI ची Risk-based Strategic Thinking असू शकते.

९) Policy Statement Policy Architecture **यामध्ये अंतर आहे का?**

हा कदाचित या संपूर्ण चर्चेतील सर्वात महत्त्वाचा प्रश्न आहे. पॉलिसी च्या भाषेत- Entry Opportunity दिसते. पण Eligibility Architecture मध्ये- High Entry Barrier दिसतो. यातील अंतर समजून घेणे आवश्यक आहे.

**१०) रिझर्व्ह बँकेची खरी** Strategic Thinking **काय असू शकते?**

याचे दुसरे interpretation देखील आहे. कदाचित रिझर्व्ह बँकेचा उद्देश जास्तीत जास्त नवीन सहकारी बँका निर्माण करणे हा नसून फक्त Financially Strong Professionally Managed Institutions ला Banking Licence देणे हा असू शकतो.

जर हा उद्देश असेल, तर Policy Logical आहे. कारण आजच्या Banking nvironment मध्ये Cyber Risk, Operational Risk, Liquidity Risk, Credit Risk, AML / KYC Compliance, Technology Investment, Capital Requirement, Governance या सर्वांसाठी मोठी Financial Managerial Capacity आवश्यक आहे. म्हणून रिझर्व्ह बँक कदाचित असा दृष्टिकोन घेत असेल Banking Licence हा हक्क नाही, तो Public Trust च्या आधारे दिला जाणारा Regulatory Privilege आहे. ही बाजूदेखील मान्य करावी लागेल.

**११) पण मग पॉलिसी ने हे स्पष्टपणे सांगायला हवे की जर रिझर्व्ह बँकेचा उद्देश:**

Only large and financially powerful co-operative institutions should enter banking. असा असेल, तर पॉलिसीने तो उद्देश स्पष्टपणे सांगणे अधिक योग्य ठरेल.

कारण On-Tap Licensing हा शब्द ऐकला की सामान्यतः Eligible Institutions साठी Open Opportunity अशी अपेक्षा निर्माण होते. पण अत्यंत उच्च Quantitative Thresholds ठेवल्यास परिस्थिती अशी दिसू शकते. Open Door - But Very Narrow Gate.

**१२) सहकारी बँकिंग क्षेत्रासाठी याचा अर्थ काय?**

या पॉलिसीमुळे अर्बन को-ऑपरेटीव्ह बँक सेक्टरमध्ये कॉनसोलिडेशन वाढण्याची शक्यता आहे. मोठ्या आणि मजबूत संस्था अधिक मजबूत होतील, स्केल मिळवतील,

Technology मध्ये मोठी गुंतवणूक करू शकतील, Risk Management अधिक सक्षम करू शकतील. परंतु छोट्या आणि मध्यम संस्थांसाठी Independent Growth, Banking Licence मिळविण्याची शक्यता, Scale-up Strategy याबाबत प्रश्न निर्माण होऊ शकतात.

**१३) योग्य अँप्रोच काय असू शकतो?**

रिझर्व्ह बँकेने एकाच मोठ्या Threshold ऐवजी Tiered Entry Framework चा विचार करावा.

उदा. -Tier - I – Small but Sound Credit Co-operative Societies, Limited Banking Activities↓

Progressive Regulatory Conditions.

Tier - II - Medium Institutions, Broader Banking Activities, Higher Regulatory Requirements

Tier - III - Large and Financially Strong Institutions, ↓Full UCB Framework. अशी Graduated Licensing Approach सहकारी क्षेत्रासाठी अधिक सर्वसामावेशक ठरू शकते. यामुळे Safety आणि Soundness यांच्याशी तडजोड न करता नवीन संस्थांना बँकिंग सेक्टरमध्ये प्रवेशासाठी प्रगतिशील मार्ग उपलब्ध होऊ शकतो.

**१४)** Banking Licence **म्हणजे फक्त आकार नाही.**

एका संस्थेची बँकिंग क्षमता मोजताना केवळ साईझपेक्षा पुढील बाबींचा Composite Assessment अधिक महत्त्वाचा ठरू शकतो. Quality of Governance., Capital Strength., Asset Quality., Management Capability., Technology, Risk Management. Compliance Culture. Customer Base. Business Model.

Financial Sustainability. कारण मोठी संस्था म्हणजे आपोआप

पुढील पानावर...

# नाशिक एज्युकेशन क्रेडिट सोसायटी संचालक मंडळाची सभा यशस्वी



**नाशिक** – नाशिक एज्युकेशन क्रेडिट सोसायटीच्या संचालक मंडळाची सभा संस्थाध्यक्ष दिलीप फडके यांच्या अध्यक्षतेखाली झाली. सोसायटीचे संचालक डॉ. शैलेश पाटोळे यांना मराठी विषयात औरंगाबाद मराठवाडा विद्यापीठातर्फे पी.एच.डी. पदवी प्राप्त झाल्याबद्दल अभिनंदन करून शुभेच्छा देण्यात आल्या. सेक्रेटरी साहेबराव पवार उपाध्यक्ष दिनेश देवरे, खजिनदार सायली कुलकर्णी, सहकार्यवाह उमेश कुलकर्णी, रामदास चव्हाण, सहकार्यवाह विजय मापारी, संचालक अरविंद दिघे, अतुल करंजे, अजित निखाडे, प्रवेश नरस्कर, राहुल चव्हाण, डॉ. लक्ष्मी कस्तुरे आदी संचालक उपस्थित होते.

## ॲग्रिकल्चरल कॉलेज को-ऑप. क्रेडिट सोसायटीच्या वतीने गुणवंत विद्यार्थी सन्मानित

**पुणे** – ॲग्रिकल्चरल कॉलेज फार्म को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीची १११ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच झाली. संस्थेचे अध्यक्ष सुनिल आलम अध्यक्षस्थानी होते. प्रमुख पाहुणे म्हणून कृषी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सुभाष भालेकर सहयोगी संशोधन संचालक, विभागीय कृषी संशोधन प्रकल्प डॉ दत्तात्रय लाड होते. उपाध्यक्ष पद्मनाथ गरसुळे, सचिव सुवर्णा टिळेकर, संचालक श्रीकृष्ण सावंत, अशोक पाटील, कल्पना वाकळे, वैशाली पावले, राजू बामगुडे, संजय अवचीते, डॉ. नरेंद्र कशिद, नितीन शेळके, अशोक पाटील, अभिजीत मांढरे, ज्ञानेश्वर गायकवाड यांच्यासह अन्य पदाधिकारी सभासद व कर्मचारी उपस्थित होते.

दहावी, बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र, शालेय वस्तू, गुलाब पुष्प देऊन कौतुक करण्यात आले. सेवानिवृत्त सभासदांचा शाल, सन्मानचिन्ह, पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. विशेष प्राविण्य मिळविणाऱ्या युवक युवतींचा गौरव करण्यात आला. संस्थेच्या वाटचालीचा आढावा संचालक श्रीकृष्ण एस. सावंत यांनी मांडला. अध्यक्षीय मनोगतात आलम यांनी संस्थेच्या प्रगतीसाठी पदाधिकारी, संचालक, सभासद आणि कर्मचारी यांचे योगदान महत्त्वपूर्ण असल्याचे सांगितले. भविष्यातही सभासदांच्या हिताला प्राधान्य देत संस्थेच्या विकासासाठी विविध उपक्रम राबविण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

प्रमुख पाहुणे डॉ. दत्तात्रय लाड आणि डॉ. सुभाष भालेकर यांनी संस्थेच्या माध्यमातून होत असलेली कामे आणि पारदर्शक व्यवहाराचे कौतुक केले. सूत्रसंचालन व आभार गणेश मोढवे यांनी मानले.

## बाणेर नागरी सहकारी पतसंस्थेचा २८ वा वर्धापनदिन साजरा

**पुणे** – बाणेर नागरी सहकारी पतसंस्थेने सामाजिक बांधिलकी जपली असे मत आमदार शंकर मांडेकर यांनी व्यक्त केले आहे. पतसंस्थेचा २८ वा वर्धापनदिन साजरा करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.

माजी आमदार शरद ढमाले तसेच संस्थेचे पदाधिकारी संचालक, अधिकारी यावेळी उपस्थित होते. स्वाभिमानी शेतकरी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष प्रकाश बालवडकर, देहु येथील नगराध्यक्ष योगेश काळोखे, आदींचा यावेळी सत्कार करण्यात आला. माजी आमदार ढमाले यांनी मनोगत व्यक्त केले.

मागील पानावरून...

## रिझर्व्ह बँकेने दार उघडले आहे की उंबरठाच उंच केला आहे?

चांगली संस्था असे नाही आणि लहान संस्था म्हणजे आपोआप कमकुवत संस्था असेही नाही. बँकिंग कॅपॅबीलिटी ही साईझपेक्षा व्यापक संकल्पना आहे.

**१५) अंतिम प्रश्न** – आज सहकारी बँकिंग क्षेत्राने भारतीय रिझर्व्ह बँकेला विरोध करण्यापेक्षा एक प्रश्न विचारला पाहिजे तुम्ही UCB Licensing चे दार उघडत आहात का? जर उत्तर होय असेल तर पुढचा प्रश्न असा असावा त्या दारातून प्रवेश करण्यासाठी उंबरठा किती उंच असावा? आणि जर उंबरठा इतका उंच असेल की फक्त मोजक्याच संस्था त्यातून जाऊ शकतील, तर ही Is there a New UCB Licensing Policy or a Conversion Window for Large Co-operative Institutions? हा प्रश्न विचारणे चुकीचे ठरणार नाही.

**१६) निष्कर्ष** – Open but Safe Banking Licence Policy :-

रिझर्व्ह बँकेच्या प्रस्तावित Licensing Framework कडे दोन टोकाच्या दृष्टिकोनातून पाहणे योग्य ठरणार नाही. एकीकडे रिझर्व्ह बँकेला Financially Weak आणि Poorly Governed संस्था Banking Sector मध्ये आणायच्या नाहीत. हे पूर्णपणे योग्य आहे.

दुसरीकडे Banking Licence साठी अशा Entry Conditions ठेवणे की फक्त आधीच अतिशय मोठ्या संस्था पात्र ठरतील, तर New Entrants साठी पॉलिसी कितपत खुली आहे, हा प्रश्न राहतो. म्हणून खरी गरज आहे ती Open but Safe Banking Licence Policy ना की...Open but Practically Inaccessible आणि ना Easy Entry without Adequate Safeguards. सहकारी बँकिंग क्षेत्राला अशी Licensing Policy हवी जी Safety + Soundness + Governance + Competition + Inclusion यांचा समतोल साधेल, कारण Strong Co-operative Banks are not a threat to banking stability; well-governed and professionally managed Co-operative Banks can be an important part of banking stability. आणि इथे रिझर्व्ह बँकेच्या भूमिकेकडे थोड्या वेगळ्या नजरेने पाहणेही आवश्यक आहे. एकदा तोंड भाजले की माणूस ताकही फुंकून पितो, अशी आपल्याकडे म्हण आहे. एकीकडे रिझर्व्ह बँक छोट्या आणि सर्व संधी देऊनही सुधारणा होत नसलेल्या बँकांचे विलिनीकरण किंवा त्यांचे Banking Licence रद्द करत आहे. तीच रिझर्व्ह बँक कोणत्याही प्रकारचे निकष न लावता नवीन बँकिंग परवाने कशी देईल, याचा देखील आपल्याला सारासार विचार करावा लागेल. सहकारी बँकिंग क्षेत्राच्या इतिहासातील काही अनुभव पाहता

रिझर्व्ह बँक आज अधिक सावधपणे पावले टाकत असेल, तर त्यामागे एक महत्त्वाचे कारण आहे. रिझर्व्ह बँकेची पहिली जबाबदारी बँकिंग लायसंन्स मिळवणाऱ्या संस्थेची नसून, त्या बँकेत आपली आयुष्यभराची बचत ठेवणाऱ्या ठेवीदाराची आहे, आणि ही ठेवीदाराचे हित बघण्याची भूमिका शतप्रतिशत योग्य आहे. म्हणून रिझर्व्ह बँकेच्या कठोर अटींकडे केवळ Entry Barrier म्हणून पाहण्याऐवजी त्यामागील ठेवीदाराचे हीत आणि Financial Stability ची चिंता देखील समजून घेणे आवश्यक आहे. परंतु त्याच वेळी सहकारी क्षेत्राचा प्रश्नही तितकाच महत्त्वाचा आहे.

सुरक्षिततेची काळजी घेताना, सक्षम पण तुलनेने लहान संस्थांसाठी बँकिंग सेक्टरमध्ये प्रवेशाची शक्यता पूर्णपणे बंद तर होत नाही ना? म्हणूनच रिझर्व्ह बँकेच्या नवीन UCB Licensing Policy कडे पाहताना अंतिम प्रश्न असा नसावा की RBI Licence देत आहे का? तर प्रश्न असा असावा RBI ने Licence देण्याचे दार उघडले आहे, पण त्या दारातून किती आणि कोणत्या प्रकारच्या सहकारी संस्था प्रत्यक्षात प्रवेश करू शकतील? कारण दार उघडे असणे महत्त्वाचे आहेच, पण त्या दारापर्यंत पोहोचण्याचा मार्ग आणि उंबरठा किती व्यवहार्य आहे, हेही तितकेच महत्त्वाचे आहे. असो.

रिझर्व बँकेच्या या निर्णयकडे मी खूप सकारात्मक दृष्टीने बघतो यातून सहकार क्षेत्रा साठी एक चांगले पाऊल पुढे पडले आहे, रिझर्व बँकेने नव्या नागरि सहकारी बँकांसाठी आता दार उघडले आहे, हळुहळू सहकारातील अन्य मजबूत आर्थिक संस्थांबाबत असाच सकारात्मक विचार ठेवावा. मी रिझर्व बँकेच्या दृष्टिकोनात बदल झाला आहे ही बाब जास्त महत्त्वाची मानत आहे.

**– व्यंकटेश कुळकर्णी.**
**केंद्र प्रमुख, सहकार भारती सहकार प्रशिक्षण केंद्र.**

# नव्या नागरी सहकारी बँकांना परवानगी

रिझर्व बँक ऑफ इंडिया ने सन २००४ पासून नव्या नागरी सहकारी बँकांना परवाने देणे बंद केले होते. माधवपुरा बँकेच्या घटनेनंतर हे पाऊल उचलण्यात आले होते. यानंतर पुलाखालून बरेच पाणी गेले. जानेवारी २०२६ मध्ये नव्या नागरी सहकारी बँकांसाठी तत्त्वतः चर्चा सुरू करण्यात आली आणि संबंधितांकडून प्रस्ताव आणि विचार मागविण्यात आले. मागील पतधोरणाच्या वेळी जाहीर करण्यात आल्याप्रमाणे नव्या नागरी सहकारी बँकांसाठी रिझर्व बँक ऑफ इंडियाकडून पात्रतेचे निकष ठरविण्यात आले आहे. या अटींचा आढावा पुढीलप्रमाणे –



डॉ. अभय मंडलिक
९४०३० ८०७२५

**⁕ पात्रता –** ज्या पतसंस्थांनी दहा वर्षे व्यवस्थित व्यवसाय केला आहे, त्या संस्था बँकेसाठी अर्ज करण्यासाठी पात्र ठरतील. किमान भाग भांडवल ठेवींचा आकार – संस्थेचे वसूल भांडवल ३०० कोटी रुपयांचे असावे आणि ठेवी रुपये दहा हजार कोटींचा असाव्यात.

**⁕ नोंदणी –** संस्थेची नोंदणी मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह संस्था म्हणून झालेली असावी.

**⁕ अनुत्पादक कर्जे –** संस्थेचे नेट एनपीए तीन टक्क्यांपेक्षा कमी असावेत.

**⁕ पर्याप्त भांडवल –** संस्थेचे पर्याप्त भांडवल किमान १२ टक्के असले पाहिजे. एनपीए आणि पर्याप्त भांडवलाचा आकडा मागील वर्षाच्या ऑडिटेड ताळेबंदाप्रमाणे हिशेबात ग्राह्य धरला जाईल. भांडवल आणि अनुत्पादक कर्ज यांचा आकडा काढत असताना नागरी सहकारी बँकांना सध्या लागू असलेल्या नियमांप्रमाणे तो काढलेला असला पाहिजे.

**⁕ भाग भांडवलाविषयी –** कोणत्याही सभासदाकडे वसूल भाग भांडवलाच्या पाच टक्क्यांपेक्षा अधिक भाग भांडवल नसावे.

**⁕ संचालक पात्रता –** संचालकांच्या पात्रतेसाठी नागरी सहकारी बँकांना सध्या लागू असलेले फिट अँड प्रॉपर पद्धतीचे नियम लागू राहतील.

**⁕ व्यवसाय नियोजन –** बँकिंग परवान्यासाठी अर्ज करत असताना संस्थेला भविष्यातील व्यवसाय नियोजनाचा आराखडा सादर करावा लागेल. यानंतर अर्ज कसा करावा त्यासोबत कोणते कागदपत्र असावेत, याबाबतचा तपशील देण्यात आला आहे.

**⁕ निर्णयाचे महत्त्व –** अडीच दशकांच्या नंतर नागरी सहकारी बँका या प्रारूपात नव्या बँकांची यानंतर भर पडणार आहे. नागरी सहकारी बँका सध्याच्या बँकिंग व्यवसायात अन्य प्रकारच्या बँकांच्या तुलनेत चांगली कामगिरी करीत आहेत, असा या निर्णयाचा अर्थ निघतो. नागरी सहकारी बँकांच्या कार्यक्षमतेवर विश्वास दर्शवणारी ही कृती आहे. यानिमित्ताने उत्तम व्यवसाय करणाऱ्या मल्टिस्टेट पतसंस्थांना बँकिंग क्षेत्रात सहजपणे प्रवेश करता येईल. ठेवीदारांना बँकिंग परवान्यानंतर विम्याचे कवच आपोआप प्राप्त होईल. त्यांची व्यावसायिक विश्वासार्हता वाढेल.

**⁕ स्पर्धेची तयारी –** अस्तित्वात असलेल्या नागरी सहकारी बँकांसाठी, नव्याने परवानगी मिळालेल्या बँका स्पर्धक ठरतील. सध्याच्या बँकांनी या स्पर्धेबाबत जागरूकता दाखवणे आवश्यक आहे. या निमित्ताने आपल्या क्षेत्रात नवीन भावंडे येत आहेत ही अत्यंत स्वागतार्ह बाब आहे. रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. सध्या नागरी सहकारी बँकेत असलेल्या कर्मचारी अधिकारी वर्गाला काम करण्यासाठी नव्याने वाव मिळेल. रिझर्व बँकेच्या या निर्णयाचे सहकारी संस्था म्हणून स्वागत करणे योग्य ठरेल.

**– डॉ. अभय मंडलिक (लेखक बँकिंग विषयाचे अभ्यासक असून खामगाव अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेचे संचालक आहेत.)**


## सहकार भारती सहकार प्रशिक्षण सहकारी संस्था मर्या;
## (शासन मान्यताप्राप्त शिखर प्रशिक्षण संस्था)

मान्यताप्राप्त शिखर प्रशिक्षण संस्था म्हणून महाराष्ट्र शासनाने आमच्या प्रशिक्षण संस्थेचे नाव अधिसूचित केले आहे. अधिसूचित संस्थेकडून सहकारी संस्थांनी प्रशिक्षण घेणे अनिवार्य आहे. नागरी सहकारी बँका, सहकारी पतसंस्था, गृहनिर्माण संस्था इ. सर्व संस्थाकरिता संचालक, पदाधिकारी, कर्मचारी व सभासदांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम घेतले जातात.

***नागरी सहकारी बँकांसाठी***

आमची संस्था बँकेच्या गरजेप्रमाणे दर्जेदार प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन बँकेच्या ठिकाणी जाऊन करते. अन्य प्रशिक्षण कार्यक्रमांबरोबरच नवीन भरती, स्टाफसाठी प्रारंभिक प्रशिक्षण कार्यक्रम, पदोन्नतीपूर्व प्रशिक्षण तसेच **पदोन्नती परीक्षांचेही वाजवी दरात आयोजन करते.** तरी याचा लाभ सहकारी बँकांनी घ्यावा. वरील सेवांसाठी कृपया संपर्क साधावा.

**श्री. व्यंकटेश कुलकर्णी (प्रशिक्षण प्रमुख) - ९४०३० ८०७५१**
**श्री. उदय पेंडसे (संचालक) - ९८६९० ३४६६२**

**⁕ प्रशिक्षण कार्यालय –** फ्लॅट नं. ३, रामेश्वर अपार्टमेंट, साई सर्व्हिस पेट्रोल पंपामागे, पूलाची वाडी, डेक्कन जिमखाना, पुणे ४११ ००४ **ई-मेल –** sahakarprashikshan@gmail.com

# यूपीआयची दहा वर्षांची भरारी

भारतभर सर्वत्र वापरात असलेली पैशांची देवाणघेवाण ही सुरू होऊन १० वर्षे पूर्ण झाली आहेत. २००५ साली भारतीय राष्ट्रीय भुगतान महामंडळ म्हणजेच NPCI - National Payment Corporatiion of India स्थापना झाली. आत्ता आपण जे काही पैशाची सर्व प्रकारची देवाणघेवाण ऑनलाइन करतो, त्याचा कंट्रोल करणारी ही अतिशय महत्त्वाची संस्था आहे. २४ तास ३६५ दिवस ही संस्था सातत्याने कार्य करीत आहे. नवीन इलेक्ट्रॉनिक टेक्नोलॉजीने बँकिंग गतिमान झाले, खेडोपाडी पोचल्याने आपण मोठ्या प्रमाणात वापरतो. यामध्ये संस्थेचे मोठे योगदान आहे. अतिशय प्रभावीपणे नवीन इलेक्ट्रॉनिक टेक्नोलॉजी आता सर्वत्र विस्तारली आहे. अशिक्षित खेडून वयस्कर म्हातारी देखील आपले पैशाचे व्यवहार एका मोबाइलवरून, कधी क्यूआर कोड स्कॅन करून करीत आहोत. तर अशीच एखादी आजीबाई भाजी मार्केटमध्ये सांगते, 'मावशी स्कॅन करा, की नसतील सुटे तर नसू देत की माझ्याकडं आहे.' असे म्हणून ती स्कॅन करायचे कार्ड समोर धरते. तिचे मनोमनी कौतुक करून पटकन व्यवहार केला जातो.



वंदना धर्माधिकारी
९८९०६ २३९१५

पैशाचे व्यवहार अधिकतर UPI. यूपीआय या इन्स्टंट डिजिटल पेमेंट सिस्टीमचा वापर करून केले जातात. जिच्या मदतीने तुम्ही मोबाइल द्वारे एका बँक खात्यातून दुसऱ्या बँक खात्यात सेकंदात पैसे पाठवू किंवा घेऊ शकता. यूपीआय म्हणजे युनिफाईड पेमेंट इंटरफेस म्हणजे यूपीआय - UPI - Unified Payments Interface होय. त्यास आता १० वर्ष पूर्ण झाली म्हणून थोडे त्याबद्दल इथे देत आहे.

यूपीआय पेमेंटची आकडेवारी बघितली तर दिसते, की २०१६ ला पहिल्या वर्षी १.७८ कोटी व्यवहार केले गेले तेच २०२६ मध्ये २४ हजार कोटींहून अधिक व्यवहार केले गेले आणि रक्कम त्यामधील काढली तर ३१४ लाख कोटी रुपयांची देवाणघेवाण त्यातून झाली. यावर कुठलेही शुल्क आकारणी केली जात नाही. सर्व खर्च सरकारतर्फे केला जातो. एकुणात ७२० बँका यूपीआयशी जोडलेल्या आहेत.

येथील व्यवहार थोड्या रकमेचे पण संख्येने खूप असे असतात. मोठेही आहेत भरपूर. यांच्या नोंदी होत असल्याने अनेक जण करपात्र उत्पन्नाच्या कक्षेत आलेले आहेत, आणखीन लवकरच येतीलही. आपोआप कर संकलन वाढले, कर भरणारे अधिक झाले. मोफत असले तर कर लागायला नको म्हणून बरेच व्यावसायिक आपल्या वैयक्तिक बचत खात्यांमध्ये पैसे स्वीकारतात. ओघानेच टॅक्स रिटर्न भरणाऱ्यांची संख्या वाढली आहे. हे प्रगतीचे लक्षण आहे. समाज अर्थसाक्षर होत आहे. बँकिंगचे व्यवहार बँकेत न जाता करताना वाचणारा वेळही त्यांनी चांगल्या कामासाठी लावला तर अधिक छान होईल.

यूपीआय तंत्रज्ञान परदेशात अधिक पसंतीस आलेले असल्याने अनेक देशांनी या तंत्रज्ञानाची मागणी केली. नुकतेच कॅनडात यूपीआय द्वारे आर्थिक व्यवहार करायचा निर्णय केला गेला. त्याआधीपासून अनेकविध देशांमध्ये यूपीआय व्यवहार केले जात आहेतच. त्याची यादी बघू या. ही कार्यप्रणाली सध्या - भूतान, नेपाळ, सिंगापूर, फ्रान्स मॉरिशस, श्रीलंका, कतार, ओमान, ग्रीस, कंबोडिया, संयुक्त अरब अमिराती (UAE) या सर्व देशांशी भारतीय युनिफाईड पेमेंट इंटरफेस जोडणी जोडलेली आहे, कार्यरत आहे. जगात आपण या बाबतीत लीडर झालो आहोत. सर्वच व्यवहार होत असतील असे नाही, काही विशेष ठिकाणचे मात्र पर्यटकांना करणे सोयीस्कर केलेले आहे. बरेच ठिकाणी स्थानिक आउटलेटस, हॉटेलमध्ये, खरेदीसाठी, प्रवासात यूपीआय वापरून पेमेंट करता येते. विशेषत्वाने पॅरिस (फ्रान्स) मध्ये आयफेल टॉवरसह निवडक पर्यटन स्थळांवर यूपीआय पेमेंट करता येते. याने पर्यटन सोपे झाले. असे इतर देशांनी आर्थिक व्यवहारांसाठी भारतास आंतरराष्ट्रीय सहाकार्य दिल्याने परदेशात गेल्यानंतर आपले चलन न बदलता, सहजगत्या मोबाइलवरून त्यांचा क्युआर कोड स्कॅन करून डिजिटल पेमेंट करता येते. इकडे खात्यात त्वरित डेबिट पडते. आहे ना सोपे. हेच आता लवकरच कॅनडात सुरू होईल. एकुणात यामुळे व्यवसायवृद्धी, परदेशी व्यवहार, द्विपक्षीय व्यापार, शिक्षण, पर्यटन वाढीस लागते. तसे लघु व मध्यम उद्योजकांना बाहेर माल पाठवताना वा तिकडून आणताना सुलभता मिळाली आहे.

बहुतांशी लोकांनी यूपीआय पेमेंट करायला सुरुवात केलेली आहेच. ज्यांनी अजूनही केले नसेल त्यांनी आपल्या मोबाइलमध्ये गुगल पे, फोन पे, पेटीएम, भीम सारखे यूपीआय ॲप्स डाउन करून या पद्धतीने पैशाची देवाणघेवाण करावी. म्हणजे तुम्हीच म्हणाल, किती सोपे आहे हे... आधीच शिकायला हवे होते.


**- वंदना धर्माधिकारी मो.नं. - ९८९०६ २३९१५**
Email - vandana10d@yahoo.co.in


***




## सहकार सुगंध मासिकात माहिती देणे, वर्गणी भरणे तसेच जाहिरातींसाठी जिल्हा प्रतिनिधींशी संपर्क साधावा ही विनंती - संपादक

**श्री. संतोष गावंडे :** रिजनल हेड (विदर्भ) 9420116337

| पश्चिम महाराष्ट्र विभाग | | |
|---|---|---|
| रहाटणी, पुणे | श्री. डी. एस. कुलकर्णी | 9420655316 |
| पिंपरी चिंचवड | श्री. शिरीष लिपारे | 9762830555 |
| इचलकरंजी | श्री. प्रशांत कुलकर्णी | 9421172965 |
| सोलापूर जिल्हा | श्री. चंद्रकांत धोंडे | 9881139150 |
| संगमनेर | श्री. विजय भिडे | 9975516360 |
| बेलापूर, जि. नगर | श्री. अरविंद शहाणे | 9922707677 |
| सातारा | श्री. विनायक भिसे | 9923396312 |
| **कोकण विभाग** | | |
| मुंबई-अंधेरी | श्री. रामकृष्ण आवारे | 9619318544 |
| मुंबई-विक्रोळी | श्री. प्रभाकर कांबळे | 9594293734 |
| मुंबई-जोगेश्वरी | श्री. गणेश खिलारे | 9322161526 |
| मुंबई-बोरिवली | श्री. केशव खाडे | 9969825835 |
| डोंबिवली | श्री. संदीप गव्हाणे | 9867678092 |
| पालघर | श्री. सदानंद पावगी | 8888880680 |
| मुरूड, जंजिरा | श्री. मेघराज जाधव | 9561710445<br>9421164777 |
| मुंबई-सायन | श्री. भरत चिंचोले | 7021862169 |

| उत्तर महाराष्ट्र विभाग | | |
|---|---|---|
| जळगाव | श्री. विश्वास कुलकर्णी | 9922653022 |
| धुळे | श्री. कृष्णा जाधव | 8482993517 |
| नंदूरबार | श्री. महादू हिरणवाळे | 9823842991<br>8208147121 |
| नाशिक | श्री. राजीव चंद्रात्रे | 9403261226 |
| नाशिक | श्री. नितीन बीबीकर | 9665778497 |
| **मराठवाडा विभाग** | | |
| छत्रपती संभाजीनगर | श्री. योगेश भोसले | 9421704116 |
| पैठण | श्री. देवेश इनामदार | 9404981212 |
| परभणी | श्री. मंगेश पाठक | 8149355759 |
| जालना | ॲड. दशरथ इंगळे | 9422723784 |
| नांदेड | श्री. संदीप चिलकेवार | 7507921655 |
| **विदर्भ विभाग** | | |
| नागपूर | श्री. महेश राव | 9545741474 |
| यवतमाळ | श्री. संतोष गावंडे | 9420116337 |

## सहकारी संस्थांना अत्यंत उपयुक्त खालील पुस्तके सहकार सुगंध कार्यालयात विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

| क्र. | पुस्तकाचे नाव (लेखक) | किंमत |
|---|---|---|
| १ | सहकार महर्षी ग्रंथ | १५००/- |
| २ | सहकार बँकांचे कर्ज व्यवस्थापन (अनिल दोशी) | ३५०/- |
| ३ | नागरी सहकारी बँकेचे प्रशिक्षण (डॉ. अभय मंडलिक) | १२५/- |

| क्र. | पुस्तकाचे नाव (लेखक) | किंमत |
|---|---|---|
| ४ | बँकिंग साक्षरता (गणेश निमकर) | ३५०/- |
| ५ | सरकारी कर्जरोखे (जयंत काकतकर) | २५०/- |
| ६ | गोष्ट साखरेची (साहेबराव खामकर) | ७५/- |

वरील पुस्तकांसाठी रक्कम तसेच सहकार सुगंधची वर्गणी भरण्यासाठी सहकार सुगंधच्या वरील जिल्हा प्रतिनिधींशी संपर्क साधावा किंवा खालील बँक खात्यात रक्कम जमा करण्यासाठी खालील क्यूआर कोड वापरावा.

**सहकार सुगंधची वर्गणी १ जानेवारी २०२५ पासून-**
**वार्षिक रु. ७००/- त्रैवार्षिक रु. १८००/-**

**UPI ID**
**SahakarSugandha@DNSbank**

**A/c Name : Sahakar Sugandha**
**Bank Name : Dombivali Nagari Sahakari Bank Ltd.**
(Sihagad Road, Pune Branch)
**Current a/c No. : 07801110000065**
**IFS Code - DNSB0000078**

**UPI ID**
**SahakarSugandha@SBI**

**A/c Name : Sahakar Printing & Publications Pvt. Ltd.**
**Bank Name : State Bank of India**
(Hingne Khurd, Pune Branch)
**Current a/c No. : 36931889346**
**IFS Code - SBIN0007159**

**कृपया वर्गणी जमा केल्यानंतर आपला नाव व पत्ता पुढील ई मेलवर कळवा. sahakar.sugandha@gmail.com**

safe age
Security Products Pvt. Ltd.

# OM SALES CORPORATION



All our Products are BIS Standards

Our Certificates

ISO 14001 : 2004

IS 5244 : 2014
CM/L-7500087614

IS 550 : 2014
CM/L-3978088

IS 11188 : 2014
CM/L-2870669

ISO 9001 : 2008



Electronic safe | Depository safe | Gold Safe | Fire Resistant Cabinet | Fire Resistant Filing Cabinet | Industrial Locker | Compactor

**Nilesh Bonde Mob.: 9850120090 / 8698337947**

Website : www.omsalescorportion.net I Id : omsales.safeage@gmail.com

Add. : S.No. 179, Fuge Vasti, Behind Pyramid Hotel,
Near Gajanan Maharaj Mandir, Magzine Chowk,
Bhosari-Alandi Road, Bhosari - 411039.

Factory Add - Safeage Security Products Pvt. Ltd., Shiye, Jyotiba Road, Kolhapur

We are authorised distributor for Pune, Satara, Sangli, Solapur, Ratnagiri, Sindhudurg, Raigad, Ahemadnagar, Nashik, Jalgaon, Dhule, Nandurbar, Aurangabad, Jalna, Parbhani, Hingoli, Usmanabad, Beed, Latur, Nanded, Buldhana, Akola, Amravati, Yavatmal, Washim, Nagpur, Bhandara, Wardha, Chandrapur, Gadchiroli, Gondiya,


स्थापना 1995
लोकमान्य
मल्टिपर्पज को-ऑप. सोसायटी लि. (मल्टी-स्टेट)
प्रधान कार्यालय - पुणे, महाराष्ट्र
एकदंताची कृपा...
सिद्धिदात्याचा आशीर्वाद,
प्रत्येक मुदत ठेवीत समृद्धीचा विश्वास!
आकर्षक व्याजदर
10%
वार्षिक व्याजदर
गणाधीश
ठेव योजना
मुदत ठेव 21 महिने
किमान ठेव ₹10,000/- (उच्च मर्यादा नाही)
वरिष्ठ नागरिक (60+ वर्ष) 0.50% अतिरिक्त व्याज दर
* नियम व अटी लागू, योजना फक्त सभासदांसाठी
स्थापना 1995
लोकमान्य
मल्टिपर्पज को-ऑप. सोसायटी लि. (मल्टी-स्टेट)
प्रधान कार्यालय - पुणे, महाराष्ट्र
महाराष्ट्र • कर्नाटक • गोवा • दिल्ली
Reg. No. M.S.C.S./C.R./140/2002
संस्थापक - अध्यक्ष : डॉ. किरण ठाकुर, सल्लागार संपादक, तरुण भारत, बेळगाव.
Call 1800 212 4050 lokmanyasociety.org

THE YAVATMAL URBAN CO-OP., BANK LTD., YAVATMAL

दि यवतमाळ अर्बन को-ऑप.बँक लि., यवतमाळ

आम्ही जपतो वारसा विश्वासाचा

मुख्य कार्यालय : एल.आय.सी. चौक, गार्डन रोड, यवतमाळ 445001 | फोन : 07232-244241, 243703, 237442

Mail - ho_adm@yavatmalurbanbank.com | Website - www.yavatmalurban.bank.in

# अमृत वर्षा

## पुनर्गुंतवणूक ठेव योजना

| 6.60%* योजनेचा सामान्य व्याजदर | 7.10%* जेष्ठ नागरिकांकरिता व्याजदर |
| --- | --- |

गुंतवणूक कालावधी 444 दिवस
अंतिम तारीख - 31 मार्च 2027 पर्यंत



**डॉ. नितीन खर्चे** — अध्यक्ष

**अजिंदरसिंह चावला** — उपाध्यक्ष

**श्रीधर कोहरे** — मुख्य कार्यकारी अधिकारी

- संचालक -

श्री. अजय विठ्ठलदासजी मुंधडा, श्री. आशिष हरिहरराव उत्तरवार, श्री. प्रशांत अरुण माधमशेट्टीवार, श्री. संजय चिंतामणराव डेहणकर, श्री. प्रमोद मधूकरराव धुर्वे, ॲड. श्री. प्रफुल्लसिंह लक्ष्मणसिंह चौहान, श्री. गोवर्धन दयाराम राठोड, श्री. परिमल प्रेमकुमार देशपांडे, डॉ. श्री. महेश दामोधर सारोळकर, श्री. वसंता रामजी सुपारे, श्री. संतोष विष्णूकांत पेन्शनवार, श्रीमती मिरा राजेश घाटे, सौ. शिला राजेश्वर निवल, श्री. नरेंद्र देवराव देशपांडे (तज्ञ संचालक), ॲड.श्री.संतोष विठ्ठलराव कुचनकर (तज्ञ संचालक)



# सर्वांना गणेश उत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा!

## बँकेकडे कर्जासाठी उपलब्ध केंद्र व राज्य सरकारच्या विविध सबसिडी योजना

1. PMEGP Prime Minister's Employment Generation Programme प्रधानमंत्री रोजगार निर्मिती योजना
2. PMAY - Pradhan Mantri Awas Yojna - Urban २.० प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.०
3. PMFME Pradhan Mantri Formalisation of Micro Food Processing Enterprises प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया योजना
4. PM-KUSUM (Pradhan Mantri Kisan Urja Suraksha Evam Utthan Mahabhiyan) प्रधानमंत्री मंत्री किसान उर्जा सुरक्षा एवंम उथ्थान महाभियान
5. PM - SURYA GHAR MUFT BIJLI YOJANA पी.एम. - सुर्यघर मोफत विज योजना
6. CLCSS Credit Linked Capital Subsidy Scheme
7. APAMVM- Annasaheb Patil Aarthik Magas Vikas Mahamandal अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ
8. AIF - National Agriculture Infra Financing Facility राष्ट्रीय कृषी पायाभूत वित्तपुरवठा सुविधा (नाबार्ड पुरस्कृत)
9. NLM National Livestock Mission राष्ट्रीय पशुधन अभियान
10. NABARD Interest Subvention Scheme
11. CGTMSE (सूक्ष्म आणि लघु उद्योगांसाठी क्रेडिट गॅरंटी फंड ट्रस्ट)
12. महाराष्ट्र संशोधन उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) ACADEMY OF MAHARSHTRA RESEARCH, UPLIFTMENT AND TRAINING (AMRUT) AMRUT

Since 1935

SUB का साथ, आपका विकास

# सांगली अर्बन को-ऑप. बँक लि., सांगली

(शेड्युल्ड को-ऑप. बँक)

प्रधान कार्यालय : ४०४, खणभाग, सांगली ४१६४१६, फोन : (०२३३) २३७६२३६ /३७/३८

मोबाईल : ७८८८००९७१८

अधिक माहितीसाठी आमच्या नजीकच्या शाखेशी संपर्क साधा.

# सहकार चळवळीतील महनीय व्यक्तींचा जीवनप्रवास
# महाराष्ट्रातील १७५ कार्यकर्तृत्वांचा सचित्र आलेख




सहकार भारती प्रकाशित
सहकार सुगंध निर्मित...

# सहकार महर्षी

सहकार चळवळीतील प्रत्येकाने आवर्जून वाचावा असा ग्रंथ



- महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्थेचा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्राप्त
- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांनी शिफारस केलेला ग्रंथ

सहकार महर्षी ग्रंथ – प्रतींनुसार विशेष किंमत (कुरिअर मोफत)

| | | |
|---|---|---|
| १ ते ५ ग्रंथ घेतल्यास | – | रु. १५००/– प्रमाणे प्रती ग्रंथ |
| ६ ते १० ग्रंथ घेतल्यास | – | रु. १३५०/– प्रमाणे प्रती ग्रंथ |
| ११ व त्यापेक्षा अधिक घेतल्यास | – | रु. १२००/– प्रमाणे प्रती ग्रंथ |

A/c Name : Sahakar Printing & Publications Pvt. Ltd.
Bank Name : State Bank of India
Branch : Hingne Khurd, Pune Branch
Current a/c No. : 36931889346
IFS Code : SBIN0007159

UPI ID SahakarSugandha@SBI
सोबत दिलेला QR कोड स्कॅन करून ऑनलाईन पेमेंट करावे व तसे कार्यालयास कळवावे.

बुके नको 'बुक' देऊ या! आपल्याकडे येणाऱ्या प्रत्येकाला 'सहकार महर्षी' ग्रंथ देऊ या!



50+ YEARS OF MOMENTUM
हर पल PROGRESSIVE
THE KALYAN JANATA SAHAKARI BANK LTD.
MULTI-STATE SCHEDULED BANK
LOAN AGAINST PROPERTY
8.90%* p.a.
For loan up to ₹ 90.00 lakh
9.40%* p.a.
For loan above ₹ 90.00 lakh
Minimum Processing Fees*
Tenure : upto 15 years
Flexible Repayment Period*
* T&C APPLY
TOLL FREE: 1800 233 1919
kalyanjanata.bank.in
KJSBank

Registered - SAHAKAR SUGANDHA - PRGI NO. MAHMUL/2005/16099
Magazine Post Contract No. : BP/EP 40280299 Customer ID : 3000071496
(Publication Date - 05/09/2026) Posting on 07/09/2026 Posting at BMI Pune PSO, Pune 411001

